


# मानवी हक्क आणि भारत

(HRC 002)

## १. मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना

International Award for Institutional Excellence in Distance Education from Commonwealth of Learning, Canada

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University

[Established by Government of Maharashtra ]

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

Human Rights Unit
Commonwealth
Secretariat

**HRC 002**

**मानवी हक्क आणि भारत**

पुस्तक पहिले

# मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना

लेखक : मेधा कोल्हटकर


| | | |
|---|---|---|
| **घटक १** : | घटनात्मक मूल्ये आणि मानवी हक्क | १ |
| **घटक २** : | मूलभूत हक्क : समानतेचा हक्क | ११ |
| **घटक ३** : | मूलभूत हक्क : स्वातंत्र्याचा हक्क | २२ |
| **घटक ४** : | मूलभूत हक्क : धार्मिक, सांस्कृतिक आणि इतर हक्क | ३४ |
| **घटक ५** : | राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि मानवी हक्क | ४३ |
| **घटक ६** : | मानवी हक्कांची संरक्षक : न्यायपालिका | ५१ |
| **परिशिष्ट १** : | भारतीय राज्यघटना भाग ३, ४ व ४ अ | ६२ |
| **परिशिष्ट २** : | मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा आणि भारतीय राज्यघटना व कायद्यातील तरतुदी | ८६ |
| **परिशिष्ट ३** : | मानवी हक्कांशी संबंधित भारतीय कायदे | ९६ |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : डॉ. राजन वेळूकर

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

डॉ. रमेश वरखेडे
संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मु.वि., नाशिक

न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर
१३, जयनगर, दशमेशनगरजवळ, औरंगाबाद - ४३१००५

डॉ. रमेश राजदेरकर
प्रपाठक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मु.वि., नाशिक

नागार्जुन वांजरवाडकर
अधिव्याख्याता, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा य.च.म.मु.वि. नाशिक

डॉ. ना. रा. शिंदे
संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, य.च.म.मु.वि., नाशिक

डॉ. प्रकाश अतकरे
परीक्षा नियंत्रक व संचालक कृषि विज्ञान विद्याशाखा, य.च.म.मु.वि., नाशिक

डॉ. जयदीप निकम
प्रपाठक, निरंतर शिक्षण विद्याशाखा य.च.म.मु.वि.,नाशिक

श्री. विजयकुमार पाईकराव
अधिव्याख्याता शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मु.वि., नाशिक

डॉ. किशोर गायकवाड
इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कलिना, सांताक्रूज (पूर्व) मुंबई - ४०० ०९८.

डॉ. संग्राम गुंजाळ
समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रा. जी. ए. बुवा
उपप्राचार्य, पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग

प्रा. बबनराव नाखले
३७, पंचदीपनगर, वर्धा रोड, नागपूर

प्रा. मृणाल भारद्वाज
काश्यपी-इ, फ्लॅट नं. ७, मामामुंगी कार्यालयाच्या मागे, गंगापूर रोड, नाशिक

## तज्ज्ञ समिती

डॉ. हनिफ व्हॅली
माजी प्रमुख, मानवी हक्क कक्ष, राष्ट्रकुल सचिवालय, पॉल मॉल, लंडन, SW1Y5HX, इंग्लंड

डॉ. जार्वीस मातिया
माजी प्रमुख, मानवी हक्क कक्ष, राष्ट्रकुल सचिवालय, पॉल मॉल, लंडन, SW1Y5HX, इंग्लंड

डॉ. जॉलियन फोर्ड
(सदस्य, राष्ट्रकुल विधी शिक्षण संघटना (CLEA), आफ्रिकन अभ्यास विद्याशाखा, लंडन विद्यापीठ, इंग्लंड)
माजी मानवी हक्क अधिकारी, मानवी हक्क कक्ष, राष्ट्रकुल सचिवालय, पॉल मॉल, लंडन, SW1Y5HX, इंग्लंड

डॉ. रमेश वरखेडे
संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विणा पुणाचा
रीसर्च सेंटर फॉर विमेन्स् स्टडीज्, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, जुहू परिसर, मुंबई

डॉ. मंगेश कुलकर्णी
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग पुणे विद्यापीठ, पुणे

डॉ. मीना गोपाल
रीसर्च सेंटर फॉर विमेन्स् स्टडीज् एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई

डॉ. शेरी सब्बरवाल
प्रमुख, समाजशास्त्र विभाग पंजाब विद्यापीठ, चंदीगढ

डॉ. निर्मल पंडित
व्यवस्थापकीय विश्वस्त, नवम ३, कल्याण अपार्टमेंट, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे.

डॉ. परमजीत जसवाल
प्रमुख, विधी विभाग, पंजाब विद्यापीठ, चंदीगढ

मनदीप तिवाना
कन्सल्टंट, ॲक्सेस टू जस्टिस प्रोग्रॅम कॉमनवेल्थ ह्युमन राईटस् इनिशिएटिव्ह, नवी दिल्ली

डॉ. शैलेंद्र देवळावणकर
सहाय्यक संचालक, दूरशिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ मुंबई - ९८

एस. साईराम
कॉमनवेल्थ युथ प्रोग्रॅम (CYP) आशिया केंद्र, सेक्टर १२, चंदीगढ

नागार्जुन वांजरवाडकर
अधिव्याख्याता, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**लेखक**

मेधा कोल्हटकर
अधिव्याख्याता
इंडियन लॉ सोसायटी (आयएलएस)
लॉ कॉलेज, लॉ कॉलेज रोड
पुणे - ४११ ००४

**आशय संपादन**

डॉ. जयश्री पलांडे
विधी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - ७

**भाषांतर**

ॲड. प्रज्ञा हेंद्रे
'कृपाछाया', महादेव मंदिराजवळ
पानसरे गल्ली, अहमदनगर - ४१४ ००१.

**भाषा व भाषांतर संपादक**

विलास गिते
९, 'तेजस', गणेश कॉलनी
सावेडी नाका, अहमदनगर - ४१४ ००३.

**शिक्षणक्रम संयोजक**

नागार्जुन वाजरवाडकर
अधिव्याख्याता, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

*First edition developed under DEC development grant.*
© २००९, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
❒ प्रथम प्रकाशन : जानेवारी २००९, जुलै २०१२ ❒ प्रकाशन क्रमांक : १७७०
❒ अक्षरजुळणी : मुक्ता एंटरप्रायजेस, नाशिक - ४२२ ००१.
❒ मुखपृष्ठ छपाई : श्री. ज्ञानेश्वर पाटील, मे. श्री. सोमेश्वर प्रिंटर्स, ४, आनंदकुंज अपार्टमेंट, जुना गंगापूर नाका, नाशिक
❒ मुद्रक : श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए/ नाईस, सातपूर, नाशिक ४२२ ००७
❒ प्रकाशक : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२
ISBN 978-81-8055-340-0

(HRC 002-1)

# कुलगुरूंचे मनोगत

मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या तुम्हा विद्यार्थ्यांचे मी स्वागत आणि अभिनंदन करतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने मानवी हक्क कक्ष, राष्ट्रकुल सचिवालय, लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम विशेष करून तयार केला आहे. त्यामुळे तुमच्या प्रमाणपत्रावर लंडनच्या राष्ट्रकुल सचिवालयाचे बोधचिन्हसुद्धा असणार आहे. आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र असलेला असा शिक्षणक्रम संयुक्त विद्यमाने तयार करण्याचा विद्यापीठाचा नवीन उपक्रमातील सर्वप्रथम शिक्षणक्रम आहे.

मानवी हक्क आणि विकास यांचे जवळचे नाते आहे. सामान्य लोकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी व विकासाकडे पाहण्याचा हक्कांवर आधारित दृष्टिकोन तयार करण्यासाठी; ज्यांच्या निर्णयांचा लोकांच्या हक्कावर परिणाम होतो, अशा शासनामधील लोकांच्या सेवेतील अधिकाऱ्यांना याबद्दल संवेदनशील बनविण्यासाठी आणि लोकांना मूलभूत अधिकार मिळण्यामध्ये येणाऱ्या अडथळ्यांबद्दल लोकांमध्ये जागृती करण्याचे कार्य करण्यात गुंतलेल्या स्वयंसेवी संस्थांमधील कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी आपल्या आसपास मानवी हक्कांची संस्कृती तयार करणे आवश्यक आहे.

विद्यापीठाच्या उद्दिष्टांशी मेळ खात असलेला हा मानवी हक्क शिक्षणक्रम म्हणजे आपल्या भोवतालच्या समाजाच्या विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रियेत साहाय्यभूत बनण्याच्या दिशेने पुढे टाकलेले एक पाऊल आहे. म्हणूनच आम्ही या शिक्षणक्रमांकडे एक चळवळ म्हणून पाहतो. ती सामान्य माणसांपर्यंत पोचली पाहिजे व त्यांना हक्कांची भाषा समजली पाहिजे. थोडक्यात, हा शिक्षणक्रम इतरांनी आपल्याशी जसे वागावे अशी आपली अपेक्षा असते तसे आपणही इतरांना वागवावे असे हा शिक्षणक्रम तुम्हाला शिकवतो.

मुक्त शिक्षण प्रणाली स्वयं-अध्ययनावर भर देते. त्यामुळे या शिक्षणक्रमांचे स्वयं-अध्यापन साहित्यही त्या दृष्टिकोनातून विकसित करण्यात आले आहे. या अध्ययन साहित्यात विविध परिप्रेक्ष्यांचा समावेश केला गेलेला आहे. त्यामुळे हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर तुम्ही स्वतःचा असा दृष्टिकोन विकसित करू शकाल.

या शिक्षणक्रमासंबंधी गतवर्षीच्या एकूण अनुभवावरून विद्यार्थी, समंत्रक व समन्वयक यांच्या प्रत्याभरणाच्या आधारे विद्यापीठाने सदर शिक्षणक्रमांच्या संपूर्ण अध्ययन साहित्याची पुनर्रचना व सुलभीकरण केले आहे. हा अभ्यासक्रम सहा महिन्यांच्या कालखंडात प्रत्येकी दोन तासांच्या अठरा समंत्रण सत्रांमध्ये आयोजित करण्यात येईल. तुम्हाला या सत्रामध्ये विचारांची देवाणघेवाण करायची आहे. या शिक्षणक्रमाची पुस्तके/अध्ययन साहित्य आणि समंत्रण सत्रे एकमेकांना पूरक आहेत. म्हणजेच समंत्रण सत्रांना हजर राहण्यापूर्वी तुम्ही पुस्तकातील संबंधित भाग वाचलेला असला पाहिजे. वाचन करत असतानाही तुम्ही निष्क्रियपणे वाचन करणे अपेक्षित नाही. तुम्ही वाचलेल्या भागावरील तुमचे विचार, व्यक्तिगत निरीक्षणे आणि अडचणी नोंदविल्या पाहिजेत. समंत्रण सत्रादरम्यान त्याची तज्ज्ञ समंत्रकांशी चर्चा केली पाहिजे. शेवटी, तुम्ही जे शिकता त्याचा तुम्हाला तुमच्या भोवतालच्या प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडता आला पाहिजे.

ही जबाबदारी स्वीकारून आमच्या या मुक्त शिक्षणाच्या परिवाराचे सदस्य बनल्याबद्दल आणि अशा प्रकारे सर्वदूर लोकांपर्यंत पोहचण्याच्या आमच्या सतत सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग बनल्याबद्दल मी पुन्हा एकदा तुमचे अभिनंदन करतो. तुम्हा सर्वांना माझ्या शुभेच्छा !

**डॉ. राजन वेळूकर**

*कुलगुरू*

# मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम

## प्रस्तावना

मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा सहा महिन्यांचा शिक्षणक्रम आहे. मानवी हक्कांच्या प्रश्नांना इतरांपेक्षा अधिक तोंड देणाऱ्या घटकांत मानवी हक्कांबाबत मूलभूत जाणीव-जागृती निर्माण करण्याच्या हेतूने हा शिक्षणक्रम तयार करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये आणि विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही, मानवी हक्क, नागरिकत्व, उत्तम अभिशासन आणि सहिष्णुता या मूल्यांना रुजविण्यासाठी, त्यांचे संवर्धन व दृढीकरण करण्यासाठी हा शिक्षणक्रम तयार करण्यात आला आहे.

या शिक्षणक्रमाच्या गतवर्षाच्या विद्यार्थी, समंत्रक आणि समन्वयकांच्या प्रत्याभरण व एकूणच अनुभवाधारे विद्यापीठाने सदर शिक्षणक्रमाच्या संपूर्ण अध्ययन साहित्याची पुनर्रचना, पुनर्मांडणी व सुलभीकरण केले आहे. या प्रमाणपत्र शिक्षणक्रमात दोन अभ्यासक्रम आहेत. ते असे - HRC 001 मानवी हक्क : मुलभूत संकल्पना आणि ऐतिहासिक वाटचाल व HRC 002 मानवी हक्क आणि भारत. HRC 001 मानवी हक्क : मुलभूत संकल्पना आणि ऐतिहासिक वाटचाल या अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी दोन श्रेयांकांची दोन पुस्तके आहेत, ती अशी : पुस्तक १ - मानवी हक्कांतील मूलभूत संकल्पना व पुस्तक २ - मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल.

या अभ्यासक्रमाला जोडून अंतर्गत मूल्यमापनासाठी दोन श्रेयांकाचे प्रात्यक्षिकही आहे. त्याकरिता तुम्हाला तुमच्या कार्यपुस्तिकेत दिल्याप्रमाणे मानवी हक्कांसंबंधी विषयांवर चिंतनपर (Reflective Writing) लिखाण करावयाचे आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर आणि मानवी हक्कांचे सैद्धांतिक आकलन झाल्यावर तुम्ही तुमच्या आसपासच्या वास्तवाचे, परिस्थितीचे, घटनांचे आणि संदर्भाचे मूल्यांकन व त्यावर भाष्य करता येईल. तसे करता यावे यासाठीच तुम्हाला ही संधी उपलब्ध करून दिली आहे. मानवी हक्कांची मूलभूत संकल्पना तसेच मानवी हक्कांची आंतरराष्ट्रीय चौकट यांच्या संदर्भातून तुम्ही हक्कांच्या उल्लंघनावर चर्चा करू शकाल. या लेखनातून पहिल्या अभ्यासक्रमाचे तुम्हाला झालेले आकलन व्यक्त करता येईल.

दुसरा अभ्यासक्रम आहे HRC 002 मानवी हक्क आणि भारत, यात प्रत्येक दोन श्रेयांकाची दोन पुस्तके आहेत. पुस्तक १ : मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना व पुस्तक २ : मानवी हक्कांच्या अंमलबजावणी यंत्रणा.

या अभ्यासक्रमासोबत दोन श्रेयांकांचे प्रात्यक्षिकही तुम्हाला करावयाचे आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आणि मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनासाठी अंमलबजावणी व नियंत्रक संस्था / यंत्रणाबद्दल शिकल्यानंतर पुन्हा तुम्ही काही सांगू शकाल. यासाठीच तुम्हाला ही संधी देण्यात आली आहे. या प्रात्यक्षिकांतर्गत तुम्ही मानवी हक्काचा एखादा विषय घेऊन भारतीय राज्यघटनेच्या व विशेषत: मूलभूत हक्कांच्या संदर्भात मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या मुद्यांवर चर्चा करू शकाल किंवा राज्याच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात सरकारच्या बदलत्या भूमिकेचे मूल्यमापन करू शकाल किंवा मानवी हक्कांचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या संदर्भात विविध नियामक, नियंत्रक संस्थांच्या भूमिका तपासू शकाल किंवा तत्सम विषयावर चर्चा करू शकाल. यातून या अभ्यासक्रमाचे तुमचे परिपूर्ण आकलन दिसून येईल. या प्रात्यक्षिकातून तुम्हाला या अभ्यासक्रमाचे झालेले आकलन व्यक्त करता येईल.

हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रत्येकी दोन तासांच्या चौदा समंत्रण सत्रांद्वारे राबविंण्यात येईल. त्यात दोन प्रात्यक्षिकांवर मार्गदर्शनासाठी चार अतिरिक्त समंत्रण सत्रे असतील. या अभ्यासक्रमात तुम्ही मानवी हक्कांची मूलभूत संकल्पना व प्रश्न, मानवी हक्कांच्या संकल्पनाची व संस्थांची उत्क्रांती / विकास, आंतरराष्ट्रीय करार भारतावर कसे बंधनकारक आहेत; मानवी हक्कांचे संरक्षण करणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय यंत्रणा आणि जगभरातील मानवी हक्कांबद्दलच्या महत्त्वाच्या समस्या याबद्दल माहिती करून घेणार आहात.

या अभ्यासक्रमात नागरिकांच्या मूलभूत तसेच मानवी हक्कांचे संरक्षण करण्याबद्दलची शासनाची कर्तव्ये याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. केवळ शासकीय यंत्रणा आणि व्यवस्थाच नव्हे तर आपणापैकी प्रत्येकजण आपल्या राज्यघटनेस कसा जबाबदार आहे हेदेखील तुम्ही शिकाल. हक्कांच्या उल्लंघनावरील उपलब्ध उपाययोजनासुद्धा या शिक्षणक्रमात तपशीलवारपणे सांगितलेल्या आहेत. मानवी हक्कांच्या संदर्भात भारतातील न्याय व्यवस्थेचे स्वरूप तुम्ही समजू शकाल. मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यातील न्याय पालिकेच्या बदलत्या भूमिकेचे विश्लेषण करू शकाल. मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासंदर्भात न्याय संस्थेचा व जनहित याचिकांचा (Judicial Activism and Public Interest Litigation) प्रभाव स्पष्ट करू शकाल व त्याचे विश्लेषण करू शकाल. मानवी हक्कांचे संवर्धन, संरक्षण आणि अंमलबजावणी या दोन्ही गोष्टी परस्परांना पूरक आहेत. या संदर्भात भारतातील सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करण्यात आला आहे.

मानवी हक्कांसंदर्भातील समस्या पुढे आणण्यात, त्या स्पष्ट करण्यात, त्यांच्या संदर्भातील अडचणी मांडण्यात व त्या दूर करण्यात विद्यापीठे, न्यायपालिका, स्वयंसेवी संस्था, विविध प्रसारमाध्यमे आणि सुसंस्कृत नागरी समाज यांची भूमिका निर्णायक आहे. कुठल्याही सशक्त व कार्यक्षम लोकशाहीसाठी या संस्था महत्त्वाच्या घटक ठरतात. कारण संवेदनशील समाज असल्याशिवाय मानवी हक्कांची संस्कृती तयार करणे अवघड असते, तसेच त्याशिवाय मानवी हक्कांसंदर्भात जागरूक नोकरशाही तयार करणेही कठीण असते.

तुमच्या संदर्भासाठी या सर्व पुस्तकांच्या शेवटी मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी असलेल्या महत्त्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तरतुदी परिशिष्टांमध्ये दिलेल्या आहेत. एखाद्या विशिष्ट तरतुदीबद्दल अधिक माहिती मिळवावी असे वाटल्यास तुम्ही त्या पाहू शकता. त्यांचा तुम्ही फार बारकाईने अभ्यास करण्याची येथे गरज नाही.

हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर तुम्हाला मानवी हक्कांचे आकलन झाले आहे हे आत्मविश्वासाने इतरांना स्पष्ट करून सांगता यायला हवे आणि त्यांची चर्चा करण्याचा, इतरांना ते समजावून सांगण्याचा व त्या हक्कांचे पालन करण्याचा आत्मविश्वास आला पाहिजे. तुम्हाला स्वतःच्या आणि इतरांच्या हक्कांच्या संदर्भात विचार करता आला पाहिजे व बोलता आले पाहिजे.

पुस्तक पहिले

# मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना (HRC 002)

## प्रास्ताविक

मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना हे मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील HRC 002 या अभ्यासक्रमाचे पहिले पुस्तक आहे. हा अभ्यासक्रम त्याचा आशय आणि दृष्टिकोनाच्या बाबतीत भारतातील वास्तवाशी संबंधित आहे. या पुस्तकात भारतीय राज्यघटनेवर विस्ताराने चर्चा केली आहे. हे पुस्तक सहा घटकांमध्ये विभागलेले आहे.

घटक १ हा भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा राज्यघटनेने जतन केलेल्या इतर घटनात्मक मूल्यांशी आणि मानवी हक्कांशी संबंधित आहे. या घटकात लोकशाही, सार्वभौमत्व, इत्यादी शब्दांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. घटक २, ३ व ४ यामध्ये भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांच्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. या घटकांत मूलभूत हक्क कोणते, त्यांची गरज व महत्त्व काय आहे; आणि न्यायालयांनी त्यांचे कार्यक्षेत्र कसे वाढविले आहे अशा महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा केली आहे.

घटक ५ हा मानवी हक्कांच्या संदर्भातून राज्याच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांच्या महत्त्वावरचे विवेचन करतो. गांधीवादी तत्त्वे, समाजवादी तत्त्वे, इत्यादी वेगवेगळ्या पद्धतीने मार्गदर्शक तत्त्वे या घटकातून स्पष्ट केली आहेत.

घटक ६ हा मूलभूत हक्कांचे संरक्षक म्हणून न्यायपालिकेची भूमिका स्पष्ट करतो. या घटकात मानवी हक्कांच्या संदर्भातून भारतातील जनहित याचिकांची संकल्पना, मूळ आणि भूमिका यांचादेखील मागोवा घेतला आहे.

या पुस्तकात भारतीय राज्यघटनेच्या भाग ३, ४ व ४ अ ची परिशिष्टे जोडली आहेत. तुमच्या अधिकच्या वाचनासाठी आणि संदर्भाकरिता हे भाग यात समाविष्ट केले आहेत. हे पुस्तक वाचताना जेव्हा तुम्हाला भारताच्या राज्यघटनेतील प्रत्यक्ष कलमे वाचावीशी वाटतील, तेव्हा या भागाचा संदर्भ घेता येईल.

या शिक्षणक्रमाचे विद्यार्थीच नव्हे तर भारताच्या राज्यघटनेच्या महत्त्वाविषयी ज्या कुणाला वाचण्याची इच्छा असेल त्यांनादेखील हे पुस्तक उपयोगी पडेल अशी आशा आहे.

# मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम

*अभ्यासक्रम*

**मानवी हक्क : मूलभूत संकल्पना आणि ऐतिहासिक वाटचाल (HRC 001)**

**पुस्तक पहिले : मानवी हक्कांतील मूलभूत संकल्पना**

**घटक १** : मानवी हक्क म्हणजे काय ?

**घटक २** : मानवी हक्क कसे काम करतात ?

**घटक ३** : मानवी हक्कांवरील मर्यादा

**घटक ४** : मानवी हक्क आणि उत्तम अभिशासन

**घटक ५** : विकास आणि मानवी हक्क

**घटक ६** : उत्तम अभिशासन आणि माहितीचा अधिकार

**परिशिष्ट १** : संयुक्त राष्ट्रसंघाचा विकासाच्या हक्कांचा जाहीरनामा, १९८६

**परिशिष्ट २** : माहितीचा अधिकार कायदा, २००५

**पुस्तक दुसरे : मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल**

**घटक १** : मानवी हक्कासंबंधी पाश्चात्त्य चिंतन

**घटक २** : मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल

**घटक ३** : संयुक्त राष्ट्रसंघ व मानवी हक्क

**घटक ४** : प्रादेशिक मानवी हक्क यंत्रणा

**परिशिष्ट १** : नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (ICCPR)

**परिशिष्ट २** : आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा (ICESCR)

**मानवी हक्क आणि भारत (HRC 002)**

**पुस्तक पहिले : मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना**

**घटक १** : घटनात्मक मूल्ये आणि मानवी हक्क

**घटक २** : मूलभूत हक्क : समानतेचा हक्क

**घटक ३** : मूलभूत हक्क : स्वातंत्र्याचा हक्क

**घटक ४** : मूलभूत हक्क : धार्मिक, सांस्कृतिक आणि इतर हक्क

**घटक ५** : राज्याची धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि मानवी हक्क

**घटक ६** : मानवी हक्कांची संरक्षक : न्यायपालिका

**परिशिष्ट १** : भारताची राज्यघटना भाग–३, ४ व ४ अ

**परिशिष्ट २** : मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा आणि भारतीय राज्यघटना व कायद्यातील तरतुदी

**परिशिष्ट ३** : मानवी हक्कांशी संबंधित भारतीय कायदे

**पुस्तक दुसरे : मानवी हक्कांच्या अंमलबजावणी यंत्रणा**

**घटक १** : भारतातील मानवी हक्कांच्या समस्या आणि आव्हाने

**घटक २** : मानवी हक्क संरक्षण अधिनियम

**घटक ३** : भारतातील मानवी हक्क नियामक यंत्रणा : भाग – १

**घटक ४** : भारतातील मानवी हक्क नियामक यंत्रणा : भाग – २

**घटक ५** : मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी उपाययोजना

**घटक ६** : नागरी समाज आणि मानवी हक्क

**परिशिष्ट १** : मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३

**परिशिष्ट २** : नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५

**परिशिष्ट ३** : अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९

# घटक १ : घटनात्मक मूल्ये आणि मानवी हक्क

*अनुक्रमणिका*


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
    १.२.१ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान
        १.२.१.१ घटना समिती
    १.२.२ सरनाम्याचे (Preamble)महत्त्व
        १.२.२.१ सार्वभौम
        १.२.२.२ समाजवादी
        १.२.२.३ धर्मनिरपेक्ष
        १.२.२.४ लोकशाही
        १.२.२.५ न्याय
        १.२.२.६ स्वातंत्र्य
        १.२.२.७ समानता
        १.२.२.८ बंधुभाव
        १.२.२.९ ऐक्य आणि अखंडता
१.३ सारांश
१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

★ भारतीय राज्यघटनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची चर्चा करता येईल.

★ मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून घटनेच्या सरनाम्याच्या महत्त्वाचे आणि घटनात्मक मूल्यांचे वर्णन करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

कोणत्याही देशाची राज्यघटना म्हणजे त्या ठिकाणच्या लोकांच्या श्रद्धा आणि उत्कट इच्छा अभिव्यक्त करणारा मूलभूत कायदा असतो. त्यास विशेष कायद्याचे पावित्र्य लाभलेले असते आणि त्या ठिकाणच्या सर्व कायद्यांमध्ये त्याचे स्थान सर्वश्रेष्ठ असते. आपली राज्यघटना ही बहुजनांनी साम्राज्यवादी परकीय सत्ताधाऱ्यांवर मिळवलेल्या विजयाचे प्रतीक आहे. प्रत्येक भारतीय नागरिक हा त्याच्या मर्जीचा मालक असून कुणाचाही गुलाम नाही अशी हमी हा दस्तऐवज मिळवून देतो. 'आम्ही भारताचे लोक' या देशाचे खरे सत्ताधारी आहोत हे राज्यघटना दर्शवते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, अहिंसा, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या तत्त्वांवर आधारित स्वातंत्र्य लढ्याचा ऐतिहासिक वारसा राज्यघटनेला लाभलेला आहे. १९५० साली जेव्हा राज्यघटना अमलात आली, तेव्हा ती जगात समान कायदा असलेल्या देशांमधील केवळ तिसरी लिखित राज्यघटना होती. त्यामध्ये न्याय्य हक्कांचे विधेयक अंतर्भूत होते. इतर दोन राज्यघटना अमेरिका आणि आयर्लंडमध्ये होत्या.

भारतातील सामाजिक, आर्थिक आणि भाषिक

विविधतेमुळे केवळ ब्रिटिशच नव्हे, तर अनेक भारतीयदेखील भारतात लोकशाही रचना आणि संस्था यशस्वीरित्या मूळं धरू शकतील की नाही याविषयी साशंक होते. सर्वांत मोठे आव्हान होते ते अठराविश्वे दारिद्र्य आणि सामाजिक -आर्थिक असमानतेच्या भोवऱ्यात सापडलेल्या बहुसंख्य लोकांचे ! अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये १९४६ साली स्थापन झालेल्या घटना समितीला स्वतंत्र सार्वभौम भारतासाठी राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे अति कठीण काम सुरू करावयाचे होते.

राज्यघटनेमध्ये उचलून धरलेल्या उच्च आदर्शांचे प्रतिबिंब सरनामा, त्याचबरोबर मूलभूत हक्क, राज्यांच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये इत्यादी भागांमध्ये पडलेले दिसते.

## १.२ विषय-विवेचन

### १.२.१ भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान

#### १.२.१.१ घटना समिती

साधारणपणे सार्वभौम लोकशाही राष्ट्रांची राज्यघटना तयार करण्याचे काम लोकप्रतिनिधींचे मंडळ करत असते. अशा मंडळांचा हेतूच राज्यघटना तयार करणे आणि ती अंगीकारणे असा असतो. आपल्याकडेदेखील आपली राज्यघटना तयार करण्यासाठी अशी घटना समिती होती.

दिनांक १९ नोव्हेंबर १९३९ रोजीच्या 'हरिजन' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या 'The Only War' या लेखामधून महात्मा गांधीजींनी भारतासाठी अशा लोकप्रतिनिधींच्या मंडळाच्या आवश्यकतेवर जोर दिला होता. ते म्हणाले, ''देशाला अनुरूप अशी आणि लोकांच्या इच्छांचे खऱ्या अर्थाने आणि पूर्णपणाने प्रतिनिधित्व करणारी राज्यघटना केवळ घटना समितीच निर्माण करू शकते.'' जातीविषयक आणि इतर समस्यांवर न्याय्य तोडगा काढण्यासाठी घटना समिती हाच एकमेव मार्ग आहे असे त्यांनी जाहीरपणे म्हटले. १९४० सालच्या 'ऑगस्ट ऑफर' मधून ब्रिटिश सरकारने घटना समिती स्थापन करण्याची मागणी प्रथमच अधिकृतरित्या स्वीकारली.

त्यानंतर कॅबिनेट मिशनने घटना समितीची शिफारस केली. ती नोव्हेंबर १९४६ मध्ये, २९६ जागांसाठी अप्रत्यक्ष निवडणुकांद्वारे अस्तित्वात आली. घटना समितीचे स्थायी अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांना निवडून देण्यात आले. ते पुढे स्वतंत्र भारताचे राष्ट्रपतीदेखील झाले. १९४७ साली या घटना समितीला राज्यघटना तयार करण्यासाठी सर्वतोपरी अधिकार देण्यात आले. त्या अनुषंगाने डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समिती नेमण्यात आली. राज्यघटना तयार करण्याचे भव्य कार्य तीन वर्षांच्या आत पूर्ण करण्यात आले.

वर्तमान भारतीय संदर्भात, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर आणि घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या दिनांक २५ आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी झालेल्या, भाषणांमधून ध्वनित झालेला सावधगिरीचा इशारा आणि शहाणपणाचे शब्द यांची दखल घेणे उचित ठरेल.

- **डॉ. आंबेडकर**

''मला वाटते, राज्यघटना कितीही चांगली असली तरी ती अमलात आणणारी मंडळी जर वाईट असतील तर तिची फलनिष्पत्ती निश्चितच वाईट होईल. राज्यघटनेची फलनिष्पत्ती ही पूर्णपणे राज्यघटनेच्या स्वरूपावर अवलंबून नसते. राज्यघटना केवळ राज्याला विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका अशी साधने उपलब्ध करून देऊ शकते. या साधनांचे कार्य लोक आणि त्यांच्या इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी उभारलेले राजकीय पक्ष आणि त्यांचे राजकारण यावर अवलंबून असते. भारतीय लोक आणि त्यांचे पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल ?''

''अनेक जाती आणि अनेक पंथ या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रूंमध्ये भर म्हणून आपल्याकडे विविधता असणारे आणि विरोधी राजकीय पंथांचे अनेक राजकीय पक्ष असतील. भारतीय हे त्यांच्या पंथापेक्षा देशाला वरचढ

स्थान देतील की देशापेक्षा पंथाला श्रेष्ठ मानतील ? मला माहीत नाही. परंतु एवढे मात्र नक्की की, जर राजकीय पक्षांनी पंथाला देशाहून वरचढ मानले तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात येईल आणि बहुतकरून आपण आपले स्वातंत्र्य कायमचे गमावून बसू. अशा संभाव्य धोक्यापासून आपण निग्रहपूर्वक आपले रक्षण केले पाहिजे. आपल्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचा निश्चय केला पाहिजे.''

**● डॉ. राजेंद्र प्रसाद**

समारोपाच्या भाषणात डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी बोलून दाखविले की, त्यांनी एकंदरीत एक चांगली राज्यघटना लिहिली आहे. अशी राज्यघटना देशाची चांगली सेवा करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तथापि ते पुढे म्हणाले, ''जर निवडून आलेले लोक सक्षम, चारित्र्यवान आणि सचोटीचे असतील, तर अगदी सदोष राज्यघटनेतूनही त्यांना उत्तम फलनिष्पत्ती होईल. जर त्यांच्यात वर नमूद केलेल्या गुणांचा अभाव असेल तर राज्यघटना देशासाठी काहीही करू शकणार नाही. शेवटी, राज्यघटना ही यंत्राप्रमाणे एक निर्जीव वस्तू आहे. तिला नियंत्रित करणाऱ्या आणि ती राबवणाऱ्या माणसांमुळे ती सजीव होते. आज भारताला इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा देशाचे हित पाहणाऱ्या प्रामाणिक माणसांची गरज आहे. आपल्या जीवनातील विविध घटकांमुळे विघटनवादी प्रवृत्ती वाढीस लागत आहे. आपल्याकडे जातिभेद, पंथभेद, भाषाभेद, प्रांतिक भेद आणि इतरही भेद आहेत. अशा स्थितीत चारित्र्यसंपन्न, दूरदृष्टी असणारी माणसे, तसेच छोट्या गटांसाठी आणि प्रांतासाठी देशहित पणाला न लावणारी आणि या भेदभावांतून उत्पन्न झालेल्या पूर्वग्रहांवर मात करू शकण्याचे सामर्थ्य असलेली माणसे आवश्यक असतात. देशात अशी माणसे विपुल प्रमाणात निपजतील अशी आपण केवळ आशा करू शकतो.''

घटना समितीने नवीन राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या स्वाक्षरीने स्वीकारली आणि दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी ती अमलात आली. तोच दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो.

अमेरिका, ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि आयर्लंड यासारख्या इतर लोकसत्ताक देशांतील राज्यघटनांच्या अनुभवांपासून धडे घेण्याचा फायदा घटना समितीच्या सदस्यांना मिळाला. त्यांनी त्या अनुभवांना भारतातील परिस्थिती आणि सामाजिक, आर्थिक गरजांच्या संदर्भातून आकार देण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीजींच्या मते, स्वातंत्र्याची खरी परीक्षा नेहमीच त्याचा गरिबातील गरीब व्यक्तीला काय लाभ झाला यावरून होते. ''लाखो भुकेल्यांना जे काही उपयोगी पडू शकते त्यामध्ये मला सौंदर्य दिसते. सर्वप्रथम आज जीवनावश्यक वस्तू देऊ यात सर्व ईश्वरी कृपादृष्टी आणि जीवनालंकार त्यामागून येतील.'' ''प्रत्येक डोळ्यातून अश्रूचा थेंब न थेंब पुसून टाकणे'' हीच त्यांची महत्त्वाकांक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनी भारतीय लोकांच्या अतीव इच्छांचा जो अन्वयार्थ लावला त्याचे प्रतिबिंब घटनात्मक तरतुदींमध्ये पडलेले दिसते. राज्याकडे सामाजिक अन्याय दूर करणारे, मानवनिर्मित असमानतेचे उच्चाटन करणारे आणि लोकांना समाजकल्याणाची हमी देणारे शक्तिशाली साधन या दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे.

राज्यघटना ही २२ भाग, ३९५ कलमे आणि १२ परिशिष्टांमधून विभागलेली आहे. राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणाविषयक मार्गदर्शक तत्त्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याबरोबर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये नमूद करणारा भाग चार 'अ' महत्त्वाचा आहे, कारण हक्क हे कर्तव्याशिवाय अपूर्ण असतात. आपल्या राज्यघटनेच्या शाश्वत संदेशाचे सार ''सर्व मानवजात जन्मत:च मुक्त आणि समान असते'' हेच आहे.

## १.२.२ सरनाम्याचे (Preamble) महत्त्व

भारतीय राज्यघटनेचा सरनामा असा आहे -

> **भारताचे संविधान**
>
> **उद्देशिका**
>
> **आम्ही,** भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
> समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
> व त्याच्या सर्व नागरिकांस :
> सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय;
> विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
> व उपासना यांचे स्वातंत्र्य;
> दर्जाची व संधीची समानता;
> निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
> आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
> व राष्ट्राचे एकता आणि एकात्मता
> यांचे आश्वासन देणारी बंधुता
> प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
> आमच्या संविधानसभेत
> आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
> याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
> करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

इंग्रजीतील Preamble या शब्दाचा मराठी समानार्थी शब्द म्हणून आपणांस इतर काही शब्द वापरता येतील, उदाहरणार्थ 'उद्देशिका', 'प्रस्तावना' 'प्रास्ताविका' किंवा 'भूमिका' इत्यादी. मात्र 'सरनामा, हा शब्द जास्त रूढ व प्रचलित असल्यामुळे आपण येथे 'सरनामा' याच शब्दाचा वापर करू यात.

राज्यघटनेला सरनामा असलाच पाहिजे असे बंधन किंवा तसा प्रघात नाही. तथापि राज्यघटनेची मूलतत्त्वे आणि तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब त्यात असावे म्हणून भारतीय राज्यघटनेच्या कर्त्यांना सरनामा असणे गरजेचे वाटले. भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा अमेरिकेच्या राज्यघटनेवरून घेतलेला आहे. जिथे लोक सर्वश्रेष्ठ असून सरकार हे प्रातिनिधिक आणि लोकांना जबाबदार असणारे सरकार असते अशी समाजव्यवस्था हे राज्यघटनेच्या

सरनाम्याचे ध्येय आहे. आपल्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक न्यायनिर्णयांमधून राज्यघटनेच्या सरनाम्याचे महत्त्व आणि उपयुक्तता सांगितली आहे.. राज्यघटनेचा सरनामा हा राज्यघटनेचे मूलभूत तत्त्वज्ञान आणि राज्यघटनेच्या कर्त्यांची मने जाणून घेण्याची गुरुकिल्ली मानली गेली आहे. जरी सरनाम्याच्या अंमलबजावणीसाठी न्यायमंदिरात दाद मागता येत नसली तरी लिखित राज्यघटनेसाठी सरनाम्यामुळे तीन महत्त्वाच्या हेतूंसाठी उपयोगी पडतो.

प्रथम, सरनामा स्पष्टपणे अधिकाराचा स्रोत सांगतो. तो म्हणजे - भारतीय लोक सरनाम्याचे सुरुवातीचे शब्द ''आम्ही, भारताचे लोक'' हे दर्शवतो की, भारताच्या सरकारचे अधिकार हे लोकांपासून प्राप्त होतात. भारताच्या सरकारास आणि राज्यांना जी ताकद दिली गेली आहे, ती कुणा विशिष्ट मंडळाने प्रदान केलेली नाही तर भारतीय लोकांनी प्रदान केलेली आहे.

दुसरे, सरनाम्यामध्ये लोकांच्या उत्कट इच्छा आणि त्या उत्कट इच्छा ज्या आदर्शांच्या आधारे पूर्ण करावयाच्या आहेत, ते आदर्श समाविष्ट केलेले आहेत. भारत देश हा सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे. परंतु ही उद्दिष्टे न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, ऐक्य आणि देशाची अखंडता या मूल्यांसह साध्य करावयाची आहेत.

शेवटी, सरनाम्यामध्ये कायदा केल्याबाबतचे कलम म्हणजे राज्यघटना कधी तयार झाली किंवा अंगीकारली त्या तारखेचाही समावेश आहे. अशा रितीने सरनामा केवळ राज्यघटनेची तोंडओळख नसून त्यास संपूर्ण राज्यघटनेचा सारांश मानले जाते.

सरनाम्याचे महत्त्व विशद करताना केशवानंद भारती वि. केरळ राज्य या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ''राज्यघटनेचा सरनामा हे राज्यघटनेचे अविभाज्य अंग आहे.''

### १.२.२.१ सार्वभौम

सार्वभौमत्व हा स्वतंत्र राज्याचा विशेष गुणधर्म आणि लक्षण असते.ते राज्याला सर्वोच्च शक्ती किंवा अंतिम अधिकार असल्याचे दर्शवते. साध्या शब्दांत सांगायचे तर, देश त्याच्या मुलखाबाहेरील कोणाचाही अधिकार मान्य करीत नाही आणि मुलखांतर्गत तेच सर्वोच्च असतात. परंतु, वर्तमान जगात सार्वभौमत्वावर अनेक नैतिक आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर निर्बंध असतात, त्यामुळे कोणताही देश पूर्णपणे सर्वोच्च नसतो. ५१ वे कलम सांगते की, भारतात सरकारने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वृद्धिंगत करावी, राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायाचे आणि आदराचे नाते राखावे, आंतरराष्ट्रीय कायदा आणि तह यांच्याविषयी आदर बाळगावा, संघटित लोकांचे आपसातील व्यवहार बंधनकारक मानावे आणि लवादांमार्फत आंतरराष्ट्रीय तंटे मिटविण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. अशा रीतीने, राज्यघटनेतील सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा कलम ५१ सह विचार केल्यास विश्वशांतीचे संवर्धन करण्याचा संदेश ध्वनित होता. अशा रीतीने मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी हरेक प्रयत्न केले पाहिजेत. भारतीय सार्वभौमत्वाची संकल्पना 'एक विश्व', 'आंतरराष्ट्रीय शांतता' आणि 'स्नेहभाव' या संकल्पनांशी मिळतीजुळती आहे.

### १.२.२.२ समाजवादी

भारतीय राज्यघटनेचा सरनामा राज्यघटनेच्या समाजवादी दृष्टिकोनावर जोर देतो. समाजवादाची व्याख्या ऑक्सफर्ड लघु शब्दकोशामध्ये अशी केली आहे- 'उत्पादन, भांडवल, जमीन, संपत्ती, इत्यादींच्या साधनांची मालकी आणि नियंत्रण हे पूर्णपणे समाजाकडे असावे आणि त्यांचा कारभार आणि वितरण सर्वांच्या हितासाठी व्हावे, या मताचे समर्थन करणारे सामाजिक संघटन असावे असा सिद्धांत किंवा धोरण.'

'समाजवादी' या शब्दाची नेमकी व्याख्या नाही. लोकशाही असो की साम्यवादी, दोन्ही प्रकारच्या राज्यघटनांमध्ये ही संकल्पना वापरली गेली आहे. साधारणपणे याचा अर्थ उत्पादनाच्या साधनांवर राज्याचे पूर्णपणे किंवा अंशतः नियंत्रण असणारी शासनव्यवस्था असा होतो. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, समाजवादाचा मूळ हेतू लोकांना सन्मानपूर्वक

जीवन जगता येईल असे वातावरण उपलब्ध करून देणे, विशेषत: पाळण्यापासून ते स्मशानभूमीपर्यंत सुरक्षितता उपलब्ध करून देणे, हा असतो. त्याचे ध्येय आर्थिक समानता आणि आर्थिक उत्पन्नाचे समान वाटप या बाबी साध्य करण्याचे असते. तथापि, भारतीय राज्यघटना समाजवादी रचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकशाही साधने पुरविते. त्यांना राज्याच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्थान दिलेले आढळते.

### १.२.२.३ धर्मनिरपेक्ष

धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेचा मूलभूत गुणधर्म आहे. भारतीय राज्यघटनेच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपावर जोर देण्याच्या दृष्टिकोनातून १९४२ साली २२ व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये 'धर्मनिरपेक्ष' हे विशेषण नव्याने घालण्यात आले. युरोपियन परंपरेनुसार 'धर्मनिरपेक्ष राज्य' म्हणजे धर्मापासून राज्याची फारकत. तथापि, भारतीय वास्तवाच्या संदर्भातून त्याला दोन अर्थ आहेत. एका बाजूला, राज्य कोणत्याही धर्माचा अनुनय करत नाही. दुसऱ्या बाजूला, त्याचा अर्थ असा ही होती की, राज्यासाठी सर्व धर्म समान आहेत (सर्वधर्म समभाव).

सर्व धर्मांविषयी राज्याच्या तटस्थतेची हमी दिली आहे. ती अशी -

(१) अगदी परकीयांसह सर्व व्यक्तींना कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण देऊन,

(२) धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावरून भेदभावापासून किंवा पूर्णपणे किंवा अंशत: सार्वजनिक निधीचा विनियोग होणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी व्यक्तीस अपात्र ठरवणे, कुठलीही ज़बाबदारी, बंधन किंवा अटीशर्तींपासून नागरिकांना संरक्षण देऊन,

(३) धर्माच्या नावाखाली भेदभाव न करता संधीची समानता देऊन.

यापुढे जाऊन प्रत्येक व्यक्तीस किंवा समूहास त्याचा किंवा तिचा धर्म प्रतिज्ञापित करण्याचा, पाळण्याचा आणि प्रसार करण्याचा हक्क असे धार्मिक स्वातंत्र्य आहे. जिथे सदसद्विवेक वापरण्याच्या स्वातंत्र्याची हमी असते, म्हणजे तिथे कुणीही आपला धर्म इतरांवर लादू शकत नाही. धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना लोकशाही रुजण्यासाठी आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे केवळ भिन्न श्रद्धांचे शांततापूर्ण साहचर्य नव्हे, तर राज्याने आणि नागरिकांनी प्रत्येक नागरिकाकडे समूहाचा एक भाग म्हणून न पाहता त्याचा स्वत:चा हक्क असलेली स्वतंत्र व्यक्ती या नात्याने पाहिले पाहिजे. या त्यांच्या कर्तव्याचे ते दृढवचन आहे.

अनंत काळापासून भारतात अनेक धर्म एकत्र नांदत असले तरीही आपली लोकशाही यशस्वी करण्यासाठी एक जीवनपद्धती म्हणून धर्मनिरपेक्षतेचे मूल्य रुजवले पाहिजे. या अर्थाने विचार केल्यास जिथे प्रत्येकजण एकमेकांच्या धर्माचा आदर बाळगतो, अशा लोकसत्ताक समाजासाठी ते एक साध्यच नव्हे तर साधनही आहे.

### १.२.२.४ लोकशाही

राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये 'लोकशाही' ही संज्ञा मतदानाच्या हक्कापुरती मर्यादित न ठेवता बहुसमावेशक अर्थाने वापरली गेली आहे. याचा अर्थ स्वत:च्या उत्कट इच्छा-आकांक्षा पूर्ण करून घेण्यासाठी लोक अंतिमत: राज्य चालवितात. भारतीय राज्यघटना अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे समर्थन करते. त्यामध्ये ठरावीक काळानंतर मुक्त आणि नि:पक्ष न्याय्य निवडणुकांची तरतूद आहे. धर्म, वंश, वर्ण, निवासाचे स्थान, लिंग आणि यासारख्या इतर कारणांसाठी भेदभाव करण्यास राज्याला प्रतिबंध केलेला आहे. सरकार चालविण्याचे सर्वाधिकार लोकशाही पद्धतीने लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातात असतात. लोकशाहीच्या संकल्पनेत राजकीय लोकशाहीबरोबर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीदेखील अभिप्रेत आहे. म्हणून राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय; विचारांचे, अभिव्यक्तीचे, विश्वासाचे, श्रद्धेचे आणि

उपासनेचे स्वातंत्र्य; एकसमान जीवनमान आणि संधी आणि बंधुता यावर भर दिलेला आहे. नागरिकांच्या निर्णायक सहभागाविना लोकशाही प्रत्यक्षात येणे अशक्य आहे. त्यात असा सहभाग सहजशक्य करणारी परिस्थिती निर्माण करण्याचा विचार ओघाने येतोच. सशक्त लोकशाही व्यवस्थेसाठी नागरिकांचे नागरी शिक्षण, नेतृत्व, प्रशिक्षण आणि नैतिकता आणि मूल्ये बिंबवणे आवश्यक आहे. लोकसत्ताक स्वरूपाच्या सरकारचे यशस्वी संचलन झाले म्हणजे नि:संशयपणे मानवी हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणी होईल.

### १.२.२.५ न्याय

मानवी हक्कांच्या सर्व पैलूंना न्यायाची संकल्पना व्यापून टाकते. तीत परमोच्च मानवी कल्याण प्रतिबिंबित होते.

राज्यघटनेचा सरनामा सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे आश्वासन देतो. मतदानाच्या हक्काद्वारे राजकीय न्यायाची हमी मिळते. सामाजिक आणि आर्थिक न्याय, हा राजकीय न्याय आणि नागरिकांमधील असमानता दूर करण्यामध्ये राज्याची सकारात्मक भूमिका याद्वारे प्राप्त केला जातो. आर्थिक न्यायाच्या संकल्पनेत समाजवादी समाजरचना आणि अस्पृश्यता, जातिव्यवस्था यासारख्या सामाजिक दुष्ट रुढींचे उच्चाटन अपेक्षित आहे. एकटा कायदा असे परिणाम साधू शकत नाही. सामाजिक न्यायाच्या परिपूर्तीसाठी स्वातंत्र्याबरोबर सामाजिक आणि आर्थिक समानतेची समज असणे गरजेचे आहे. कुठल्याही ठिकाणी राहण्याच्या, लोकांचे सुखसमाधान वृद्धिंगत करण्याच्या ध्येयासाठी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर सर्व प्रकारे सामाजिक न्यायाचे उपाय केले जातात.

राज्यघटनेचे संस्थापक, जनक पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांना स्पष्ट कल्पना होती की, आर्थिक न्यायाविना राजकीय न्याय मिळणे अर्थशून्य आहे. धार्मिक, जाती आणि सांप्रदायिक भेदभावांचे प्राबल्य असलेल्या या समाजात सामाजिक न्यायाशी सांगड घातल्याखेरीज निव्वळ आर्थिक न्याय मिळणे पुरेसे नाही. डॉ. आंबेडकर म्हणाले होते, ''२६ जानेवारी १९५० रोजी आपण विसंगतींनी युक्त असलेले जीवन अंगीकारणार आहोत. राजकारणांत आपल्याकडे समानता असेल आणि सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपल्याकडे असमानता असणार आहे. राजकारणामध्ये आपण 'एक माणूस एक मत आणि एक मत एक मूल्य' या तत्त्वाला मान्यता देऊ. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आपल्या सामाजिक आणि आर्थिक रचनेमुळे 'एक माणूस एक मूल्य' हे तत्त्व नाकारीत राहणार आहोत.''

### १.२.२.६ स्वातंत्र्य

राज्यघटना सर्व नागरिकांना विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य असल्याचे आश्वासन देते. असे स्वातंत्र्य, म्हणजे व्यक्तीच्या वर्तनावर जुलमी आणि फाजील निर्बंधाचा अभाव असणे,ही लोकशाहीची महत्त्वाची अट आहे. भारतातील राज्यघटना सकारात्मक आणि व्यापक दृष्टिकोनातून स्वातंत्र्याला मान्यता देते. समाजातील इतरांच्या स्वातंत्र्याविषयी आदर बाळगत स्वत:चे स्वातंत्र्य उपभोगायचे असते. भारतीय राज्यघटना लोकांच्या मूलभूत अधिकाराच्या रक्षणासाठी न्यायपालिका स्वतंत्र राहील असे आश्वासन देते. स्वातंत्र्य या संकल्पनेमध्ये मानवी हक्क आणि कर्तव्य यांची गोळाबेरीज अंतर्भूत आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातून प्रदान केलेले मूलभूत अधिकार स्वातंत्र्याची हमी देतात.

### १.२.२.७ समानता

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे तिसरे उद्दिष्ट सर्व नागरिकांना समान जीवनमान आणि संधींची निश्चितता देणे हे आहे. राज्यघटनेच्या कम १४ ते १८ मध्ये समानतेची संकल्पना आढळते. समता ही नाना प्रकारचे गर्भितार्थ असलेली संकल्पना आहे. राज्यघटनेची भूमिका सर्वांना एकसमान जीवनमानाचे आणि संधीच्या समानतेचे आश्वासन देते. व्यक्तीच्या विकासासाठी समानता आवश्यक आहे. भेदभावरहीत व्यक्तिमत्त्व विकासासाठी

समानता फार आवश्यक आहे. समानता असणे म्हणजे वंश, वर्ण, धर्म, जात, भाषा, लिंग, राजकीय मत किंवा दर्जा यावरून भेदभाव अस्तित्वात नसणे. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

### १.२.२.८ बंधुभाव

ब्रिटिश सरकारचा छळ सोसलेला असल्यामुळे राज्यघटनेचे कर्ते बंधुभावाचा आदर्श किती महत्त्वाचा आहे हे जाणून होते. त्यांनी ब्रिटिश सत्तेचा अनुभव घेतलेला होता आणि देशाला फाळणीकडे नेणाऱ्या घटना जवळून बघितलेल्या होत्या. त्यामुळेच राज्यघटनेच्या कर्त्यांनी बंधुभावाचा आदर्श अंगीकारला. बंधुभावाचे तत्त्व फ्रेंच राज्यघटनेकडून आपण घेतलेले आहे. बंधुभाव म्हणजे सर्व देशवासीयांचा भ्रातृभाव. बंधुभाव म्हणजे असे 'परस्पर प्रेम' की, ज्यामुळे इतरांनी एखाद्यासाठी काय करावे असे वाटणे तेच त्याने इतरांसाठी करावे किंवा तसे वागावे याकडे माणसाचा कल असणे होय. हे असे तत्त्व आहे जे ऐक्य आणि समाजजीवनात दृढ संबंध प्रस्थापित करते. बंधुभाव प्राप्त करणे अवघड असेल परंतु त्याविना, स्वातंत्र्य आणि समानता हे दोन्ही एखाद्या रंगाचा थर असावा तितकेच वरवरचे राहतील. जर या देशाला एक राष्ट्र म्हणून अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर लोकांमध्ये बंधुभाव रुजविणे आवश्यक आहे.

### १.२.२.९ ऐक्य आणि अखंडता

भारतीय राज्यघटनेचा सरनामा राष्ट्राच्या ऐक्य आणि अखंडतेवर जोर देतो. ४२ व्या घटनादुरुस्तीने हे शब्द राज्यघटनेमध्ये नव्याने घालण्यात आले. देशामध्ये दुफळी माजवणाऱ्या अनेकानेक शक्ती आहेत. देशाचे ऐक्य आणि अखंडता कायम राखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले पाहिजेत. त्याविना उल्लेखनीय प्रगती होणे शक्य नसते. जर देशात ऐक्य टिकले तरच लोक प्रगती करू शकतील.

भारतीय राज्यघटनेचा सरनामा महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत साकार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

"असा भारत जिथे गरिबातल्या गरीब माणसाला असे वाटते की, हा त्याचा देश आहे, ज्याच्या निर्माण कार्यात त्याला निर्णायक आवाज आहे, असा भारत जिथे सर्व समान गुण्यागोविंदाने राहतील. अशा भारत देशात अस्पृश्यतेचा किंवा उत्तेजक पेय आणि मादक पदार्थांचा शाप नसेल. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान अधिकार उपभोगता येतील."

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची उद्दिष्टे सांगा.

(२) भारतीय राज्यघटनेची मूलभूत मूल्ये कोणती ?

(३) भारत हे सार्वभौम आणि धर्मनिरपेक्ष राज्य आहे काय ?

**(आ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(१) भारताच्या सरकारचे अधिकार भारताची ............ प्रदान करते.

(२) भारतीय राज्यघटना .......... भागांमध्ये आणि ......... कलमांमध्ये विभागलेली आहे.

## १.३ सारांश

१९४७ साली घटना समितीला राज्यघटना तयार करण्यासाठी सर्वतोपरी अधिकार देण्यात आले. त्या अनुषंगाने डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समिती नेमण्यात आली. नवीन राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या स्वाक्षरीने घटना समितीने स्वीकारली आणि दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. तोच दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. राज्यघटना ही २२ भाग, ३९५ कलमे आणि १२ परिशिष्टे यामध्ये विभागलेली

आहे. राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा व राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. सरनामा राज्यघटनेचे ध्येय आणि उद्दिष्टे सांगतो. त्यात राज्यघटनेचे मूलभूत तत्त्वज्ञान प्रतिबिंबित होते.

भारत देश हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य असल्याचे जाहीर झाले आहे, परंतु ही उद्दिष्टे न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि ऐक्य आणि देशाची अखंडता या मूल्यांसह साध्य करावयाची आहेत.

जिथे लोक सर्वश्रेष्ठ असून सरकार हे प्रातिनिधिक आणि लोकांना जबाबदार असणारे असते. अशी समाजव्यवस्था हे सरनाम्याचे ध्येय आहे. राज्यघटनेचा सरनामा हा राज्यघटनेचे मूलभूत तत्त्वज्ञान असून त्यास राज्यघटनेच्या कर्त्यांची मने जाणून घेण्याची गुरुकिल्ली मानले गेले आहे. अनेक खटल्यांमध्ये, राज्यघटनेतील तरतुदींचा अन्वयार्थ लावण्यासाठी अगदी न्यायालयांनीदेखील सरनाम्याचा वापर केलेला आहे. सरनामाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयातून दाद मागता येत नाही. सरनामाही स्पष्टपणे भारतीय लोक हेच अधिकाराचा स्रोत आहेत असे सांगतो. सरनाम्यामध्ये लोकांच्या उत्कट इच्छा आणि त्या उत्कट इच्छा ज्या आदर्शांच्या आधारे पूर्ण करावयाच्या आहेत ते आदर्श समाविष्ट केलेले आहेत. अशा रीतीने सरनामा ही केवळ राज्यघटनेची तोंडओळख नसून त्यास संपूर्ण राज्यघटनेचा सारांश मानले जाते.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**सरनामा :** कायद्याच्या कर्त्यांचे मन उलगडून दाखविणारे काही कायद्यांच्या प्रारंभी असणारे कथन, विधान. कायद्याची तोंडओळख, दस्तऐवज किंवा वटहुकूम. हा कायदा करण्यामागचे कारण आणि हेतू सांगतो किंवा स्पष्टीकरणाच्या हेतूने वापरला जातो.

**सार्वभौम :** याचा अर्थ देश पूर्णपणे स्वतंत्र आहे आणि सरकारच्या निर्णयप्रक्रियेत कोणतेही बाह्य निर्बंध नाहीत.

**समाजवाद :** साधारणपणे जेथे उत्पादनाची साधने पूर्णपणे समाजाच्या मालकीची असतात आणि ती समाजात साधनांच्या समान वितरणासाठी वापरली जातात.

**धर्मनिरपेक्ष राज्य :** निधर्मी, धार्मिक नसलेले राज्य.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न***

**(अ)** (१) जिथे लोक सर्वश्रेष्ठ असून सरकार हे प्रातिनिधिक आणि लोकांना जबाबदार असलेले असेल अशी समाजव्यवस्था हे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे उद्दिष्ट असून सरनामा धर्मनिरपेक्षता न्याय आणि स्वातंत्र्याचा आग्रह धरतो आणि त्यास मान्यता देतो.

(२) भारतीय राज्यघटनेची मूलभूत मूल्ये न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव देशाचे ऐक्य आणि अखंडता ही होत.

(३) होय, भारत हे सार्वभौम आणि धर्मनिरपेक्ष राज्य आहे.

**(आ)** (१) भारतीय राज्यघटना

(२) २२ , ३९५

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतीय राज्यघटनेसाठी सरनाम्याचे महत्त्व सांगा.

(२) 'न्याय' आणि 'सार्वभौम' या संकल्पना स्पष्ट करा.

(३) सर्वांना मानवी हक्कांची खात्री देताना धर्मनिरपेक्षता महत्त्वाची का ठरते ?

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) ए.लक्ष्मीनाथ, बेसिक स्ट्रक्चर अँड कान्स्टिट्युशनल अमेन्डमेंटस्

(२) व्ही.डी. महाजन, कॉन्स्टिट्युशनल लॉ ऑफ इंडिया

(३) कश्यप सुभाष सी, अवर कॉन्स्टिट्युशन, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# घटक २ : मूलभूत हक्क : समानतेचा हक्क

*अनुक्रमणिका*


२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
२.२.१ मूलभूत हक्क म्हणजे काय ?
२.२.१.१ मूलभूत हक्क आणि मानवी हक्क
२.२.१.२ मूलभूत हक्कांची आवश्यकता
२.२.१.३ मूलभूत हक्कांची गुणवैशिष्ट्ये
२.२.१.४ मूलभूत हक्क आणि सर्वसामान्य हक्क
२.२.१.५ मूलभूत हक्कांवरील निर्बंधाची कारणे
२.२.२ समानतेचा हक्क (कलम १४ ते १८)
२.२.२.१ कायद्याने केलेले वर्गीकरण
२.२.२.२ धर्म, इत्यादी कारणांवरून भेदभावास प्रतिबंध (कलम १५)
२.२.२.३ सार्वजनिक सेवांमध्ये संधीची समानता (कलम १६)
२.२.२.४ अस्पृश्यतेचे निर्मूलन (कलम १७)
२.२.२.५ किताबांचे (पदव्यांचे) निर्मूलन (कलम १८)
२.३ सारांश
२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

★ भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे महत्त्व आणि आवश्यकता स्पष्ट करता येईल.

★ मूलभूत हक्क आणि सर्वसाधारण हक्क यांमधील फरक सांगता येईल.

★ भारतीय राज्यघटनेतील विविध मूलभूत हक्कांचे वर्णन करता येईल.

★ मूलभूत हक्क हिरावून घेता येतात का ? ते स्पष्ट करता येईल.

★ कोणत्याही मूलभूत हक्काचे उल्लंघन झाल्यास उपलब्ध असलेल्या उपायांवर चर्चा करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

मानवी हक्कांना मिळालेली मान्यता आणि त्यांचा इतिहास रोचक आहे. हक्क म्हणून सर्वप्रथम जीविताच्या हक्कालाच मान्यता मिळाली असावी. जीवनात शिक्षण आणि सचोटी याद्वारे स्वातंत्र्याचे मोल समजून येते. 'समस्त मानव जात जन्मतःच स्वतंत्र आणि समान आहे.' जगातील सर्व लोकशाही राज्यघटनांनी हीच संकल्पना स्पष्ट केली, तिचेच अभिवचन दिले आणि याच संकल्पनेची घोषणा केली. फार पूर्वीपासून ज्यांना मान्यता मिळावी म्हणून झगडावे लागले, त्या मूलभूत हक्कांना खरी ओळख आणि मान्यता भारतीय राज्यघटनेने दिली. भारतीय राज्यघटनेने भाग तीनमध्ये काही हक्कांना मूलभूत हक्क म्हणून घोषित केले आहे.

प्रत्येकाला मानवी हक्क प्राप्त आहेत अशी हमी देण्याची गरज आहे, याचे भान राज्य, सरकार आणि लोकांना असेल तेव्हाच राष्ट्र प्रगती करू शकते. भारताच्या संदर्भात बोलायचे तर येथे मानवी हक्कांना मान्यता आहे, त्यांना वरचे स्थान

दिलेले आहे आणि त्यांचा अतिशय सढळपणे अन्वयार्थ लावला गेला आहे. त्यामुळे मानवी हक्कांची व्याप्ती आणि विस्तार वाढलेला आहे.

पुढील घटकांमध्ये मूलभूत हक्कांच्या विविध पैलूंवर तपशीलाने चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.२ विषय-विवेचन

### २.२.१ मूलभूत हक्क म्हणजे काय ?

मुक्त समाजासाठी अपरिहार्य असणारे लोकांचे काही प्रारंभिक मानवी हक्क म्हणजे मूलभूत हक्क. लोकांचे हे हक्क राज्यघटनेने जतन केले आहेत. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी हे हक्क आवश्यक असतात. मूलभूत हक्क हे मानवाचे स्वाभाविक, हिरावून घेता येणार नाहीत असे पवित्र हक्क आहेत.

जेव्हा राज्यघटना लिहिण्यात आली तेव्हा मूलभूत हक्कांना सर्वोच्च प्राथमिकता देण्यात आली. याच हक्कांसाठी आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी आणि राष्ट्रीय नेत्यांनी लढा दिला. या हक्कांना विशेष अशा स्वतंत्र प्रकरणात स्थान दिले आहे आणि अतिपवित्र मानले आहे. त्या अनुषंगाने घटनाकर्त्यांच्या हेतूचे संस्मरण म्हणून कलम १३ चा समावेश केलेला आहे. मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा कोणताही कायदा किंवा प्रशासकीय कृत्य हे घटनाविरोधी ठरते आणि न्यायाधीश हे असा कायदा तसेच असे प्रशासकीय कृत्य रद्दबातल ठरवू शकतात.

डिसेंबर १९४६ मध्ये झालेल्या घटना समितीच्या बैठकीत मूलभूत हक्कांसाठी विशेष समिती तयार करण्यात आली. या समितीने आपला अहवाल सादर केला आणि घटना समितीच्या मसुदा समितीने मूलभूत हक्कांवर अध्याय लिहिला. कोणता हक्क हा मूलभूत हक्क म्हणून राज्यघटनेत समाविष्ट करावा हे ठरविणे ही घटनाकर्त्यांसमोर एक समस्याच होती. मूलभूत आणि राज्यांनी अमलात आणलेच पाहिजे असे अनेक हक्क त्यांच्यासमोर विचारार्थ होते. तथापि, त्यांच्या मार्गात अनेक व्यावहारिक अडचणी होत्या. हे सर्वच्या सर्व हक्क अमलात आणण्यासाठी आवश्यक ती साधने देशाकडे उपलब्ध नव्हती, म्हणून या हक्कांमध्ये मूलभूत हक्क आणि राज्याची धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे असा फरक करण्यात आला. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये यांना मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीचे अधिकार देण्यात आले. मात्र मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयांना अधिकार दिलेले नाहीत. राज्यघटनाकर्त्यांच्या मनावर अमेरिकन राज्यघटनेचे हक्कांचे विधेयक (बिल ऑफ राईटस्), फ्रान्समधील माणसाच्या हक्कांचा जाहीरनामा (डिक्लरेशन ऑफ राईटस् ऑफ मॅन), १९३५ सालची आयरिश राज्यघटना, जपान आणि बर्माच्या युद्धानंतरच्या राज्यघटना, मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा आणि १९२८ च्या नेहरू रिपोर्ट यांचा मोठा प्रभाव होता. तसेच ब्रिटिशांच्या राजवटीत भारतीयांनी जे काही भोगले होते त्याचाही प्रभाव होता. मूलभूत हक्कांमध्ये अल्पसंख्याक, अस्पृश्य आणि इतर मागास समाज यांचादेखील समावेश आहे.

#### २.२.२.१ मूलभूत हक्क आणि मानवी हक्क

मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील पहिले वाक्य असे आहे, 'जगातील स्वातंत्र्य, न्याय आणि शांतता यांचा पाया म्हणजे मानवी हक्क आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर हा आहे.' म्हणून जे हक्क जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात त्या हक्कांना मानवी हक्क मानलेले आहे. ते वैश्विक स्वरूपाचे आहेत. कोणताही भेदभाव न करता केवळ माणूस आहे म्हणून समस्त मानवजातीला हे हक्क उपलब्ध आहेत. मात्र मूलभूत हक्कांची व्याप्ती राष्ट्रीय असते, राज्यघटनेने ज्या मानवी हक्कांना प्रारंभिक हक्क मानलेले असते, त्या हक्कांना मूलभूत हक्क असे म्हणतात. सर्व मूलभूत हक्क हे मानवी हक्क असतात, परंतु सर्व मानवी हक्क हे मूलभूत हक्क नसतात. उदाहरणार्थ, भारतीय संदर्भात कामाचा हक्क, स्वयंनिर्णयांचे हक्क, इत्यादी हे मानवी हक्क आहेत, परंतु ते मूलभूत हक्क नाहीत.

### २.२.१.२ मूलभूत हक्कांची आवश्यकता

लोकांचे हक्क आणि स्वातंत्र्य हे राज्यापासून सुरक्षित राखण्यासाठी मूलभूत हक्कांची आवश्यकता असते. सरकारच्या सामर्थ्याला घातलेल्या मर्यादा म्हणजे मूलभूत हक्क. सार्वजनिक आणि खासगी हक्कांचे जतन करण्यासाठी या हक्कांची आवश्यकता असते. या हक्कांना मूलभूत हक्क म्हटले जाते, कारण ते व्यक्तीला परिपूर्ण बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक दर्जाप्रत पोहोचण्यासाठी आवश्यक असतात. राज्यघटनेने ज्या प्रकारच्या स्वातंत्र्याची हमी दिलेली आहे, त्यांचा आदर केला गेला पाहिजे, याचे स्मरण मूलभूत हक्कांचा जाहीरनामा सत्ताधारी सरकारला करून देत असतो. मूलभूत हक्कांचे उद्दिष्ट माणसांचे नव्हे तर कायद्याचे राज्य स्थापन करण्याचे आहे. तिथे अल्पसंख्याकांवर बहुसंख्याकांच्या जुलमी राजवटीला थारा नसावा. मूलभूत हक्कांचे ध्येय कायद्याचे राज्य स्थापन करण्याचे आहे. आचार, नागरिकत्व, न्याय आणि सरळ वर्तनाची काही एक संहिता त्यांनी पुरवणे अपेक्षित असते. त्यामुळे मूलभूत हक्कांना 'राज्यघटनेची सद्सद्विवेकबुद्धी' किंवा 'राज्यघटनेचा आत्मा' म्हटले जाते. तत्कालीन मुख्य न्यायाधीश पी.बी. गजेन्द्रगडकर यांनी मूलभूत हक्कांची व्याख्या केली ती अशी- ''राज्य आणि व्यक्तीच्या नात्यावर ताबा ठेवणारे, कायद्याने अंमलबजावणी करता येण्याजोगे हक्क. त्याला नकारात्मक आणि सकारात्मक असे दोन्ही पैलू असतात. ते शब्दशः 'मूलभूत'च असावे लागतात. याचा अर्थ केवळ कायद्याने दिला जाऊ शकणारा स्वातंत्र्याचा हक्क नव्हे तर याचा अर्थ, जो सकारात्मक अर्थाने व्यक्तीला त्याचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचे गुण विकसित करण्यासाठी समर्थ करतो आणि व्यक्तीला त्याच्या स्वहितासाठी व एकूणच समाजाच्या हितासाठी जीवन जगण्याचे बळ देतो असा हक्क होय.''

घटना समितीमध्ये मूलभूत हक्कांची आवश्यकता इतक्या चांगल्या रीतीने स्वीकारण्यात आली होती की, राज्यघटनेमध्ये त्यांचा समावेश होणार याविषयी काहीच शंका नव्हती. पण त्याचबरोबर त्या हक्कांवर लादावयाच्या निर्बंधाविरुद्धचे द्वंद होते आणि मूलभूत हक्कांना शक्य तितके उदार आणि व्यापक ठेवण्याचा प्रयत्न होता. भारतामध्ये मूलभूत हक्क हे सर्वांना काही प्रारंभिक नागरी हक्क आणि स्वातंत्र्याचे आश्वासन देतात. त्याशिवाय ते अल्पसंख्याकांना काही सुरक्षाकवच देण्याचे, धार्मिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक हक्कांना संरक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्ये पार पाडतात. तात्पुरत्या स्वरूपाच्या आणीबाणीमध्येच फक्त मूलभूत हक्कांवर मर्यादा घालणे शक्य असते.

कलम १२ ते ३५ ही मूलभूत हक्कांशी संबंधित असलेली कलमे आहेत. कोणतेही हक्क हे निरंकुश असू शकत नाहीत. या हक्कांनादेखील काही निर्बंध आहेत. आपल्या राज्यघटनेत काही हक्क साध्या शब्दांत लिहिलेले आहेत. काही मूलभूत हक्कांच्या बाबतीत अपवाद आणि गुणविशेष हे राज्यघटनेतच सर्वसमावेशक स्वरूपात रचलेले आणि व्यक्त झालेले आहेत; मात्र राज्यघटनेने इतर हक्कांच्या बाबतीत निर्बंध घालण्याचे अधिकार न्यायमंडळाला दिलेले आहेत. परिणामी, मूलभूत हक्क हे केवळ तपशीलवार बनलेले नसून ते गुंतागुंतीचेदेखील झाले आहेत. मूलभूत हक्क हे सरकारवर कमी-अधिक प्रमाणात निर्बंध घालण्यासाठी बनले आहेत. त्यामुळे या हक्कांचा अन्वयार्थ लावताना न्यायालयांना व्यक्तीचे हक्क आणि राज्याचे हक्क असा तोल सांभाळण्याच्या महत्त्वाच्या मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागले आहे.

### २.२.१.३ मूलभूत हक्कांची गुणवैशिष्ट्ये

राज्यघटनेने मूलभूत हक्कांची गुणवैशिष्ट्ये दिलेली आहेत. या हक्कांना उच्चस्थानी ठेवलेले आहे.

- मूलभूत हक्क हे सर्वसाधारणपणे राज्याविरुद्ध उपलब्ध असतात. तिसऱ्या अध्यायात नमूद असलेल्या 'राज्य' (स्टेट) शब्दाची व्याख्या कलम १२ मध्ये केलेली आहे. येथे राज्यामध्ये भारताचे सरकार आणि भारताची संसद आणि राज्यापैकी प्रत्येक राज्याचे विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक आणि अन्य प्राधिकरणे यांचा समावेश होतो.

- **'Ultravires' चे तत्त्व :** कलम १३ स्पष्टपणे सांगते की, भारत देशात राज्यघटना अमलात येण्याच्या वेळी जे कायदे अमलात होते ते 'सर्व कायदे' ते घटनेच्या तिसऱ्या भागात नमूद मूलभूत हक्कांशी विसंगत असल्याने रद्दबातल ठरतील. मूलभूत हक्कांपासून दूर नेणारा किंवा त्यांचा संक्षेप करणारा किंवा त्यांच्याविरुद्ध असणारा कायदा राज्याने केल्यास तो रद्दबातल ठरेल.
- **मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी उपाय :** कलम ३२ हे सर्वोच्च न्यायालयाला मूलभूत हक्कांचे पालक म्हणून नेमते. सर्वोच्च न्यायालयाला मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सूचना किंवा आदेश किंवा हेबियस कॉर्पस, मँडमस, प्रोहिबिशन, को वारंटो आणि सर्शिओराराय या स्वरूपातील याचिका यापैकी जे योग्य असेल ते जारी करण्याचे अधिकार आहेत. जर एखाद्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झालेच, तर उच्च न्यायालयाकडे दाद मागता येते.
- **मूलभूत हक्क हे निरंकुश नसतात :** मूलभूत हक्कांच्या उपभोगावर योग्य असे निर्बंध घातलेले आहेत. उदाहरणार्थ, कलम १९ अन्वये भाषा, विचार आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्य यांचे आश्वासन दिलेले आहे. परंतु या हक्कांचा उपयोग मर्यादित प्रमाणात म्हणजे योग्य निर्बंधाच्या आधीन राहून करावयाचा आहे. ए.के. गोपालन वि. मद्रास राज्य (एआयआर १९५० सु.प्र. २७) मध्ये न्यायमूर्ती बी.के. मुखर्जी यांनी म्हटले आहे की, "निरंकुश किंवा अनियंत्रित, निर्बंधापासून पूर्णपणे मुक्त असे स्वातंत्र्य असू शकत नाही, कारण त्यामुळे अराजक आणि अव्यवस्था माजेल."
- **नागरिक आणि अ-नागरिक यांच्यातील फरक :** काही मूलभूत हक्क सर्वांसाठी आहेत आणि त्यापैकी काही फक्त भारताच्या नागरिकांसाठी आहेत. कलम २१ भारताचे नागरिक असो वा नसो सर्वांना मूलभूत हक्क उलपब्ध करून देते. परंतु कलम १५ आणि १६ केवळ भारतीय नागरिकांना लागू होतात.
- **मूलभूत हक्क हे खासगी पक्षांविरुद्धदेखील उपलब्ध आहेत :** हे लक्षात घ्यावे की, मूलभूत हक्क हे केवळ राज्याविरोधातच नव्हे तर खाजगी पक्षकारांविरुद्धदेखील उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, विशाखा वि. राजस्थान राज्य.
- **परिस्थितीनुसार मूलभूत हक्क निर्बंधित किंवा तहकूब करणे शक्य आहे :** सशस्त्र दलांना किंवा सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याचे काम सोपविलेल्या दलांना, त्यांच्यावर सोपवलेले काम चोख पार पाडता यावे आणि त्यांच्यामध्ये योग्य शिस्तीचे पालन व्हावे यासाठी संसद त्यांचे मूलभूत हक्क ठरवू शकते. राज्यघटनेने बहाल केलेल्या कुठल्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले तरी हे सर्व करता येते.
- **मूलभूत हक्क त्याज्य नाहीत :** मूलभूत हक्कांचा त्याग करून ते सोडून देता येऊ शकत नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने नमूद केलेले आहे.
- **मूलभूत हक्कांत दुरुस्ती करता येते :** राज्यघटनेच्या कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्ती कशी करावी ते नमूद केलेले आहे. केवळ त्याच पद्धतीने मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती किंवा सुधारणा करता येते. ही दुरुस्ती राज्यघटनेच्या मूळ आराखड्याला आधीन राहूनच केली जाते. पूर्वी राज्यघटनेच्या कलम १९ आणि ३१ अन्वये संपत्तीचा हक्क प्रदान केलेला होता. तथापि, १९७८ मध्ये झालेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीने हा मूलभूत हक्क रद्द करण्यात आला आणि तेव्हापासून संपत्तीचा हक्क हा सर्वसाधारण हक्क असून सर्वसामान्य कायद्याने आणि सर्वसामान्य न्यायालयांद्वारे त्याची दखल घेतली जाते.

### २.२.१.४ मूलभूत हक्क आणि सर्वसामान्य हक्क

राज्यघटनेने प्रदान केलेले मूलभूत हक्क आणि सर्वसामान्य हक्क, संसदेने संमत केलेले कायदे आणि राज्यांचे कायदे यांत फरक आहे. राज्यधटनेत तरतूद असल्याखेरीज मूलभूत हक्कांमध्ये संक्षेप करता येत नाही किंवा ते काढून

टाकता येत नाहीत. राज्यघटनेच्या मूलभूत आराखड्याचा भाग नसल्यास मूलभूत हक्कांमध्ये काटछाट करणे किंवा ते काढून टाकणे यासारखी घटनादुरुस्ती करता येते. ज्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले आहे ती व्यक्ती कलम २२६ अन्वये उच्च न्यायालयात किंवा कलम ३२ अन्वये सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकते.

जर सर्वमान्य हक्कांचे उल्लंघन झाले तर देशात अमलात असलेल्या कायद्यामध्ये त्यासाठी उपाय शोधावा लागतो आणि सर्वसामान्य न्यायालयामधून कायदेशीर उपाययोजना करता येतो. सर्वसामान्य हक्क हे कुणीही व्यक्ती तिच्या किंवा त्याच्या निवडीप्रमाणे आणि मर्जीप्रमाणे सोडून देऊ शकते. परंतु हे तत्त्व राज्यघटनेने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांच्या बाबतीत लागू होत नाही.

### २.२.१.५ मूलभूत हक्कांवरील निर्बंधाची कारणे

मूलभूत हक्कांवर ज्या कारणांसाठी निर्बंध घातला येतात, ती वेगवेगळ्या कलमांमध्ये नमूद केलेली कारणे खालीलप्रमाणे -

**(१) राज्याची सुरक्षितता, एकात्मता आणि अखंडता**

राज्याच्या अखंडता, एकात्मता आणि सुरक्षितता यांच्या हितासाठी भाषा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर योग्य निर्बंध लादता येतात. 'राज्याची सुरक्षितता' या शब्दांआधी आलेल्या 'राज्याच्या हितासाठी' या शब्दांमध्ये राज्याला उलथून टाकू शकणाऱ्या कृत्यांचा विचार केला गेला आहे. गंभीर आणि विकोपास गेलेल्या सार्वजनिक अव्यवस्थेचा उदाहरणार्थ, बंड, राज्याविरुद्ध युद्ध पुकारणे, दंगा, अतिरेकी, इत्यादीचे त्यास संदर्भ आहेत, परंतु सर्वसामान्य सार्वजनिक सुव्यवस्थेचा आणि सुरक्षिततेचा भंग उदाहरणार्थ, बेकायदेशीर जमाव, इत्यादी त्यात अभिप्रेत नाही.

**(२) सार्वजनिक सुव्यवस्था आणि सभ्यता पाळणे**

१९५१ मधील पहिल्या दुरुस्ती कायद्याने हे कारण राज्यघटनेमध्ये नव्याने घालण्यात आले. सार्वजनिक सुव्यवस्था ही सर्वसामान्य कायदा आणि सुव्यवस्था पाळण्यापेक्षा अधिक जबाबदारीची असते. सार्वजनिक सुव्यवस्था ही सार्वजनिक शांतता, सुरक्षा आणि स्वस्थता यांचा समानार्थी असते. समाजाच्या सद्यःस्थितीत अस्वस्थता आणणारी कृती म्हणजेच सार्वजनिक सुव्यवस्थेत अस्वस्थता होय. सार्वजनिक स्वस्थता किंवा सार्वजनिक शांततेचा भंग म्हणजेच सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवणे. सभ्यता आणि नैतिकता हे व्यापक अर्थाचे शब्द आहेत. 'अश्लिलता' आणि 'असभ्यता' हे एकमेकांशी तंतोतंत जुळणारे शब्द आहेत. अश्लिलता तपासण्यासाठी, अश्लील म्हणून गणल्या गेलेल्या मजकुराचा कल हा अनैतिक प्रभावांना सहजासहजी बळी पडू शकणाऱ्यांची आणि अशा प्रकारचे साहित्य ज्यांच्या हातांमध्ये पडण्याची शक्यता आहे अशांची मने भ्रष्ट करण्याकडे आणि बिघडवण्याकडे आहे काय ? हे पाहावे लागते. भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ आणि २९४ नुसार असभ्य वर्तन हा शिक्षेस पात्र असा गुन्हा आहे.

**(३) परदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे**

परदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्यासाठी भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर योग्य निर्बंध घालता येतात. मैत्रीचे संबंध असलेल्या परराष्ट्रांविरुद्ध अनियंत्रित निंदा करणाऱ्या प्रचाराला प्रतिबंध करण्याच्या हेतूने असे निर्बंध आवश्यक आहेत. असा प्रचार भारत आणि इतर राज्यांमधील मैत्रीपूर्ण संबंधांसाठी धोकादायक ठरू शकतो.

**(४) न्यायालयाचा अवमान**

न्यायालयाचा अवमान होण्याइतपत जर न्याय्य आणि योग्य मर्यादांचे उल्लंघन केले जात असेल तर भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर योग्य निर्बंध लादता येतात. ही बंधने न्यायमंडळाची स्वतंत्रता जतन करण्यासाठी आणि कुठल्याही हस्तक्षेपाशिवाय न्यायालयांच्या योग्य कारभाराच्या हमीसाठी आणि न्यायालयांचा गौरव आणि अधिकार कायम राखण्यासाठी आवश्यक आहेत. कायद्यानुसार न्यायालयाचा अवमान हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

### (५) बदनामी

भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा उपयोग माणसाच्या प्रतिष्ठेला धक्का लावण्यासाठी म्हणजेच बदनामीसाठी होता कामा नये. उपहास, तिरस्कार आणि अवमान यांना सामोरे जावे लागणे म्हणजे माणसाची बदनामी होणे. भारतीय दंड संहितेच्या कलम ४९९ नुसार बदनामी करणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

### (६) भटक्या जमातींच्या हितासाठी

भारताच्या भूप्रदेशात कुठल्याही भागात मुक्त संचाराच्या नागरिकांच्या हक्कावर भटक्या जमातींच्या हिताच्या संरक्षणासाठी निर्बंध घालता येतात. यामागे बहुतकरून अतिदूर प्रदेशात वसलेल्या आदिम जमातींचे संरक्षण हा हेतू आहे. या जमातींना त्यांची स्वत:ची संस्कृती, भाषा, रूढी आणि परंपरा आहेत. तेथे बाहेरच्यांचा प्रवेश तेथील लोकांवर अनिष्ट परिणाम करू शकतो आणि म्हणून हे निर्बंध आहेत.

### (७) सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गींच्या कल्याणासाठी

राज्यघटनेचे कलम १५(४) आणि कलम १६(४) राज्यांना अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास वर्गांचाही समावेश होणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या वर्गांची प्रगती व्हावी यासाठी विशेष तरतुदी करण्याचे अधिकार देतात. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास लोकांना न्याय देण्याच्या हेतूने हे निर्बंध आहेत.

### (८) स्त्रिया आणि मुलांच्या कल्याणासाठी

स्त्रिया आणि मुलांना नेहमीच अन्याय आणि भेदभावाची वागणूक दिली जाते. अशा अन्यायांपासून आणि इतर मनमानी, भेदभाव करणाऱ्या चालीरीतीपासून स्त्रिया आणि मुलांचे रक्षण करण्यासाठी राज्यांना स्त्रिया आणि मुलांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१*

**(अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

(१) मूलभूत हक्कांची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

(२) मूलभूत हक्कांवरील निर्बंधाची कोणतीही दोन कारणे सांगा.

**(आ) खालील वाक्ये बरोबर की चूक ते सांगा.**

(१) तात्पुरत्या स्वरूपाच्या आणीबाणीमध्ये फक्त मूलभूत हक्कांचा संक्षेप करता येतो.

(२) मूलभूत हक्क म्हणजे सरकारला दिलेले विशेषाधिकार आहेत.

(३) सर्व मूलभूत हक्क हे मानवी हक्क असतात, परंतु सर्व मानवी हक्क हे मूलभूत हक्क नसतात.

## २.२.२ समानतेचा हक्क (कलम १४ ते १८)

भारताच्या प्रत्येक नागरिकाला भारताच्या राज्यघटनेने कलम १४ ते १८ नुसार समानतेच्या हक्काची हमी दिली आहे. कलम १४ नमूद करते की, राज्य कुठल्याही व्यक्तीला कायद्यासमोर समानता किंवा भारतभरात कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही. कलम १४ काळजीपूर्वक वाचल्यास त्यात 'कायद्यासमोर समानता' आणि 'कायद्याचे समान संरक्षण' अशा दोन संकल्पना मांडल्याचे दिसते.

मूलभूत हक्कांची हमी देणाऱ्या जवळपास सर्वच लिखित राज्यघटनांमधून 'कायद्यासमोर समानता' हा वाक्प्रचार वापरला असल्याचे आढळते. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात कलम १७ मध्ये म्हटले आहे की, ''सर्वजण कायद्यासमोर समान आहेत आणि कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.'' या संकल्पनेत कोणत्याही व्यक्तीच्या लाभातील, जन्म, पंथ किंवा इत्तर कारणांसाठी कोणत्याही विशेषाधिकारांचा अभाव अभिप्रेत आहे आणि त्यात सर्व व्यक्ती आणि वर्गांना त्या ठिकाणच्या सर्वसामान्य कायद्याची समान ताबेदारीदेखील अभिप्रेत आहे.

दर्जाची समानता स्थापन करणे हेच या दोन्हींचे ध्येय आहे. 'कायद्यासमोर समानता' या संकल्पनेला अभावसूचक अर्थ आहे. व्यक्तींच्या लाभात कोणत्याही विशेषाधिकारांचा अभाव आणि सर्व वर्गांसाठी सर्वसामान्य कायद्याची समान ताबेदारी अशी ही संकल्पना आहे. 'कायद्याचे समान संरक्षण' ही प्रत्यक्ष संकल्पना आहे आणि त्यात समान परिस्थितीमध्ये समान वागणूक अभिप्रेत आहे. दोन्ही बाबतीत समान न्यायाचे ध्येय आहे. डॉ. जेनिंग यांच्या शब्दांत सांगायचे तर ''कायद्यासमोर समानता म्हणजे एकसमान लोकांमध्ये कायदा समान असला पाहिजे आणि समान पद्धतीने राबवला पाहिजे म्हणजे एकसारख्यांना एकसारखेच वागवले पाहिजे.'' 'कायद्याचे समान संरक्षण' म्हणजे एकसारख्या परिस्थितीमध्ये सर्वांना समान कायदा लागू करणे. कलम १४ हे 'कुणाही व्यक्ती'ला लागू होते. त्यात कंपनी किंवा संघटना किंवा व्यक्तीचे मंडळ यांचाही समावेश होतो. भारताच्या नागरिकांना आणि भारताचे नागरिक नसणाऱ्यांना दोहोंना आणि जन्मसिद्ध त्याचबरोबर कायदेशीर व्यक्तींना कलम १४ अंतर्गत संरक्षण दिलेले आहे. वंश, वर्ण किंवा राष्ट्रीयत्व याचा विचार न करता सर्वांनाच कायद्यासमोर समानतेची हमी दिलेली आहे. कायद्याची मान्यता असलेल्या व्यक्ती म्हणजे अगदी महामंडळांनासुद्धा कलम १४ नुसार हक्क प्राप्त आहे.

### २.२.२.१ कायद्याने केलेले वर्गीकरण

कलम १४ एखाद्या वर्गासाठी कायदा करण्यास मनाई करते, परंतु गुणवैशिष्ट्यांच्या योग्य कारणांच्या आधारे वर्गीकरणास किंवा भेद करण्यास मनाई करीत नाही.

सेवावर्गांमधून विशेष वर्ग वेगळा काढला गेला आहे काय हे पाहण्यासाठी सर्वसाधारणपणे खालील गोष्टी तपासल्या पाहिजेत.

(१) विशिष्ट वर्गाच्या भरतीचे सुरुवातीपासूनचे स्वरूप, पद्धत आणि रीत

(२) विशिष्ट वर्गाचे वर्गीकरण

(३) वर्गाच्या सदस्यांच्या सेवाविषयक अटी-शर्ती

(४) पदाचे स्वरूप व वैशिष्ट्ये आणि बढतीचे मार्ग

(५) विशिष्ट वर्गात आढळणारे, परंतु इतर वर्गांमध्ये न आढळणारे असे खास गुणविशेष.

वर नमूद निरीक्षणांच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, हवाई सुंदरी या जरी केबिन-क्रूच्या सदस्या असल्या तरी वेगळी नियमावली, कायदे आणि सेवाशर्तींच्या अधीन असलेला तो एक वेगळा वर्ग आहे. त्यांच्यासाठी यांच्या कायद्यात विशेष शर्ती असल्या तरी त्याचा अर्थ राज्यघटनेच्या कलम १४ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारा 'भेदभाव' असा होत नाही.

वेगवेगळ्या बाबतीत वैध वर्गीकरणाचा आधार वेगवेगळा असतो. भौगोलिक, प्रादेशिक आधारावर किंवा ऐतिहासिक दृष्टिकोनातून वैध वर्गीकरण करता येते. व्यक्तींच्या किंवा व्यवसायाच्या स्वरूपानुसारही वर्गीकरण करता येते. कलम १४ मध्ये नमूद केलेला समानतेचा हक्क हा सर्वसाधारण समान हक्काविषयीची तरतूद आहे आणि ती भारताचे नागरिक असलेल्या व्यक्तींना आणि भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तींना अशा दोहोंना लागू आहे. कलम १४ ते १८ मध्ये समानतेच्या पैलूंविषयीच्या तरतुदी आहेत आणि त्या फक्त भारताच्या नागरिकांसाठी आहेत.

### २.२.२.२ धर्म, इत्यादी कारणांवरून भेदभावास प्रतिबंध (कलम १५)

कलम १५ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्या कारणांवरून कुठलाही भेदभाव करण्यास प्रतिबंध करते. कलम १५ मधील हक्कांसाठी केवळ भारताचे नागरिक दावा करू शकतात. कंपनी किंवा महामंडळे यांना या तरतुदी लागू नाहीत. कलम १५ व्यक्तिगत हक्क निर्माण करते. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून नागरिकांमध्ये प्रतिकूल आणि मनमानी भेदभाव करण्यास प्रतिबंध करते.

कलम १५(१) म्हणते की, राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही.

कलम १५(२) सांगते की, केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून कोणत्याही नागरिकाला दुकानांमध्ये, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल्स आणि सार्वजनिक करमणुकीच्या जागी येण्याजाण्यास किंवा पूर्णत: किंवा अंशत: राज्यांच्या निधीतून उभारलेल्या किंवा सर्वसामान्य जनतेसाठी अर्पण केलेल्या विहिरी, तळी, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक आश्रयस्थानाच्या वापराबाबत कोणत्याही प्रकारे अपात्र, जबाबदार ठरवले जाणार नाही, निर्बंध घालण्यात येणार नाहीत किंवा अटी घातल्या जाणार नाहीत.

कलम १५(३) स्त्रिया आणि मुलांसाठी कोणतीही विशेष तरतूद करताना राज्याला या कलमातील कोणतीही बाब प्रतिबंध करू शकणार नाही.

कलम १५(४) सांगते की, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील नागरिकांच्या उन्नतीसाठी किंवा भटक्या जाती जमातींसाठी विशेष तरतूद करताना राज्याला या कलमातील किंवा कलम २९(२) मधील कोणतीही बाब प्रतिबंध करू शकणार नाही.

नोंद घेण्याजोगा इतर महत्त्वाचा मुद्दा असा की, जातिव्यवस्थेमुळे समाजाच्या मोठ्या वर्गाच्या वाट्याला कसे हीन भोग आणि मानहानीचे जीणे येते हे भीषण वास्तव्य भारतीय राज्यघटनाकारांना माहीत होते. म्हणून संस्कारित झालेली मूल्ये आणि स्पष्टपणे ज्ञात असणारी असमानता यांच्या पार्श्वभूमीवर राज्यघटनेने समानतेला प्रमुख मूल्य म्हणून स्वीकारलेले आहे. परिणामी एकत्रितरित्या ज्याचा संदर्भ आपण 'भरपाई करून देणाऱ्या' किंवा 'संरक्षित भेदभाव' असा घेऊ शकतो अशा अनेक तरतुदी राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

### २.२.२.३ सार्वजनिक सेवांमध्ये संधीची समानता (कलम १६)

कलम १६ सार्वजनिक सेवांमध्ये संधीच्या समानतेची हमी देते. कलम १६ उपकलम १ व २ सर्वसाधारण नियम सांगते की, केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास किंवा यापैकी कोणत्याही कारणांवरून नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही किंवा त्यावरून त्यांना राज्याच्या अखत्यारीतील कोणत्याही उद्योगासाठी किंवा हुद्यासाठी अपात्र ठरवता येणार नाही.

कलम १६(३) हे उद्योगधंद्याच्या एका किंवा अनेक वर्गांच्या वसतिस्थानांच्या आवश्यकतेबाबत नियम घालून देण्यासाठी किंवा सरकार किंवा कोणत्याही स्थानिक किंवा इतर प्राधिकाऱ्याच्या अखत्यारीतील कार्यालयांमध्ये नियुक्तीसाठी कायदे करण्याचे अधिकार संसदेला देते.

राज्याच्या मतानुसार जर कोणत्याही मागासवर्गाच्या नागरिकांना राज्याच्या अखत्यारीतील सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व प्राप्त नसेल, तर त्यांच्या लाभात सरकारी उद्योगधंद्यामध्ये पदांच्या आरक्षणासाठी तरतूद करण्यासाठी कलम १६(४) राज्याला अधिकार देते. कलम १६(४अ) १९९५ साली ७७ व्या दुरुस्तीने नव्याने घालण्यात आले. राज्याच्या मतानुसार जर भटक्या जाती-जमातींना राज्याच्या अखत्यारीतील सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व प्राप्त नसेल तर त्यांच्या उत्थानासाठी आरक्षणाची तरतूद कलम १६(४अ) मध्ये आहे.

कलम १६(४ब) २००० साली ८१ व्या दुरुस्तीने अमलात आले. गेल्या वर्षीचा किंवा काही वर्षांमध्ये पात्र उमेदवारांअभावी ज्या अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठीच्या रिक्त जागा भरण्यात आल्या नव्हत्या, त्या रिक्त जागांचा ५०% पर्यंत अनुशेष रद्द करण्यासाठी हे कलम अस्तित्वात आले.

कलम १६(५) सांगते की, कोणत्याही धार्मिक किंवा पंथाच्या संस्थांच्या कामाशी संबंधित असलेल्या कार्यालयाचा पदाधिकारी हा किंवा अशा संस्थांची व्यवस्था पाहणाऱ्या मंडळावर कोणताही सदस्य हा विशिष्ट धर्माचा किंवा विशिष्ट पंथाचा अनुयायी असावा अशी तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या कार्यवाहीवर या कलमातील कोणतीही बाब परिणाम करणार नाही.

अशा प्रकारे, कलम १६ सार्वजनिक उद्योगधंद्यामध्ये

संधीच्या समानतेची आणि भेदभाव होणार नाही अशी हमी देते, हे वर नमूद केलेल्या तरतुदींवरून सिद्ध होते.

थोडक्यात, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षित जागा देऊन स्त्रिया आणि मुलांना, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील नागरिकांना आणि अनुसूचित जाती-जमातींना उद्योगधंदे पुरवून राज्यघटना भेदभावाला सकारात्मक संरक्षित (Positive discrimination) परवानगी देते.

### २.२.२.४ अस्पृश्यतेचे निर्मूलन (कलम १७)

कलम १७ सांगते की, अस्पृश्यता रद्द ठरवली आहे आणि ती कुठल्याही स्वरूपात पाळण्यास प्रतिबंध केलेला आहे. व्यवहारात अस्पृश्यतेपासून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही अपात्रतेला थारा देणे कायद्यानुसार शिक्षेस पात्र गुन्हा आहे. घटना समितीने हे कलम सर्वानुमते स्वीकारले.

कलम १७ आणि कलम ३५(अ) (ii) एकत्रितपणे वाचले पाहिजे. कलम ३५(अ) (ii), राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात जी कृत्ये करणे म्हणजे गुन्हा करणे असे मानलेले आहे, त्या कृत्यांसाठी शिक्षा ठरवून देण्यासाठी कायदा करण्याचे विशेष अधिकार संसदेला प्रदान करते. तर कलम ३५(ब) हे राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात गुन्हा म्हणून नमूद केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी ते कायदे शिक्षेची तरतूद करतात, त्या कायद्याचा अंमल तसाच पुढे चालू राहावा असे नमूद करते. राज्यघटनेच्या कलम ३७२ नुसार त्यात रूपांतर किंवा फेरफार करता येतात.

वर नमूद केलेल्या अधिकारांचा उपयोग करून भारताच्या संसदेमध्ये अस्पृश्यता (अपराध) कायदा १९५५ संमत करण्यात आला. नंतर त्याचे नाव नागरी हक्कांचे संरक्षण कायदा १९५५ असे बदलण्यात आले. तो १९ नोव्हेंबर १९७६ रोजी अमलात आला. त्याचप्रमाणे संसदेने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ संमत केला. (अभ्यासक्रमाच्या पुस्तक २ मध्ये त्यांचे परिशिष्ट जोडलेले आहेत.)

### २.२.२.५ किताबांचे (पदव्यांचे) निर्मूलन (कलम १८)

लष्करी किंवा शैक्षणिक गुणवत्तेसाठी असलेल्या किताबांव्यतिरिक्त इतर किताब कलम १८ रद्द ठरवते. भारताचा कुणीही नागरिक कोणत्याही राज्याकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही. भारताचा नागरिक नसलेली कुणीही व्यक्ती जोपर्यंत राज्याच्या अखत्यारीतील कुठल्याही लाभाच्या किंवा विश्वस्ताच्या पदावर आहे, तोपर्यंत कोणत्याही परदेशाकडून भारताच्या राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कोणताही किताब (पदवी) स्वीकारणार नाही. भारताचा नागरिक नसलेली कुणीही व्यक्ती जोपर्यंत राज्याच्या अखत्यारितील कुठलेही लाभाचे किंवा विश्वस्ताचे पद भूषवते आहे, तोपर्यंत भारताच्या राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कुणाही परदेशाकडून कोणतीही भेट, वेतन किंवा परराज्याच्या अखत्यारीतील किंवा त्यांनी देऊ केलेले कोणत्याही प्रकारचे पद स्वीकारणार नाही.

डॉ. आंबेडकर या कलमाविषयी घटना समितीत म्हणतात, ''निरंतर नागरिकत्वासाठी किताबांचा अस्वीकार ही एक अट आहे. हा हक्क नव्हे. नागरिकांचे हे कर्तव्य आहे की जर त्यांना या देशाचा नागरिक म्हणून जगायचे असेल तर त्यांनी काही अटी पाळल्याच पाहिजेत. त्यापैकी एक अट म्हणजे त्यांनी किताब स्वीकारू नयेत. जर त्यांनी तसे केले तर या कलमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीचे काय करायचे ते कायद्याद्वारे ठरवण्याची संसदेला मुभा आहे. त्यासाठी इतर शिक्षांसह नागरिकत्वाचा हक्क गमावण्याची शिक्षा होऊ शकते.''

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) राज्यघटनेच्या कलम १५ चे उद्दिष्ट काय आहे ?

(२) 'कायद्यासमोर समानता' ही संकल्पना स्पष्ट करा.

**(आ) योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) अस्पृश्यतेचे निर्मूलन | (अ) कलम १६(४) |
| (२) कोणत्याही मागास वर्गाच्या लाभत सरकारी उद्योगधंद्यात पदांचे आरक्षण | (ब) कलम १७ |
| (३) स्त्रिया आणि मुलांसाठी विशेष तरतूद | (क) कलम १५(३) |
| | (ड) कलम १४ |

कलम १४ हे एखाद्या वर्गासाठी कायदा करण्यास मनाई करते, परंतु गुणविशेषांच्या योग्य कारणांच्या आधारे वर्गीकरण करण्यास किंवा भेद करण्यास मनाई करीत नाही. राज्याच्या मतानुसार जर कोणत्याही मागासवर्गाच्या नागरिकांना राज्याच्यां अखत्यारीतील सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व प्राप्त नसेल, तर त्यांच्या लाभात सरकारी उद्योगधंद्यांमध्ये पदाच्या आरक्षणासाठी तरतूद करण्यासाठी कलम १६(४) राज्याला अधिकार देते. असे वर्गीकरण मनमर्जीप्रमाणे नव्हे तर सारासारविवेकाने केले पाहिजे. कलम १४ ते १८ ही एकत्रितपणे भेदभावरहित समानतेच्या तत्त्वाचे जतन करतात.

## २.३ सारांश

मूलभूत हक्क हे सर्वांना कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षणाची हमी देणाऱ्या समानतेच्या हक्कासारख्या प्रारंभिक मानवी हक्कांना मान्यता देतात आणि त्यांची अंमलबजावणी करतात. धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान यावर आधारलेला भेदभाव तेथे नसेल. राज्यघटना कायद्याची समानता आणि कायद्याच्या समान संरक्षणाची हमी देते. एकसारख्या परिस्थितीमध्ये व्यक्तींना एकसमान वागणूक देण्याचे ते आश्वासन आहे. असमान पातळीवरील व्यक्तींना एक समान पद्धतीने वागणूक देणे शक्य नाही म्हणून संरक्षित भेदभावाची गरज भासली. जातिव्यवस्थेमुळे समाजाच्या मोठ्या वर्गाच्या वाट्याला कसे हीन भोग आणि मानहानीचे जिणे येते हे भीषण वास्तव भारतीय राज्यघटनाकारांना माहीत होते. म्हणून संस्कारित झालेली मूल्ये आणि स्पष्टपणे ज्ञात असणारी असमानता यांच्या पार्श्वभूमीवर राज्यघटनेने समानतेला प्रमुख मूल्य म्हणून स्वीकारले आहे. परिणामी ज्याचा संदर्भ आपण 'भरपाई करून देणाऱ्या' किंवा 'संरक्षित भेदभाव' असा घेऊ शकतो अशा अनेक तरतुदी राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**सनदशीर कायदा :** सनदशीर कायदा ही सार्वजनिक कायद्याची एक शाखा आहे. निश्चित कायदेशीर नियमांमध्ये बसवलेली ती राजनैतिक घटना आहे. त्यात कायदेमंडळाची घडण, अधिकार आणि विशेषाधिकार, कार्यकारी मंडळाच्या प्रमुखाचे कार्य आणि अधिकार, न्यायमंडळाचे अस्तित्व, रचना आणि स्थानिक शासनाची रचना अशा विषयांचा समावेश होतो.

**अवैध :** वैध/कायदेशीर नसलेले, परिणाम नसलेले, बेकायदेशीर, रद्दबातल, प्रभावहीन कायद्याचे बळ किंवा बंधन नसलेले, कायद्याने अंमलबजावणी न करता येण्याजोगे.

**हक्काचा त्याग :** ज्ञात हक्कांचा जाणीवपूर्वक त्याग, ज्ञात हक्क सोडून दिले आहेत अशा तर्काला पुष्टी देणारे वर्तन. व्यक्ती जे हक्क सोडून देत आहे त्या हक्कांची आणि वस्तुस्थितीची त्याला पूर्ण माहिती असल्याशिवाय त्याने 'हक्काचा त्याग' केला असे म्हणता येणार नाही.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १***

**(अ)** (१) मूलभूत हक्क निरंकुश नाहीत, (२) परिस्थितीनुसार मूलभूत हक्क निर्बंधित किंवा तहकूब करणे शक्य आहे.

(२) सार्वजनिक व्यवस्था आणि परदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे.

**(आ)** (१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २***

**(अ)** (१) धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मस्थान या कारणांवरून भेदभावास प्रतिबंध करण्याचे कलम १५ चे उद्दिष्ट आहे.

(२) 'कायद्यासमोर समानता' या संकल्पनेत अभावसूचक अर्थ असून व्यक्तींच्या लाभात कोणत्याही विशेषाधिकारांचा अभाव आणि सर्वसामान्य कायद्यांची समान ताबेदारी अशीही संकल्पना आहे.

**(आ)** (१) ब (२) अ (३) क

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची उत्तरे १० ते १५ ओळींत लिहा.**

(१) किताबांच्या निर्मूलनाचे महत्त्व काय ?

(२) समानतेच्या हक्कातील 'योग्य वर्गीकरण' ही संकल्पना स्पष्ट करा.

(३) मूलभूत हक्कांची आपल्याला गरज का पडते ?

(४) मूलभूत हक्क हे मानवी हक्क आहेत काय ?

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) ए.व्ही., 'इन्ट्रोडक्शन टु द स्टडी ऑफ द लॉ ऑफ द कॉन्स्टिट्युशन',

(२) पांडे जे.एन., 'कॉन्स्टिट्युशनल लॉ ऑफ इंडिया, सेंट्रल लॉ एजन्सी,' अलाहाबाद

# घटक ३ : मूलभूत हक्क : स्वातंत्र्याचा हक्क

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

३.२.१ नागरिकांना प्रदान केलेले हक्क

३.२.१.१ भाषण, विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य [ कलम १९(१)अ ]

३.२.१.२ एकत्र येण्याचा हक्क [ कलम १९(१)(ब) ]

३.२.१.३ संघटना किंवा संघ बनवण्याचा हक्क [ कलम १९(१)(क) ]

३.२.१.४ संचार स्वातंत्र्य [(कलम १९(१) ड)]

३.२.१.५ भारताच्या प्रदेशात कोणत्याही भागात राहण्याचा आणि स्थायिक होण्याचा हक्क [(कलम १९(१) इ)]

३.२.१.६ व्यापार आणि उद्योगाचे स्वातंत्र्य

३.२.२ गुन्ह्यासाठी निवाड्याच्या संदर्भात संरक्षण (कलम २०)

३.२.२.१ कार्योत्तर कायदे (Ex Post Facto कायदे) [(कलम २०(१)]

३.२.२.२ दुहेरी धोक्यापासून संरक्षण [कलम २०(२)]

३.२.२.३ स्वतःच स्वतःला गुन्ह्यात अडकवण्याविरुद्ध हक्क

३.२.३ जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क (कलम २१)

३.२.३.१ जीविताच्या हक्काचा अर्थ

३.२.३.२ व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अर्थ

३.२.३.३ कायद्याने घालून दिलेली कार्यपद्धती

३.२.४ मनमानी पद्धतीने अटक आणि कैदेविरूद्ध हक्क [(कलम २२(१) व (२)]

३.२.४.१ प्रतिबंधात्मक कैदेविरुद्ध घटनात्मक सुरक्षाकवच

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- ★ सर्वांत महत्त्वाचा मूलभूत हक्क म्हणजेच स्वातंत्र्याचा हक्क समजून घेता येईल.
- ★ जीविताच्या हक्काबाबत न्यायालयांनी केलेल्या अन्वयार्थावर चर्चा करता येईल.
- ★ शिक्षणाच्या हक्काच्या महत्त्वाचे मूल्यमापन करता येईल.
- ★ संशयित गुन्हेगारांना राज्यघटनेने पुरवलेल्या सुरक्षाकवचाचे वर्णन करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

स्वातंत्र्याचा हक्क हा प्राणपणाने जपला गेलेला असा महत्त्वाचा मूलभूत हक्क आहे. त्याभोवती व्यक्तीचे इतर हक्क गुंफलेले आहेत, म्हणून त्यांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे. या हक्कांमध्ये स्वातंत्र्याचा आदर्श रुजवणाऱ्या भाषा आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संचार आणि व्यवसायाचे स्वातंत्र्य, इत्यादी सहा प्रकारच्या मूलभूत हक्कांशिवाय जीविताचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क, गुन्ह्यांसाठी मनमानी निवाडे करण्याविरुद्धचा हक्क आणि मनमानी अटक आणि कैदेच्या विरोधातील हक्क अशा इतर हक्कांचाही समावेश होतो. व्यक्तीचा मानसिक, नैतिक आणि शारीरिक विकास साधण्यासाठी स्वातंत्र्य ही पूर्वअट आहे, त्यामुळे हे हक्क प्रदान करणे शक्य नाही हे उघड आहे. म्हणून कायद्याद्वारे या स्वातंत्र्यांवर काही निर्बंध घालता येतात. अशा प्रकारे इतरांच्या स्वातंत्र्याचे उल्लंघन न करता सर्व व्यक्तींना त्यांना मिळालेला स्वातंत्र्याचा हक्क उपभोगणे शक्य होते. या हक्कांचा अर्थ आणि त्यांचा न्यायालयांनी लावलेला अर्थ समजून घेण्यासाठी प्रत्येकाचा अभ्यास करू या.

## ३.२ विषय-विवेचन

### ३.२.१ नागरिकांना प्रदान केलेले हक्क

जेव्हा भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा कोणतेही निर्बंध नसलेल्या स्वातंत्र्याच्या हक्काची मागणी होती. या देशातील लोकांनी ब्रिटिश सत्ताकाळात खूप काही भोगले होते आणि आता त्यांना पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा होता. तथापि भारत हे बाल्यावस्थेतील राष्ट्र आहे आणि जर देशात स्थैर्य असेल तरच ते वाढू शकणार आहे याचीदेखील जाणीव होती. लोकांना स्वातंत्र्य प्रदान करताना त्यावर योग्य निर्बंध घातलेच पाहिजेत हे सर्वांनी ओळखले होते.

अशा रीतीने, कलम १९ नागरिकांना खालील विविध स्वातंत्र्यांची हमी देते.

(अ) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य

(आ) शांततेने आणि विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य

(इ) संघटना किंवा संघ बनवण्याचे स्वातंत्र्य

(ई) भारताच्या संपूर्ण प्रदेशात मुक्तपणे संचाराचे स्वातंत्र्य

(उ) भारताच्या प्रदेशात कोणत्याही भागात राहण्याचे आणि स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य

(ऊ) कोणताही धंदा किंवा कोणताही उद्योग, व्यापार किंवा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य

#### ३.२.१.१ भाषण, विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य [ कलम १९(१)अ ]

भाषण, विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य म्हणजे मौखिक शब्द, लेखन, मुद्रण, चित्रे किंवा इतर कोणत्याही रीतीने स्वत:चे दृढ विश्वास आणि मते मुक्तपणे अभिव्यक्त करण्याचा हक्क. फलक, हावभाव, चिन्हे, इत्यादींद्वारे स्वत:च्या कल्पना अभिव्यक्त करण्याचादेखील त्यात समावेश आहे. यात एखाद्याचे स्वत:चे मत/दृष्टिकोनाच्या प्रसाराबरोबरच इतर लोकांच्या मताच्या प्रसाराचे स्वातंत्र्य समाविष्ट आहे. अर्थातच, इतर मूलभूत हक्कांप्रमाणे या स्वातंत्र्यावरदेखील योग्य निर्बंध लागू आहेत. अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचे चार हेतू आहेत. व्यक्तीला स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मदत करते. ते सत्यशोधनासाठी साहाय्य करते. व्यक्तीची निर्णयप्रक्रियेत सहभागाची क्षमता मजबूत करते. ते अशी यंत्रणा पुरवते की, ज्यामुळे स्थैर्य आणि सामाजिक परिवर्तन यामध्ये योग्य समन्वय स्थापन करणे शक्य होते.

**• मुद्रण स्वातंत्र्य**

भाषण आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये मुद्रण स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क सूचित केलेला आहे. मुद्रण स्वातंत्र्य हे राजनैतिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या योग्य कार्यवाहीसाठी आवश्यक आहे. रोमेश थापर वि. मद्रास

राज्य (एआयआर १९५० सु.प्र.१२) मध्ये निकाल देताना न्यायमूर्ती पतंजली शास्त्री म्हणतात, ''सर्व लोकसत्ताक संस्था, संघटनांचा पाया भाषणाचे आणि मुद्रणाचे स्वातंत्र्य हेच असतात. कारण राजकारणावरील मुक्त चर्चेशिवाय जनतेचे शिक्षण होत नाही.'' सकाळ पेपर्स (प्रा.) लि.वि. युनियन ऑफ इंडिया (एआयआर १९६२ सु.प्र. ३०५) प्रकरणात निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, स्वत:च्या कल्पना, मते आणि दृष्टिकोन पूर्ण मोकळेपणाने प्रकाशित आणि वितरित करण्याचा हक्क हा भाषण आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या हक्कासह ओघानेच प्राप्त होतो आणि उपलब्ध प्रकाशन साधनांचा आश्रय घेतल्याने त्या हक्कावर कलम १९(२) मध्ये नमूद केलेले निर्बंध लागू होतात. आम जनतेमध्ये मानवी हक्कांचे महत्त्व वाढविण्यासाठी आणि पसरविण्यासाठी छापखाने आणि प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. मानवी हक्कांचे उल्लंघन झाले असल्यास अशा प्रकरणातदेखील प्रसारमाध्यमांची भूमिका परिणामकारक ठरते. या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या पुस्तकात आपण त्याविषयी तपशिलाने चर्चा करू.

- **माहितीचा अधिकार**

'देशाच्या कारभारात लोकांचा सहभाग असावा असा विश्वास बाळगणाऱ्या लोकांचा मोठा पाठिंबा भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काला असतो. याचा अर्थ असा की, सरकारच्या कारभाराविषयी बातम्या आणि माहिती असण्याचा लोकांना हक्क आहे. याचाच गर्भीत अर्थ असाही होतो की, सरकारी कागदपत्रे / अभिलेख आणि माहिती सहजपणे उपलब्ध असणे ही आधुनिक सरकारसाठी अतिआवश्यक गरजेची बाब आहे. विशेष करून यामुळे लोकशाहीसाठी जनतेमध्ये माहिती आणि चर्चा सुलभपणे होते.

माहितीची सहज उपलब्धता म्हणते गोपनीयतेमुळे फोफावणाऱ्या अधिकाराचा गैरवापर, भ्रष्टचार आणि गैर कारभाराच्या विरोधात सुरक्षितता मिळणे, जबाबदार आणि चांगल्या कारभारासाठी माहिती सहज उपलब्ध असणे आवश्यक असते. स्वत: सरकारलादेखील खुलेपणा आणि पारदर्शकता फायद्याची ठरते. कारण सरकारच्या कृतींबद्दल नागरिकांचा विश्वास संपादन करण्यासाठी आणि नागरी आणि लोकशाही समाजाच्या निर्वाहासाठी निर्णयप्रक्रियेतील खुलेपणा आणि पारदर्शकता साहाय्य करत असते.

### ३.२.१.२ एकत्र येण्याचा हक्क [ कलम १९(१)(ब) ]

कलम १९(१)(ब) सांगते कीं, शांततेने आणि विनाशस्त्र एकत्र येण्याचा सर्व नागरिकांना हक्क आहे. या हक्काच्या वापरावर राज्य कायदे करून निर्बंध घालू शकते.

लोकसत्ताक सरकारमध्ये एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य हा आवश्यक घटक आहे. जनतेचे शिक्षण आणि धार्मिक, राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक समस्यांवर जनमत घडवण्याच्या हेतूने सार्वजनिक सभा/बैठका भरवल्या जातात. म्हणून कलम १९(१) (अ)ने प्रदान केलेल्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कांशी निगडित असा एकत्र जमण्याचा हक्क आहे. यात बैठका घेण्याचा आणि मोर्चे काढण्याचा हक्क समाविष्ट आहे. या हक्काला केवळ शांतता पाळणे आणि विनाशस्त्र असणे एवढीच अट लागू आहे. जरी शस्त्र बाळगणे कायदेशीर असले तरी कोणत्याही सभेमध्ये सशस्त्र होऊन जाण्याचा कोणताही सर्वसाधारण हक्क राज्यघटना प्रदान करत नाही. बेकायदेशीरपणे न भरलेली सभा नंतर हिंसक बनली किंवा परिणामी समाजात अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता असेल तर ती सभा बेकायदेशीर ठरते.

### ३.२.१.३ संघटना किंवा संघ बनवण्याचा हक्क [ कलम १९(१)(क) ]

सर्व नागरिकांना या कलमानुसार संघटना किंवा संघ बनवण्याचा हक्क आहे. मात्र कलम १९(४) नुसार भारताचे सार्वभौमत्व आणि ऐक्य, सार्वजनिक सुव्यवस्था किंवा नैतिकतेच्या हितासाठी संघटना बनविण्याच्या हक्कावर निर्बंध आहेत. या हक्काची व्याप्ती खूप मोठी आहे. यात

सर्व प्रकारच्या संघटना म्हणजे राजकीय पक्ष, क्लब, सोसायट्या, कंपन्या, संघटना, भागीदारी संस्था, व्यापारी संघ यांचा समावेश होतो. विशिष्ट कायदेशीर तरतुदीचे उल्लंघन न करता आवश्यक ते पूर्ण स्वातंत्र्य कायदेशीर उद्दिष्टासाठी असणाऱ्या संघटनांना सध्याच्या भारतीय कायद्याने दिलेले आहे.

### ३.२.१.४ संचार स्वातंत्र्य [(कलम १९(१) ड)]

भारताच्या संपूर्ण प्रदेशात मुक्त संचाराचे स्वातंत्र्य भारताच्या सर्व नागरिकांना प्रदान केलेले आहे. मात्र कलम १९(१)(ड) आणि (इ) नुसार मिळालेल्या या हक्कांच्या उपभोगावर कलम १९(५) सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जमातीच्या हितरक्षणासाठी निर्बंधांना परवानगी देते. अशा रितीने भारताचे नागरिक केवळ एका राज्यातून दुसऱ्या राज्यातच नव्हे, तर एकाच राज्यात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मुक्तपणे संचार करू शकतात.

### ३.२.१.५ भारताच्या प्रदेशात कोणत्याही भागात राहण्याचा आणि स्थायिक होण्याचा हक्क [कलम १९(१)(इ)]

हे कलम भारताच्या प्रदेशात कोणत्याही भागात राहण्याचा आणि स्थायिक होण्याचा हक्क सर्व भारतीय नागरिकांना देते. प्रत्येक नागरिकाला राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या कोणत्याही भागात मुक्तपणे प्रवास करता यावा आणि स्थायिक होता यावे यासाठी भारताच्या प्रदेशातील अंतर्गत अडथळे दूर करण्याचा या कलमाचा हेतू आहे. सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जमातीच्या हितासाठी या स्वातंत्र्यावर योग्य निर्बंध आहेत.

### ३.२.१.६ व्यापार आणि उद्योगाचे स्वातंत्र्य

कलम १९(१)(ग) सर्व भारतीय नागरिकांना कोणताही पेशा किंवा उद्योग, व्यापार किंवा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देते. कलम १९(६) नुसार राज्य जनतेच्या हितासाठी या हक्कावर निर्बंध घालू शकते. कोणताही पेशा किंवा उद्योग, व्यापार किंवा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक व्यावसायिक किंवा तांत्रिक गुणवत्ता नेमून देऊन त्याचे उल्लंघन झाल्यास राज्याला अशा नागरिकांना कोणताही व्यापार किंवा व्यवसाय करण्यापासून बहिकृत करता यावे यासाठी असतात.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -१*

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) भारतीय राज्यघटनेने बहाल केलेले कोणतीही दोन स्वातंत्र्ये सांगा.

(२) स्वातंत्र्ये निरंकुश असतात काय ?

(३) राज्यघटनेने प्रदान केलेले हक्क हे मानवी हक्कांमध्ये मोडतात काय ?

## ३.२.२ गुन्ह्यासाठी निवाड्याच्या संदर्भात संरक्षण (कलम २०)

फौजदारी न्यायालयीन कार्यपद्धतीच्या संदर्भातून किती प्रमाणात मानवी हक्कांचा आदर आणि रक्षण केले जाते हे समाजाच्या सुसंस्कृतपणाचे परिमाण आहे. यातून 'कोणत्या मानवी हक्कांना आपल्या फौजदारी न्याय व्यवस्थेतून संरक्षण देण्याइतपत महत्त्वाचे मानावे ?' 'आरोपी आणि संशयिताच्या मानवी हक्कांचे किती अंशी संरक्षण करावे ?' असे प्रश्न उद्भवतात. या प्रश्नांची उत्तरे देणे अवघड आहे, कारण आरोपीचे हित आणि समाजाचे मूलभूत हित यामध्ये सतत संघर्ष चालू असतो. कुणाही एकाचे हित जपण्यावर भर दिला गेला, तरी त्याचा प्रतिकूल परिणाम दुसऱ्यावर होतोच आणि म्हणून दोहोंचे हित साधताना योग्य समन्वय राखणे गरजेचे आहे.

गुन्ह्यासाठी जे निवाडे केले जातात त्याबाबत संरक्षणाची हमी कलम २० देते. आरोप असलेले गुन्हेगारी कृत्य करतेवेळी, अमलात असलेल्या कायद्याचे उल्लंघन केलेले आहे असा आरोप असल्याशिवाय कुणाही व्यक्तीला कोणत्याही गुन्ह्यासाठी दोषी मानले जाणार नाही. तसेच

गुन्हा करतेवेळी अमलात असलेल्या कायद्याने जितकी शिक्षा नमूद केली आहे त्यापेक्षा जास्त शिक्षा त्याला केली जाणार नाही.

कलम २०(२) सांगते की, कुणाही व्यक्तीवर एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळेला खटला भरला जाणार नाही आणि त्यासाठी शिक्षा केली जाणार नाही.

कलम २०(३) नमूद करते की, कुणाही आरोपीवर स्वत: विरुद्ध साक्ष देण्यासाठी सक्ती करण्यात येणार नाही.

कलम २० नुसार देण्यात आलेले संरक्षण खालीलप्रमाणे -

(१) कार्योत्तर कायदे
(२) दुहेरी धोका
(३) स्वत:ला गुन्ह्यात अडकवण्याविरुद्ध संरक्षण

### ३.२.२.१ कार्योत्तर कायदे (Ex Post Facto कायदे) [ कलम २० (१) ]

कलम २०(१) सांगते की, व्यक्तीवर ज्या कृत्यासाठी गुन्हेगारीचा आरोप आहे, ते कृत्य करतेदिवशी अमलात असलेल्या कायद्यामध्ये ते कृत्य गुन्हा म्हणून नमूद केलेले असेल तर व्यक्तीला केवळ अशाच गुन्ह्यासाठी दोषी मानता येईल. अमेरिकन राज्यघटनेतील कार्योत्तर कायद्याच्या विरोधातील तरतुदींशी कलम २० ने दिलेला हक्क मिळताजुळता आहे. या तरतुदी सांगतात की, कार्योत्तर कायदे संमत केले जाणार नाहीत. कार्योत्तर कायदे म्हणजे असे कायदे जे अशा कृत्यांसाठी/गुन्ह्यांसाठी शिक्षा करतात, जी कृत्ये करतेवेळी कायदेशीर होती, परंतु शिक्षा देतेवेळी बेकायदेशीर असतात. कार्योत्तर कायदे पूर्वलक्ष्यी स्वरूपात गुन्हे निर्माण करतात आणि ते गुन्हे करणारांना शिक्षा करतात. असे कायदे वाईट, पराकोटीचे अन्याय्यकारक आणि गैरवाजवी असतात, म्हणून फौजदारी कायद्यांचा प्रभाव फक्त भविष्यलक्ष्यी असतो, पूर्वलक्ष्यी नव्हे.

कलम २०(१) चा दुसरा भाग कुणाही गुन्हेगार व्यक्तीला गुन्हा करतेवेळी, अमलात असलेल्या कायद्याने जितकी शिक्षा त्या गुन्ह्यासाठी नमूद केलेली असेल त्यापेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही अशी हमी देते. 'अमलात असलेला कायदा' म्हणजे गुन्हा करतेवेळी प्रत्यक्षात कार्यवाहीत असलेला कायदा होय.

कलम २०(१) नुसार कार्योत्तर कायद्यान्वये दोषाबद्दल निवाडा करण्यास किंवा शिक्षा सुनावण्यास प्रतिबंध केलेला आहे. त्यानुसार चौकशीला नव्हे.

गुन्हा करतेवेळी असलेल्या कायद्याने नेमून दिलेल्या कार्यपद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीने चौकशी करणे किंवा गुन्हा करतेवेळी त्या गुन्ह्यासंबंधी न्यायालयीन कारवाईचे अधिकार असलेल्या न्यायालयापेक्षा वेगळ्या न्यायालयाने गुन्ह्याची चौकशी करणे घटनाबाह्य मानले जाणार नाही.

### ३.२.२.२ दुहेरी धोक्यापासून संरक्षण [ कलम २० (२) ]

कलम २०(२) दुहेरी धोक्याच्या विरोधात संरक्षण देते, म्हणजे एका किंवा त्याच गुन्ह्यासाठी एकापेक्षा जास्त वेळा माणसाला संकटात टाकता येणार नाही. जर न्यायालयात एखाद्या व्यक्तीवर पुन्हा याच गुन्ह्यासाठी खटला भरण्यात आला तर तो त्याचे मागील वेळी सिद्ध झालेला निर्दोषत्वाचा किंवा दोषी असल्याबाबतचा निवाडा हा त्याच्यासाठी पूर्ण बचाव म्हणून वापरू शकतो. अशीच तरतूद अमेरिकेत आहे. त्यामुळे तेथील कोणाही व्यक्तीला त्याच त्या गुन्ह्यासाठी दुसऱ्यांदा जीविताची किंवा शरीराची जोखीम नसते.

**कलम २०(२) मधील चार आवश्यक घटक -**

(१) व्यक्तीवर गुन्ह्याचा आरोप असला पाहिजे. गुन्हा म्हणजे अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याने शिक्षा करता येण्याजोगे कृत्य किंवा कर्तव्यच्युती.
(२) न्यायालय किंवा न्यायालयीन प्राधिकरणासमोर खटल्याचे न्यायालयीन कामकाज किंवा खटला चालविलेला असला पाहिजे.
(३) ज्या कायद्याने एखादे कृत्य गुन्हा म्हणून नमूद केलेले असते त्याच कायद्याच्या संदर्भात काम करण्यास पात्र न्यायालयीन प्राधिकरण किंवा मंडळासमोर न्यायालयीन कामकाज चालवले गेले पाहिजे.

(४) ज्या गुन्ह्यासाठी पूर्वी खटला भरण्यात आला आणि शिक्षा देण्यात आली, तोच गुन्हा असला पाहिजे.

कलम २०(२) मधील तरतुदी लागू होण्यासाठी पहिल्यांदा झालेली गुन्ह्याची गुणदोषावरील चौकशी आणि खटल्याचा निकाल हा सक्षम न्यायालयाकडून झालेला असणे गरजेचे आहे. जर न्यायालय सक्षम नसेल तर पूर्ण चौकशीच रद्दबातल ठरते. त्यामुळे दुसऱ्या वेळी त्याच गुन्ह्यासाठी फिर्याद आणि शिक्षा झाली असे म्हणता येत नाही. कलम २०(२) सातत्याने घडणाऱ्या गुन्ह्यासाठी लागू होणार नाही.

### ३.२.२.३ स्वत:च स्वत:ला गुन्ह्यात अडकवण्याविरुद्ध हक्क [ कलम २० (३) ]

कलम २०(३) गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणाही व्यक्तीला स्वत: विरुद्ध साक्ष देण्याची सक्ती करण्यात येणार नाही. या तरतुदीत स्वत:च स्वत:चे दोष/गुन्हा दाखवून देण्याबाबत सक्ती होत असेल तर त्यापासून संरक्षण अभिप्रेत आहे. या तरतुदीत तीन घटकांचा समावेश होतो.

(१) हा हक्क गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्तीशी संबंधित आहे.

(२) साक्ष देण्यासाठी सक्ती करण्याच्या विरुद्ध ते संरक्षण आहे.

(३) ते अशा सक्तीच्या परिणामी स्वत:विरुद्ध पुरावा देण्यापासून दिलेले संरक्षण आहे.

अटकेत असलेल्या कोणाही व्यक्तीला त्याच्या निवडीप्रमाणे वकिलाचा सल्ला घेण्याचा अधिकार नाकारलेला नाही. याचा अर्थ, अटकेत किंवा कैदेत नसलेल्या व्यक्तीला हक्क दिलेला नाही असा होत नाही. बंदिवासाच्या शक्यतेच्या परिस्थितीतील चौकशीला सामोरे जाण्यासाठी वकिलाचा सल्ला उपलब्ध करून देणे ही कायद्याच्या राज्यात मूलभूत बाब आहे. आरोपीला वकिलाचा सल्ला घेण्याचा हक्क आहे असे आपण मान्य केले आहे. त्यामुळे स्वत:लाच गुन्ह्यात गोवण्याच्या विरोधातील हक्काचे पालन होते. तथापि याचा अर्थ असा नाही की, पोलिसांनी खात्रीने वकील उपलब्ध करून दिलाच पाहिजे; तर याचा अर्थ, जर आरोपीने जेव्हा त्याची तपासणी चालू असेल तेव्हा त्याच्या बाजूने वकिलाने काम चालवावे अशी इच्छा व्यक्त केली, तर तशी सुविधा नाकारता येणार नाही, असा होतो.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २*

**खालील शब्दांच्या व्याख्या द्या.**

(१) कार्योत्तर कायदे

(२) दुहेरी धोक्याविरुद्ध हक्क

(३) स्वत:ला गुन्ह्यात अडकवण्याविरुद्ध हक्क

## ३.२.३ जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क (कलम २१)

कलम २१ सांगते की, कायद्याने नमूद केलेली कार्यपद्धती अवलंबल्याशिवाय कोणाही व्यक्तीला तिच्या जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही. जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क हा सर्वांत मोलाचा, अतिपवित्र, अहस्तांतरणीय आणि नागरिकांच्या सर्व मूलभूत हक्कांचा पाया असणारा हक्क आहे. लोकशाही राज्यात सर्वाधिक गरजेचा प्रारंभिक मानवी हक्क आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय या दोन्ही स्तरांवर मानवी हक्कांच्या चळवळीचा तो कणा आहे.

आज, जीविताचा आणि स्वातंत्र्याचा हक्क म्हणजे केवळ शारीरिक अस्तित्व किंवा वैद्यकीयदृष्ट्या जिवंत असणे नव्हे, तर त्यात शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या वाढीसाठी आवश्यक भयमुक्त आणि बंधनमुक्त वातावरणात आरामदायक आणि मानवी प्रतिष्ठेला साजेसे जीवन जगण्यासाठी आवश्यक साधने आणि सुविधा मिळण्याचा हक्क समाविष्ट आहे.

### ३.२.३.१ जीविताच्या हक्काचा अर्थ

जीविताचा हक्क सर्वांसाठी सर्वांत पायाभूत असला तरी त्याची व्याख्या करणे अवघड आहे. हा देवदत्त हक्क

आहे आणि प्रत्येक व्यक्तीचा नैसर्गिक अनुवंशिक हक्क आहे. सर्वसाधारणपणे जीवन म्हणजे प्रत्येक जीवित प्राण्याची जन्मापासून मरणापर्यंतची चेतना आहे. परंतु व्यापक अर्थाने जीवन म्हणजे चैतन्य, जिवंतपणा, शारीरिक किंवा बौद्धिक शक्ती, ऊर्जा आणि प्राणतत्त्व, इत्यादी जीविताचा हक्क म्हणजे केवळ जीवनाचे पावित्र्य नव्हे तर त्याचा अर्थ आपल्या संस्कृतीच्या सध्याच्या टप्प्यावर व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्याच्यातील सुप्त शक्यतांचा शक्यतितक्या कमाल उंचीपर्यंत विकास करण्यासाठी जास्तीत जास्त संधी देणे असा होतो. व्यक्तीला विकासासाठी किंवा प्रत्येक पुरुष किंवा स्त्रीमधील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी संधी मिळाल्याशिवाय केवळ अस्तित्वाचा हक्क मिळाला तर त्याला फारसे मोल नसते. जीविताची हक्क म्हणजे सुसंस्कृत समाजाचा सदस्य या नात्याने सभ्यतेने जगण्याचा हक्क. सर्व स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क. जीवन सुखदायक बनवणाऱ्या सुविधा मिळण्याचा हक्क. योग्य दर्जाचे आराम आणि सभ्यता यांच्यासह जगण्याचे आश्वासन देणारा हक्क.

या प्रारंभिक हक्काला नकार म्हणजे इतर सर्व हक्कांना नकार. कारण जीविताचा हक्क नसेल तर इतर कोणत्याही हक्कांचा उपयोग नाही. त्यांना अस्तित्वच राहत नाही. जीविताचा हक्क हा नि:संशयपणे आदिम दावा आहे. व्यक्तीचा जीविताचा दावा हा प्रत्येक माणसामध्ये कायद्याने आणि निसर्गाने दिलेला अंगभूत हक्क आहे.

### • जीविताच्या हक्काच्या वेगवेगळ्या बाजू

कलम २१ मधील जीवन या शब्दाचा अन्वयार्थ अनेकविध पद्धतीने लावता येतो. त्याचा अर्थ केवळ शारीरिक जीवन इतका सोपा नाही, तर त्यात जीवनाच्या इतर अंगांचा विचार केलेला आहे. मानवी शरीराच्या जैवशास्त्रीय अस्तित्वापलीकडे जाऊन या हक्काचा विचार होतो. जरी जीविताचा हक्क प्रारंभिक आणि पायाभूत असला तरी राज्यघटनेने 'जीवन' या शब्दाची व्याख्या केलेली नाही. म्हणून आपल्याला या शब्दाचा अन्वयार्थ लावण्यासाठी न्यायमंडळाकडे वळावे लागते.

अनेक न्यायानिवड्यांमध्ये जीविताच्या हक्काचे शक्य तितके अन्वयार्थ देण्याचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने केलेला आहे. त्यात खालील काही अटींचा समावेश आहे.

(१) उपजीविकेचा आणि अस्तित्वाचा हक्क
(२) निवाऱ्याचा हक्क
(३) मानवी सभ्यतेला साजेशा अस्तित्वाचा हक्क
(४) क्रूर शिक्षेविरुद्धचा हक्क
(५) एकांताचा हक्क
(६) किमान वेतनास नकाराविरुद्धचा हक्क
(७) मनमानी बडतर्फी विरुद्धचा हक्क
(८) कामगारांच्या आरोग्याचा हक्क
(९) जलदगतीने खटल्यांच्या चौकशीचा हक्क
(१०) माहितीचा हक्क
(११) स्वच्छ, आरोग्यपूर्ण आणि जगण्यायोग्य वातावरणाचा हक्क
(१२) शिक्षणाचा हक्क

व्यक्तिस्वातंत्र्य प्राप्त करण्यामध्ये प्रारंभिक शिक्षणाचा अभाव हा सर्वांत मोठा अडथळा आहे. शिक्षण ही विकासाची सुरुवात असते. भारतीय राज्यघटनाकारांना हे समजले होते की, मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची हमी देण्यासाठी राज्याकडे पुरेशी साधनसामग्री नाही. २००२ साली झालेल्या ८६ व्या घटनादुरुस्तीने कलम २१(अ) मधून शिक्षणाच्या हक्काचा मूलभूत हक्कांमध्ये नव्याने समावेश करण्यात आला. हे कलम ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची हमी देते. ही शिक्षण देण्याची पद्धत राज्य कायदा करून ठरवेल. सरकारने सर्वशिक्षा अभियानासारख्या अनेक योजना केल्या आहेत. मात्र जोपर्यंत शिक्षणाच्या हक्काविषयी भारताच्या अशिक्षित जनतेत जागृती येत नाही तोपर्यंत ही तरतूद केवळ कायद्यावरच राहील.

### • सर्वशिक्षा अभियान (एसएसए)

सर्वशिक्षा अभियान हा कार्यक्रम २००० साली

प्राथमिक शिक्षणाच्या वैश्विकीकरणासाठी (युइइ) जाहीर करण्यात आला. तो देशाच्या सर्व राज्यांमध्ये कार्यान्वित झाला आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटासाठी प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी हे पहिले पाऊल आहे. प्राथमिक शिक्षणाच्या योजनांची अंमलबजावणी प्रामाणिक पद्धतीने होईल अशी खात्री देण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. त्याचे मुख्य हेतू असे -

(१) २००३ पर्यंत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुले शाळा/एज्युकेशन गॅरंटी सेंटर्स / सेतू अभ्यासक्रमांना जाऊ लागतील.

(२) २००७ पर्यंत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुले ५ वर्षांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करतील.

(३) २०१० पर्यंत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांची ८ शालेय वर्षे पूर्ण झालेली असतील.

(४) जीवनाचे शिक्षण देणाऱ्या समाधानकारक दर्जाच्या प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे.

(५) २००७ सालापर्यंत प्रारंभिक टप्प्यावरील, २०१० सालापर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील सर्वसामान्य आणि सामाजिक वर्गातील दरी भरून काढण्यात येईल.

(६) २०१० सालापर्यंत संपूर्ण गळती थांबविली जाईल.

## ३.२.३.२ व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अर्थ

ब्रिटानिका ज्ञानकोशात 'स्वातंत्र्या'ची व्याख्या केली आहे ती अशी - ''मुक्तपणाची स्थिती'' जी विशेषत: राजकीय पारतंत्र्य, बंदिवास किंवा गुलामगिरीच्या विरुद्ध स्थिती असते. त्याची आणखी व्याख्या अशी- 'कैद, बंदिवास, गुलामगिरी किंवा जुलमी नियंत्रणापासून मुक्त असणे.' चेम्बरच्या टवेंटीएथ सेंच्युरी डिक्शनरीत स्वातंत्र्याची व्याख्या अशी केली आहे. 'मनमर्जीप्रमाणे वागण्याची मोकळीक, नैसर्गिक हक्कांचा अनिर्बंध वापर, मुक्त संधीचे बळ, विशेषाधिकार, मुक्तता, निर्बंधाची सवलत, काही विशेषाधिकार उपभोगण्याच्या सीमारेषा, भाषा स्वातंत्र्य आणि सर्वसामान्य सौजन्यापलीकडील कृती.' प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्यप्राप्तीची महत्त्वाकांक्षा असते. स्वातंत्र्यच नसेल तर देशाचा स्वतंत्र नागरिक म्हणून अस्तित्वच शक्य होणार नाही.

**● व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आवाका**

न्यायालयीन कामकाजांमधून 'व्यक्तिगत स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ बदलत गेलेला आहे. केवळ शारीरिक निर्बंधापासून मुक्तता आणि कायद्याने दिलेले स्वातंत्र्य एवढ्यापुरतेच हे शब्द मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याची व्याप्ती मानवी वर्तनाच्या पूर्ण शक्यतांपर्यंत विस्तारलेली आहे.

**● खाजगीपणाचा हक्क**

खाजगीपणावर अतिक्रमण ही बाब हळूहळू दिनक्रम बनू लागली आहे. त्यामुळे ही मोठी चिंतेची बाब बनली आहे. खासगी गोष्टी समाजाच्या नजरेपासून दूर ठेवण्याची मानवी प्रवृत्ती आहे, भारतीय राज्यघटनेने या हक्काला मूलभूत हक्क मानलेले नाही. त्यामुळे त्याची निश्चित हमी दिलेली नाही. मात्र हा व्यक्तीचा हक्क म्हणून स्वीकारला पाहिजे. व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अतिआवश्यक घटक म्हणून व्यक्तीचे खासगीपण जपून न्यायालयांमार्फत २१ व्या कलमाने विलक्षण महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

श्री. 'क्ष' वि. 'इस्पितळ' (एआयआर १९९९ सु.प्र. ४९५) या प्रकरणात अपेक्स न्यायालयापुढे मोठा गहन प्रश्न होता.

कलम २१ मधील जीविताच्या हक्काचा महत्त्वाचा घटक म्हणजे खासगीपणा जपण्याचा हक्क. मग ज्याचे लग्न ठरले आहे आणि जो एच.आय.व्ही बाधित असल्याचे निदान झाले आहे, अशा रुग्णाविषयीची माहिती डॉक्टरने उघड करणे म्हणजे रुग्णाच्या खासगीपणा जपण्याच्या हक्काचे उल्लंघन ठरते काय ? सर्वोच्च न्यायालय म्हणते की, एकांताचा हक्क हा काही निरंकुश हक्क नाही. गुन्ह्याच्या किंवा अव्यवस्थेच्या प्रतिबंधासाठी किंवा आरोग्यरक्षणासाठी किंवा नैतिकतेसाठी किंवा इतरांच्या स्वातंत्र्यासाठी या हक्कावर कायदेशीरपणे निर्बंध घालता येतात.

### ३.२.३.३ कायद्याने घालून दिलेली कार्यपद्धती

या शब्दांना व्यापक अर्थ आहेत आणि केवळ कायद्यात नमूद केलेली कार्यपद्धती असा याचा अर्थ होत नाही. मनेका गांधी वि. युनियन ऑफ इंडिया (एआयआर १९७८ सु.प्र.५९७) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय म्हणते की, कलम २१ ची कार्यवाही करण्यासाठी केवळ कुठल्या तरी प्रकारची कार्यपद्धती नेमून देणे पुरेसे नाही. कायद्याने नेमून दिलेली कार्यपद्धती ही न्यायोचित, न्याय्य आणि वाजवी असली पाहिजे. ती काल्पनिक, जुलमी/त्रासदायक आणि मनमानी अशी नसावी. त्यात नैसर्गिक न्यायाचे तत्त्व अंतर्भूत असले पाहिजे. नैसर्गिक न्याय हा कायद्याचे न्याय्य संशोधन करून न्यायाची हमी देतो. येथे 'कायदा' या शब्दाचा अर्थ न्यायाचा सरळ आणि वाजवी कायदा असा असून कागदोपत्री केलेला कायदा असा घ्यावयाचा नाही.

## ३.२.४ मनमानी पद्धतीने अटक आणि कैदेविरुद्ध हक्क [ कलम २२(१) व (२) ]

आताच आपण पाहिले की जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून वंचित करणारी कार्यपद्धती ही न्यायाची, सरळ आणि वाजवी असली पाहिजे. कायद्याने नमूद केलेल्या कार्यपद्धतीत ज्या काही किमान आवश्यक बाबी असणे आवश्यक आहेत त्या कलम २२ नमूद करते. कलम २२ दोन स्वतंत्र हक्कांशी संबंधित आहे.

(अ) अटकेतील व्यक्तींचे हक्क [कलम २२(१) व (२)]

(आ) डांबून ठेवलेल्या / कैदेतील / बंदिवासातील लोकांचे हक्क [कलम २२(३) ते (७)]

अटकेत असलेल्या व्यक्तींना कलम २२ (१) व (२) खालील चार अधिकार देते.

**(१) शक्य तितक्या त्वरेने माहिती मिळण्याचा हक्क**

व्यक्तीला त्याच्या अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर सांगितली पाहिजेत. त्यामुळे त्याला त्याचा बचाव तयार करता येतो. जर अशी माहिती देण्यास उशीर झाला तर त्यासाठी काही योग्य कारणे असली पाहिजेत.

**(२) त्याच्या स्वत:च्या निवडीच्या वकिलामार्फत बचावाचा हक्क**

त्याला त्याच्या स्वत:च्या मर्जीप्रमाणे वकिलास प्रतिनिधी म्हणून नेमण्याचा, त्याचा सल्ला घेण्याचा हक्क आहे. जर दारिद्र्य, नादारी, इत्यादी कारणांमुळे व्यक्ती वकील नेमून कायदेविषयक सेवा घेऊ शकत नसेल तर त्यास वकिलाचे सहकार्य उपलब्ध करून देण्याचे न्यायालयाचे कर्तव्य असते. अशा परिस्थितीत मोफत कायदेविषयक सेवा पुरवण्याचे राज्याचे घटनेत नमूद केलेले कर्तव्य असते. जर कायदेविषयक सेवा पुरवली गेली नाही, तर चौकशी बेकायदेशीर ठरते.

**(३) न्यायदंडाधिकाऱ्याच्या समक्ष हजर केले जाण्याचा हक्क**

प्रत्येक अटकेतील व्यक्तीला जवळच्याच न्यायदंडाधिकाऱ्याच्या समक्ष त्याला अटक झाल्यापासून २४ तासांत हजर करावे लागते. तो त्याचा हक्क असतो. न्यायदंडाधिकाऱ्याकडे जाताना प्रवासासाठी लागलेला वेळ वगळून २४ तासांची मुदत दिलेली आहे. न्यायाधीश विचारपूर्वक त्याला ताब्यात ठेवण्याचा काळ वाढवून घेऊ शकतात. पोलिसांनी मनमानी किंवा अन्याय्य अटक केल्यास त्याविरोधात ही तरतूद संरक्षण देते.

**(४) न्यायदंडधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय २४ तासांपेक्षा जास्त काळ कैद करून ठेवता येणार नाही**

न्यायदंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय अटकेतील व्यक्तीला २४ तासापेक्षा जास्त काळ ताब्यात ठेवता येणार नाही. त्यामुळे त्याला जलद गतीने न्याय मिळण्यास मदत होते. जर या अटींची पूर्तता केली नाही तर अटकच बेकायदेशीर ठरते. म्हणजे अटकेतील व्यक्तीला केवळ न्यायदंडाधिकाऱ्याच्या आदेशानेच २४ तासानंतरही ताब्यात ठेवता येते. मात्र हा हक्क कोर्टाच्या वॉरंटनुसार अटक झालेल्या व्यक्तीला लागू होत नाही.

- **अपवाद [कलम २२(३)]**

कलम २२(३) या हक्कांना दोन अपवाद नमूद करते.

कलम २२(१) व (२) मध्ये नमूद केलेले अटकेतील व्यक्तीचे मूलभूत हक्क परकीय शत्रूंसाठी लागू होत नाहीत. ते प्रतिबंधात्मक स्वरूपात कैदेची तरतूद करणाऱ्या कायद्यानुसार अटकेतील किंवा कैदेतील व्यक्तींना लागू होत नाहीत.

### ३.२.४.१ प्रतिबंधात्मक कैदेविरुद्ध घटनात्मक सुरक्षाकवच

काही प्रकरणांमध्ये प्रतिबंधासाठी व्यक्तीला कैद करण्याची गरज राज्यघटनेने ओळखली. मात्र अशा स्वरूपाची कैद नमूद करणाऱ्या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो. हा धोका कमी करण्यासाठी राज्यघटनेने सुरक्षाकवच दिले आहे. समाजाला हानी पोहचवणारे किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात आणणारे कृत्यं करणार असल्याचा संशय किंवा संभव असल्यावरून असे गुन्हेगारी कृत्य करण्यापासून व्यक्तीला प्रतिबंध करण्यासाठी, गुन्हा घडण्यापूर्वी अटक केली जाते. कलम २२(४) ते (७) प्रतिबंधात्मक कैद कायद्यानुसार अटकेतील व्यक्तीला खालीलप्रमाणे सुरक्षितता देण्याची हमी देते.

(१) **सल्लागार मंडळाकडून पुनर्विचार :** सल्लागार मंडळाचे मत न घेता व्यक्तीला दोन महिन्यांपर्यंत कैदेत ठेवता येते. दोन महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी मुदत वाढवण्यासाठी त्यावर सल्लागार मंडळाने पुनर्विचार करणे गरजेचे असते.

(२) **कैदेची कारणे सांगणे :** कैद करण्याबाबत आदेश देणाऱ्या प्राधिकरणाने कैदेतील व्यक्तीला त्याच्या अटकेमागची कारणे शक्य तितक्या लवकर सांगितली पाहिजेत. कैदेमागची कारणे अगदी स्पष्ट आणि कैदेतील व्यक्तीला समजतील अशी सोपी असावीत. त्याला समजेल अशा भाषेत, पूर्णपणे आणि प्रभावीपणे ती कागदावर लिहावीत. त्यामुळे त्याला त्याचे हेतूत: आणि परिणामकारकपणे निवेदन करता येईल. आदेश देतेवेळी कैद करण्यास कारण असलेली परिस्थिती अस्तित्वात असली पाहिजे. नवीन कारणांची भर घालता येणार नाही किंवा आहेत ती कारणे रोखून धरता येणार नाहीत.

(३) **कैदेत असलेल्या व्यक्तीचा निवेदनाचा हक्क :** व्यक्तीला कैद करण्यामागची कारणे पुरेशा तपशिलाने देऊन कैदेतील व्यक्तीला कैदेच्या आदेशाविरुद्ध निवेदन करण्याची संधी ताबडतोब दिली गेली पाहिजे. येथे 'कारणे' म्हणजे ज्या वस्तुस्थिती आणि साधनांच्या आधारावर कैदेबाबत आदेश केला आहे ती वस्तुस्थिती आणि साधने होत. मनमानी आणि लहरी पद्धतीने सत्तेच्या वापराला प्रतिबंध करण्यासाठी ही तरतूद केली आहे.

- **अपवाद :** कलम २२(६) नुसार सार्वजनिक हिताच्या विरोधातील वस्तुस्थिती कैदेतील व्यक्तीकडे उघड करू नये.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

**(अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या हक्काचा अर्थ काय ?

(२) राज्यघटनेने अटक झालेल्या व्यक्तीला प्रदान केलेले कोणतेही दोन हक्क सांगा.

(३) कैदेतील व्यक्तीला उपलब्ध असलेली तीन सुरक्षाकवचे कोणती ?

**(आ) बरोबर की चूक ते सांगा.**

(१) भारतीय राज्यघटना खाजगीपणाच्या हक्काचा मूलभूत हक्क म्हणून विशेष उल्लेख करते.

(२) व्यक्तीला जीविताच्या आणि व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून वंचित करणारी कार्यपद्धती वाजवी, न्यायोचित आणि योग्य असली पाहिजे.

## ३.३ सारांश

या घटकात आपण पाहिले की, आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी, प्रगती

करण्यासाठी मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य संमती देतात. मानवी हक्कांना मान्यता देण्याच्या आणि त्यांना आदर देण्याचाच नव्हे तर लोकशाही समाजांमध्ये मानवी हक्कांविषयी जागृती आणण्याच्या प्रवासात भाषण, विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, निवास-संचाराचे स्वातंत्र्य, इत्यादी दूरपर्यंत साथ देतात.

कोणताही हक्क निरंकुश नसतो, म्हणून राष्ट्राचे आणि एकूणच समाजाचे हित जपण्यासाठी राज्यघटनेच्या कलम १९ ने प्रदान केलेली स्वातंत्र्ये उपभोगताना त्यावर काही योग्य निर्बंध घालता येतात.

कलम २० गुन्ह्यांच्या दोष सिद्धीच्या बाबतीत संरक्षण देते. त्यात कार्योत्तर कायद्याविरुद्ध हक्क, दुहेरी धोक्यापासून संरक्षण आणि स्वत:लाच गुन्हेगार सिद्ध करण्यापासून संरक्षण यांचा समावेश होतो.

घटनेचे कलम २१ जीविताचा हक्क आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क प्रदान करते. जीविताचा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क म्हणजे नुसते मनुष्यप्राणी म्हणून जिवंत असणे नव्हे, तर अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी उपजीविकेसह आवश्यक अशा सर्व बाबींचा यात समावेश होतो. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांनी न्यायदानाचे कार्य करताना विविध निवाड्यांमधून कलम २१ची व्याप्ती फूटपाथावर राहणारे ते पर्यावरणाचे प्रश्न आणि औद्योगिक आपत्तीपर्यंत वाढवली आहे. खाजगीपणाचा हक्क, जलदगतीने न्यायालयीन चौकशीचा हक्क, कायद्यानुसार जामिनावर मुक्ततेचा हक्क हे सर्व व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या हक्काचेच पैलू आहेत.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**आरोपी :** गुन्हा केल्याचा आरोप असणारी व्यक्ती

**गुन्हेगार :** गुन्हा शाबीत झालेली आणि त्यासाठी शिक्षा झालेली व्यक्ती

**दुहेरी धोका :** ज्या गुन्ह्यासाठी पहिली न्यायालयीन चौकशी झालेली आहे त्याच गुन्ह्यासाठी दुसरा खटला भरणे.

**प्रतिबंधात्मक कैद :** कायद्यानुसार कारागृहात ठेवणे किंवा कैद करणे.

**रिमांड :** विशेषत: संपत्ती परत मिळवण्यासाठी किंवा फौजदारी आरोपांवर अधिक पुरावा मिळवण्यासाठी आरोपीला परत कोठडीत पाठवण्याची कृती.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १*

(१) भाषण, विचार, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आणि संचार स्वातंत्र्य

(२) नाही. स्वातंत्र्यावर कायद्याने योग्य निर्बंध घातलेले असतात.

(३) होय. राज्यघटनेने ज्या स्वातंत्र्याची हमी दिली आहे त्यांचा मानवी हक्कांमध्ये समावेश होतो.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २*

(१) कार्योत्तर कायदे म्हणजे असे कायदे जे अशा कृत्यांसाठी / गुन्ह्यांसाठी शिक्षा देतात, जी कृत्ये करतेवेळी कायदेशीर होती, परंतु शिक्षा देतेवेळी बेकायदेशीर असतात.

(२) एका किंवा त्याच गुन्ह्यासाठी माणसाला एकापेक्षा जास्त वेळा संकटात टाकता येणार नाही.

(३) गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणाही व्यक्तीला स्वत:विरुद्ध साक्ष देण्याची सक्ती करता येणार नाही.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३*

(अ) (१) व्यक्तिगत स्वातंत्र्याची व्याख्या अशी केली आहे. 'कैद, बंदिवास, गुलामगिरी किंवा जुलमी नियंत्रणापासून मुक्त असणे.

(२) ताबडतोब माहिती मिळण्याचा हक्क आणि त्याच्या निवडीप्रमाणे वकिलामार्फत बचावाचा हक्क.

(३) सल्लागार मंडळाकडून पुनर्विचार, कैदेत टाकण्याची कारणे सांगणे, कैदेतील व्यक्तीचा निवेदनाचा हक्क.

**(आ)** (१) चूक (२) बरोबर

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संचाराच्या स्वातंत्र्याचे महत्त्व सांगा.

(२) भाषण, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्पष्ट करा.

(३) भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेल्या मुद्रण स्वातंत्र्याच्या संदर्भातून मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अंमलबजावणीसाठी छापखाने / वृत्तपत्रे कोणती भूमिका बजावू शकतात ?

(४) पोलिसांच्या हातून मानवी हक्कांचे उल्लंघन होते काय ? कसे ?

(५) राज्यघटनेने दिलेल्या जीविताचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) डी.डी. बसू, कॉन्स्टिट्युशनल लॉ ऑफ इंडिया

(२) ह्युमन राईटस् अँड द कॉन्स्टिट्यूशनल व्हीजन अँण्ड द रिॲलिटी, (संपादन - के.पी. सक्सेना)

(३) सुनील व किरण, फंडार्मेंटल ह्युमन राईटस्

(४) शर्मा गोकुलेश, ह्युमन राइटस अँड लिगल रेमेडीज

(५) ह्युमन राईटस् अँड क्रिमिनल जस्टीस ॲडमिनिस्ट्रेशन इन इंडिया, संपादन - नूरजहाँ बावा

(६) गौतम अश्विनी कांत, ह्युमन राईटस् अँड जस्टीस सिस्टीम

# घटक ४ : मूलभूत हक्क : धार्मिक, सांस्कृतिक आणि इतर हक्क

*अनुक्रमणिका*


४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
 ४.२.१ शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ व २४)
 ४.२.२ धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५, २६, २७ व २८)
 ४.२.३ सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)
 ४.२.४ घटनात्मक उपायांचा हक्क (कलम ३२)
 ४.२.५ कलम ३२ नुसार कोण अर्ज करू शकतो ?
 ४.२.६ रिट / आदेशाचा हेतू आणि अर्थ
४.३ सारांश
४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

★ शोषणाविरुद्धचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक हक्क आणि शैक्षणिक हक्क या मूलभूत हक्कांचे वर्णन करता येईल.

★ घटनात्मक उपायांचा हक्क या महत्त्वाच्या मूलभूत हक्काचे वर्णन करता येईल.

★ रिटचा / आदेशाचा अर्थ स्पष्ट करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

'भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे' या राज्यघटनेच्या घोषवाक्याला मूलभूत हक्कांमुळे आधार मिळतो. मूलभूत हक्क या घोषणेला अर्थ प्राप्त करून देतात, कारण मूलभूत हक्कांद्वारे सर्वांना धर्माचे स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले आहे.

कोणत्याही हक्काला उपायाची तरतूद केलेली नसेल तर काहीही अर्थ नसतो. कलम ३२ या उपायांच्या हक्काला मान्यता देते. राज्यघटनेतील भाग ३ मध्ये नमूद केलेल्या सर्व इतर मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी उपाय दिलेले नसतील तर ते कागदोपत्रीच राहतील. म्हणून कलम ३२ ला राज्यघटनेचे प्राण आणि आत्मा असे म्हटले आहे.

## ४.२ विषय-विवेचन

### ४.२.१ शोषणाविरुद्ध हक्क (कलम २३ व २४)

कलम २३ व २४ हे भारतीय समाजाचा स्पष्ट आरसा आहे. ही कलमे म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठी दिलेले

जादा सुरक्षाकवच आहे आणि हा समाजातील दुर्बल वर्गाचा, व्यक्तींकडून किंवा अगदी राज्यांकडूनही होऊ शकणाऱ्या शोषणाच्या प्रतिबंधासाठी केलेला प्रयत्न आहे. भारतात आजही दारिद्र्य आणि इतर सामाजिक दुष्ट रूढी अस्तित्वात आहेत. अनैतिक देहव्यापार आणि वेठबिगार यासारख्या प्रमुख दुष्ट रूढींचे निर्मूलन करण्यासाठी कलम २३ प्रयत्न करते. हे कलम अनैतिक देहव्यापार आणि भीक मागणे आणि या प्रकारच्या इतर प्रकारचे वेठबिगार यांना प्रतिबंध करते. या कलमातील तरतुदींचे उल्लंघन शिक्षेस पात्र ठरते. तथापि, या कलमास एक अपवाद असा आहे की, या कलमातील कोणतीही बाब राज्याला सार्वजनिक हेतूसाठी सक्तीच्या सेवा लादण्यापासून प्रतिबंध करणार नाही. असे करताना राज्य, धर्म, वंश, जात, लिंग किंवा यापैकी कोणत्याही कारणासाठी भेदभाव करणार नाही.

ही कलमे लक्षात घेऊन भारताच्या संसदेने १९५६ सालचा स्त्रिया आणि मुलांमधील अनैतिक देहव्यापार रद्द करणारा कायदा आणि आताचा अनैतिक देहव्यापार (प्रतिबंध) कायदा १९८२ आणि १९७६ सालचा वेठबिगार पद्धत (निर्मूलन) कायदा संमत केलेले आहे. या कायद्यांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास दंड आणि कैदेची शिक्षा सांगितलेली आहे. भिक्षा प्रतिबंधक कायदादेखील संमत झालेला आहे. येथे मानवी देहव्यापार म्हणजे पुरुष आणि स्त्रियांना वस्तू असल्याप्रमाणे विकणे, भाड्याने देणे किंवा इतर पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणे. त्यात स्त्रिया आणि मुलांचा अनैतिक कारणांसाठी आणि इतर हेतूंसाठी व्यापार याचा समावेश होतो. भिक्षा म्हणजे जबरदस्तीने कोणत्याही मोबदल्याशिवाय भिक्षा मागण्याचा समावेश होतो. कोणत्याही व्यक्तीवर, नागरिकावर किंवा अ-नागरिकावर विनावेतन काम करण्याची सक्ती करता येणार नाही. तो त्यांचा मूलभूत हक्क आहे. याच कलमानुसार अशा प्रकारच्या इतर उद्योगांना प्रतिबंध केलेला आहे.

के शासन थांकुल वि. सीमीरी शैलर (एआयआर १९६१ मणिपूर पान १) या प्रकरणी विचार करताना मणिपूर राज्यातील एक प्रथा न्यायालयापुढे होती. तेथे गावाच्या प्रमुखाकडे गावातील प्रत्येक घरातील माणसाने एकेक दिवस मोफत काम करायचे अशी प्रथा होती. या प्रकरणातील अपीलकार (अपेलंट) याने असे मोफत काम करायचे नाकारले आणि भिक्षा मागणे आणि इतर प्रकारच्या वेठबिगारास प्रतिबंध करणाऱ्या राज्यघटनेच्या कलम २३(१) मधील तरतुदींच्या विरुद्ध असलेल्या या प्रथेला त्याने आव्हान दिले. न्यायालयाने ही प्रथा राज्यघटनेचे कलम २३(१) चा उल्लंघन करणारी आहे असा निर्वाळा दिला.

पिपल्स युनियन ऑफ डेमॉक्रेटिक राईटस् (पीयुडीआर) वि. युनियन ऑफ इंडिया (एआयआर १९८२ सु.प्र. १४७३) या दुसऱ्या एका प्रकरणात असे म्हटले आहे की, कलम २३(१) नुसार केस दाखल करण्यासाठी व्यक्तीला त्याच्या इच्छेविरुद्ध विनावेतन काम करण्यासाठी जबरदस्ती केली गेली आहे हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

कलम २४ सांगते की, १४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकाला कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत किंवा कोणत्याही इतर धोकादायक उद्योगामध्ये कामावर ठेवता येणार नाही. कोणत्याही कारखान्यात, कोणत्याही कामावर १२ वर्षांपेक्षा कमी वय असलेली मुले कामासाठी ठेवण्यास भारतीय कारखाने कायदा १९४८ प्रतिबंध करतो. कामगार मुलांच्या कायदा १९३८ चे कलम ३ हे रेल्वे आणि इतर वाहतुकीच्या साधनांच्या ठिकाणी १४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करते.

तथापि, बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा १९८६, च्या पार्श्वभूमीवर बालकामगारांविषयी अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने विशेष कृती दल स्थापन केले होते. या कृती दलाच्या अहवालावरून सरकारने असे निश्चित केले की, धोकादायक आणि धोकादायक नसलेल्या अशा दोन्ही ठिकाणी कामास असलेल्या कुणाही १५ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलाला बालकामगार मानले जाईल. त्यानंतर अशा मुलांच्या कल्याणासाठी त्याचबरोबर त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी निश्चित पावले उचलणे अपेक्षित होते.

### ४.२.२ धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५, २६, २७ व २८)

कलम २५, २६, २७ व २८ ही धर्माच्या स्वातंत्र्याच्या हक्काबाबत आहेत. आपली राज्यघटना धर्मनिरपेक्ष राज्याच्या निर्मितीचे आश्वासन देते. सर्व धर्मांबद्दल तटस्थतेची आणि नि:पक्षपातीची वृत्ती धर्मनिरपेक्ष राज्य बाळगत असते. अशा प्रकारच्या राज्याच्या पायाचा आधार माणूस आणि देव यांच्यातील नात्याचा नसून व्यक्तिगत सद्सद्विवेकबुद्धीच्या माणसा माणसांतील नात्याचा असतो. सरकारचे कोणत्याही धर्माशी वचनबद्ध नसणे, सरकारने कोणत्याही धार्मिक चालीरीतींची सक्ती न करणे, धार्मिक आणि अधार्मिक यांच्यात पक्षपात न करणे, धार्मिक विश्वासाला प्रतिबंध न करणे, इत्यादी बाबी खऱ्या अर्थाने धार्मिक स्वातंत्र्याला पूर्णपणे मान्यता मिळवून देण्यासाठी अत्यावश्यक असतात. भारतात 'राज्याचा धर्म' या संकल्पनेला राज्यघटना संमती देत नाही. म्हणून राज्य त्याचा स्वत:चा धर्म स्थापन करणार नाही किंवा कोणत्याही धर्माला विशेष आधार/आश्रय देणार नाही. अमेरिका त्याचबरोबर इंग्लंड या देशांत धर्माच्या स्वातंत्र्याची तरतूद स्वीकारलेली आहे.

कलम २५ प्रत्येक व्यक्तीला दोन प्रकारची धार्मिक स्वातंत्र्ये प्रदान करते.

(१) सारासार विचाराच्या स्वातंत्र्याचा हक्क म्हणजे धर्माविषयी आंतरिक विचारात परिवर्तनाचा हक्क.

(२) ज्याच्या त्याच्या निवडीचा धर्म आचरण्याचा आणि प्रसाराचा हक्क.

कलम ६ धार्मिक बाबींच्या व्यवस्थापनाचा हक्क प्रदान करते. कलम २७ कोणत्याही विशिष्ट धर्माच्या वाढीसाठी कर आकारणीविरुद्ध स्वातंत्र्याची हमी देते. याचा अर्थ धार्मिक कारणांसाठी राज्य कोणताही कर आकारू शकणार नाही. कोणत्याही धर्माच्या वाढीसाठी कोणाही व्यक्तीवर कर भरण्याची सक्ती केली जाणार नाही.

कलम २८ एखाद्या धार्मिक संस्थेतील धार्मिक प्रवचनास हजर राहण्याच्या हक्काविषयी सांगते. परंतु राज्याच्या अखत्यारीतील कोणत्याही शाळेत एखाद्या विशिष्ट धर्माची शिकवण दिली जाणार नाही.

धर्माच्या स्वातंत्र्याशी संबंधित सर्व तरतुदींवर सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य या कारणांसाठी निर्बंध आहेत. धाकदपटशा करून किंवा आर्थिक आमिषे दाखवून जबरदस्तीने कोणाचेही धर्मांतर करता येणार नाही. अशा निर्बंधामुळे धर्मांतराचा मुद्दा नेहमीच वादग्रस्त बनलेला आहे. हे स्पष्ट आहे की, या तरतुदी अल्पसंख्याकांचे हक्क आणि भारतीय समाजातील धर्मनिरपेक्ष धागा टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

### ४.२.३ सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम २९ व ३०)

कलम २९ व ३० ही सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्काच्या संरक्षणाची तरतूद नमूद करतात. भाषा, लिपी आणि संस्कृती यांच्या संदर्भातून व्यक्तीच्या या हक्काला कलम २९ मान्यता देते. याचा आणखी अर्थ असा आहे की, प्रत्येक समाजाला स्वत:ची अशी एक संस्कृती असते. राज्य त्यावर त्यापेक्षा वेगळी संस्कृती लादणार नाही.

कलम ३० सांगते की, धर्मावर किंवा भाषेवर आधारित सर्व अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांच्या निवडीप्रमाणे त्या चालवण्याचा हक्क आहे. संस्था चालवणे म्हणजे संस्थेच्या बाबींचे व्यवस्थापन असा होतो. हे व्यवस्थापन नियंत्रणमुक्त असले पाहिजे.

त्याद्वारे समाजाचे संस्थापक सर्वसाधारणपणे समाजाचे आणि विशेषत: संस्थेचे हित कशात आहे याविषयी त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्यांना योग्य वाटेल तसे संस्थेला घडवू शकतील. कलम ३०(२) राज्याला कोणत्याही शिक्षण संस्थेला अनुदान देण्याच्या बाबतीत धार्मिक अल्पसंख्याक किंवा भाषिक अल्पसंख्याक यांचे व्यवस्थापन असा भेदभाव करण्यास प्रतिबंध करते. हा हक्क निरंकुश नाही किंवा नियमनापासून मुक्त नाही. त्यांना

शैक्षणिक स्वरूप आणि अल्पसंख्याकांच्या संस्थांचा आशय राखण्यासाठी आणि व्यवस्थित, सक्षम आणि सशक्त प्रशासनाची हमी देण्यासाठी नियमनाचे उपाय गरजेचे आहेत.

राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडतेची सुरक्षितता हे आपल्या राज्यघटनेचे ध्येय आहे. अल्पसंख्याक समाजांना न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य उपभोगता यावे यासाठी त्यांना धार्मिक आणि सांस्कृतिक सुरक्षाकवच प्रदान करण्यात आले आहे. परंतु राज्यघटनाकारांनी दिलेल्या तरतुदीव्यतिरिक्त जादा तरतुदीची मागणी करणे म्हणजे या जनसमूहांच्या क्षुद्र उद्दिष्टांना चिरस्थायी करणे आहे. अशी उद्दिष्टे ही नि:संशयपणाने राष्ट्राच्या ऐक्य आणि अखंडतेच्या आदर्शसाठी अडथळे निर्माण करतील.

## ४.२.४ घटनात्मक उपायांचा हक्क (कलम ३२)

'Ubi jus ibi remedium' हे सर्वपरिचित सूत्र आहे. त्याचा अर्थ 'उपायाशिवाय कोणत्याही हक्काला अस्तित्व नसते' असा आहे.

जर हक्कांच्या अंमलबजावणीसाठी परिणामकारक यंत्रणा नसेल तर मूलभूत हक्कांची घोषणा निरर्थक ठरेल हे खरे आहे. उपायांमुळेच हक्कांचा अंमल असतो. जर उपायच नसेल तर हक्कही नसेल. म्हणूनच राज्यघटनाकारांनी मूलभूत हक्कांची प्रदीर्घ यादी दिली आणि त्याचबरोबर या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी कलम ३२ मध्ये परिणामकारक उपायही प्रदान केले. कलम ३२ हे स्वत:च मूलभूत हक्क आहे.

कलम ३२ मध्ये राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातून प्रदान केलेल्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे योग्य कार्यपद्धतीने दाद मागण्याचे अधिकार दिलेले आहेत. राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कोणत्याही हक्काच्या अंमलबजावणीसाठी हिबीयस कार्पस, मँडॅमस, प्रोहिबिशन, को वारंटो आणि सर्शिओराराय यापैकी जे योग्य असेल त्या स्वरूपात रिट, मार्गदर्शन किंवा हुकूम बजावण्याचे सर्वोच्च न्यायालयाला अधिकार आहेत.

घटना समितीत कलम ३२ चे महत्त्व सांगताना डॉ. बी.आर. आंबेडकरांनी या कलमाचे वर्णन 'घटनेचा आत्मा' असे केले आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचे तर, "जर मला या राज्यघटनेतील अतिमहत्त्वाचे कोणतेही एक कलम विचारले, असे कलम जे नसेल तर ही राज्यघटना व्यर्थ ठरेल, मी या एका कलमाशिवाय दुसऱ्या कुठल्याही कलमाचे नाव घेणार नाही. हे कलम राज्यघटनेचा आत्मा आहे आणि तिचा प्राण आहे."

## ४.२.५ कलम ३२ नुसार कोण अर्ज करू शकतो ?

राज्यघटनेने प्रदान केलेल्या मूलभूत हक्कांपैकी कोणत्याही हक्कांचे उल्लंघन झाले तर तशी तक्रार असणाऱ्या व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचे स्वातंत्र्य आहे. केवळ निसर्गनिर्मित माणसालाच या तरतुदी किंवा हक्क लागू आहेत असे त्या तरतुदीच्या भाषेवरून किंवा स्वरूपावरून दिसून येत नसेल तिथे मानवनिर्मित / कायद्याने मान्यता दिलेल्या कार्पोरेट / व्यवस्थापकीय मंडळांनादेखील ही तरतूद लागू होते. जेव्हा कंपनीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होते तेव्हा तिच्या भागधारकांनी नव्हे तर कंपनीने तो हक्क बजावून घेण्यासाठी पुढे यायचे असते.

आता मूलभूत हक्कांच्या उल्लंघनामुळे प्रभावित व्यक्ती किंवा समूहाच्या वतीने कुणीही व्यक्ती, सामाजिक कृती दल किंवा स्वयंसेवी संस्था नव्यानेच रुजू झालेल्या जनहित याचिकांचा लाभ घेऊन उच्च न्यायालये किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतात. जनहित याचिकेची विस्तृत माहिती या पुस्तकाच्या ६ व्या घटकात दिलेली आहे.

यापूर्वी सांगितल्याप्रमाणे, कलम ३२ (२) नमूद करते की, मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाला आदेश, मार्गदर्शन किंवा हक्क बजावण्याचा अधिकार आहे. आदेशामध्ये हेबियस कॉर्पस, मँडॅमस, प्रोहिबिशन, को वारंटो आणि सर्शिओराराय यापैकी जे

काही योग्य असेल त्या प्रकारच्या रिटचा समावेश होतो. सर्वोच्च न्यायालयापेक्षा जास्त अशाच प्रकारचे अधिकार उच्च न्यायालयांना दिले आहेत.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१*

**(अ) कंसात दिलेल्या योग्य पर्याय निवडा आणि मोकळ्या जागा भरा.**

(१) मनुष्याचा व्यापार म्हणजे पुरुष आणि स्त्रियांना ............ असल्याप्रमाणे विकणे, भाड्याने देणे किंवा त्यांची इतर प्रकारे विल्हेवाट लावणे. (वस्तू/ उत्पादन / नोटा)

(२) भारताच्या राज्यघटनेतील तरतुदीनुसार ........... वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या कोणत्याही मुलाला कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत किंवा कोणत्याही इतर धोकादायक उद्योगात कोणत्याही कामावर नेमता येणार नाही. (१६ / १२ / १४)

(३) भारतीय राज्यघटनेचे कलम ३२(२) सांगते की, सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांना आदेश, .............. म्हणून ओळखले जाणारे मार्गदर्शन बजावण्याचे अधिकार आहेत.
(आज्ञा / निवाडा / रिट)

(४) आपली राज्यघटना ............. राज्याच्या स्थापनेची तरतूद करते. (धर्मनिरपेक्ष / सैद्धान्तिक / मूलतत्त्ववादी)

**(आ) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| (अ) कलम २४ | (१) राज्यघटनेचा आत्मा |
| (ब) कलम २३ | (२) बालकामगारांना प्रतिबंध |
| (क) कलम ३० | (३) अनैतिक देहव्यापार, भिक्षा मागणे आणि वेठबिगारीला प्रतिबंध |
| (ड) कलम ३२ | (४) अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा आणि चालवण्याचा हक्क आहे. |

## ४.२.६ रिट/आदेशाचा हेतू आणि अर्थ

### (१) बंदी प्रत्यक्षीकरण रिट (Habius Corpus Writ)

हेबियस कॉर्पस हा शब्द 'तुम्हाला शरीर आहे' या अर्थाच्या लॅटिन शब्दावरून घेतला आहे. हेबियस कॉर्पसची रिट उच्च विशेषाधिकार असलेली रिट आहे. बेकायदेशीरपणे अडकवून ठेवलेल्या व्यक्तींची न्यायालयीन हुकूमनाम्याद्वारे जलद गतीने सुटका करण्याचा त्या रिटचा हेतू असतो. इतर व्यक्तीला बेकायदेशीरपणे स्वतःच्या ताब्यात ठेवणाऱ्या व्यक्तीने त्या डांबलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर करावे अशी ती आज्ञा असते. ती इतर व्यक्तीला बेकायदेशीरपणे स्वतःच्या ताब्यात ठेवणाऱ्या व्यक्तीला उद्देशून केलेली आज्ञा असते. रिटचे पालन न करणे म्हणजे न्यायालयाचा अवमान झाल्याप्रमाणे मानून शिक्षा होते. तुरुंगाधिकाऱ्यांकडून कोठडीतील छळापासून माणसाची सुटका करण्यासाठी न्यायालय असा रिट (आदेश) बजावते. बंदी प्रत्यक्षीकरण रिट ही खासगी व्यक्ती किंवा कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मनमानी कृतींविरुद्धचे शक्तिशाली सुरक्षाकवच आहे. तथापि, रिटचा(आदेशाचा) उपयोग खालील परिस्थितीत करता येत नाही.

- ज्या व्यक्तीविरुद्ध आदेश आहे ती व्यक्ती किंवा कैदेतील व्यक्ती न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील नसल्यास
- गुन्ह्याच्या आरोपावरून न्यायालयाने कैदेत टाकलेल्या व्यक्तीला मुक्ततेची हमी देण्यासाठी

### (२) परमादेश (Mandamus Writ)

परमादेश/मॅंडॅमस हा शब्द 'आम्ही आज्ञा करतो' या अर्थी लॅटीन शब्दावरून घेतलेला आहे.

ती सक्षम न्यायालयाने राज्याच्या नावे किंवा अधिकारी, महामंडळ किंवा व्यक्तीने विशिष्ट सार्वजनिक कर्तव्य पार पाडावे यासाठी केलेली आज्ञा आहे. भारतात केवळ सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी बद्ध असलेली अधिकारी किंवा इतर व्यक्तीच नव्हेत तर स्वत: सरकारविरुद्ध देखील ही आज्ञा केलेली असते. कलम २२६ व ३६१ संबंधित सरकारविरुद्ध करावयाची योग्य कार्यपद्धती नमूद करतात. हे उच्च विशेषाधिकार रिट आहे. सर्वाधिक दूरगामी प्रतिबंधात्मक स्वरूपाची रिट आहे. त्याचा हेतू न्यायाचे दोष काढून टाकण्याचा आहे. जिथे विशिष्ट कायदेशीर हक्क आहेत आणि अंमलबजावणीसाठी विशिष्ट कायदेशीर इलाज नाही अशा सर्व प्रकरणांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी ही रिट बजावतात. जेव्हा कनिष्ठ न्यायालये किंवा इतर न्यायिक मंडळे त्यांचे अधिकार क्षेत्र वापरण्यास नकार देतात आणि म्हणून त्यांनी त्यांचे कर्तव्य बजावले नाही असे म्हणता येते अशा कनिष्ठ न्यायालयांविरुद्ध किंवा न्यायिक मंडळाविरुद्ध देखील ही रिट उपलब्ध आहे.

परमादेश हा खालील बाबतीत दिला जात नाही.

- राष्ट्रपती किंवा राज्यपाल
- जर खासगी व्यक्ती किंवा मंडळ राज्याशी भागीदारीत नसेल किंवा अशा खासगी पक्षाशी संगमताने काम करत नसेल तेव्हा अशा खासगी व्यक्ती किंवा मंडळे.

### (३) प्रतिबंध रिट (Writ of Prohibition)

सर्वोच्च न्यायालयाच्या शब्दांत सांगायचे तर ''मुख्यत्वाने देखरेख ठेवण्याच्या कामासाठी प्रतिबंध रिट संमत केल्या जातात आणि या रिटचे उद्दिष्ट न्यायालये किंवा कनिष्ठ न्यायाधिकरणांनी त्यांना जे अधिकार दिलेलेच नाहीत असे अधिकार वापरण्यापासून रोखण्याचे असते किंवा मग त्यांना त्यांच्या अधिकारांपलीकडे जाऊन काम करण्यास प्रतिबंध करण्याचे असते.'' ही रिट सर्वोच्च न्यायालये किंवा उच्च न्यायालये त्यांच्यापेक्षा कनिष्ठ न्यायालयांना कामकाज पुढे चालविण्यास मनाई करण्यासाठी बजावतात. हे कामकाज न्यायालयाच्या अधिकार कक्षेबाहेर जाऊन सुरू असते किंवा कायद्याने नेमून दिलेल्या अधिकार कक्षेत मोडणारे नसते. परमादेश आणि प्रतिबंध रिट यांच्यात मुख्य फरक म्हणजे परमादेश 'क्रियाशीलतेची' आज्ञा देतो तर प्रतिबंध रिट 'क्रियाशून्यतेची' आज्ञा करते. हे लक्षात ठेवले पाहिजे की, प्रतिबंध रिट केवळ न्यायिक अधिकारीणी किंवा न्यायिकसदृश्य अधिकारीणी उदाहरणार्थ, न्यायाधिकरणे यांच्या विरोधात बजावली जाते. ही रिट न्यायाधिकरणाला अल्ट्राव्हायरस आदेश किंवा निर्णय करण्यास प्रतिबंध करते.

### (४) उत्प्रेषण रिट (Writ of Certiorari)

ही रिट वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयास बजावतात. कनिष्ठ न्यायालयासमोर प्रलंबित खटला किंवा प्रकरणाच्या कामकाजाची कागदपत्रे विचारार्थ वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवावीत असा तो आदेश असतो. कायदेविषयक चूक झाली किंवा नैसर्गिक न्यायतत्त्वाचे उल्लंघन झाले असेल तर ही रिट बजावली जाते. प्रतिबंध रिट ही सुरुवातीच्या टप्प्यावर उपलब्ध असते तर त्यानंतरच्या टप्प्यांवर उत्प्रेषण रिट उपलब्ध असते. ती जनतेच्या हक्कांवर परिणाम करणाऱ्या प्रश्नांवर निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार असलेल्या आणि न्यायाने वागण्याची कृती करण्याचे कर्तव्य असलेल्या न्यायाधिकरणाविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध बजावली जाते. जर अशा न्यायाधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने त्याला अधिकार नसताना कृती केली किंवा कायद्याने त्याला दिलेल्या अधिकारापलीकडे जाऊन जादा अधिकाराने कृत्य केले तर अन्याय होऊ शकतो. अशा अन्यायाची दुरुस्ती करण्यासाठी उत्प्रेषण रिट बजावली जाते.

### (५) अधिकार पृच्छा रिट (Quo Warranto Writ)

अधिकार पृच्छा रिट म्हणजे 'तुम्हाला काय अधिकार' ? या रिटचे उद्दिष्ट ज्या व्यक्तीने अन्याय पद्धतीने कार्यालय/पद बळकावले आहे त्याला त्या पदावर / कार्यालयात कामावर राहण्यापासून प्रतिबंध करणे हे आहे.

ही रिट तो कोणत्या अधिकाराने त्या पदावर आहे हे त्याने न्यायालयाला दाखवून द्यावे यासाठी त्या पदाधिकाऱ्याला न्यायालयासक्षम हजर राहण्याबाबत आदेश असतो. जर न्यायालयाचा निर्णय असा झाला की, वादातील पद हे त्याने बेकायदेशीररित्या स्वत:कडे ठेवले आहे तर न्यायालय त्यांच्या हकालपट्टीचा आदेश देते. अधिकार पृच्छा रिटचा नागरिकाचा दावा सिद्ध करण्यासाठी त्या नागरिकाने वादातील पद हे सार्वजनिक कार्यालयाशी संबंधित आहे आणि ते कायदेशीर अधिकार नसताना बळकावण्यात आलेले आहे, याबाबत न्यायालयास समाधानकारक खुलासा केला पाहिजे. वादातील पद हे कायमस्वरूपी असले पाहिजे. केवळ एखाद्याच्या मर्जीनुसार उद्योगातील नोकरी किंवा कार्य असता कामा नये.

सार्वजनिक पदे बेकायदेशीरपणे भूषवली जाऊ नयेत. त्यात जनतेचे हित असते. या मूलभूत कारणासाठी अधिकार पृच्छा रिटचे कामकाज चालते.

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २***

**खालील संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.**

(१) बंदी प्रत्यक्षीकरण रिट (हेबियस कॉर्पस)

(२) परमादेश (मॅंडॅमस)

(३) प्रतिबंध (प्रोहिबिशन)

(४) उत्प्रेषण (सर्शिओराराय)

(५) अधिकार पृच्छा (को वारंटो)

## ४.३ सारांश

या घटकामध्ये आपण पाहिले की, कलम २३ व २४ ही व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठी प्रदान केलेली जादा सुरक्षाकवच आणि समाजातील दुर्बल वर्गाचे इतर व्यक्ती किंवा अगदी राज्याकडून होऊ शकणाऱ्या शोषणाच्या प्रतिबंधासाठी केलेला प्रयत्न आहे. अनैतिक देहव्यापार आणि वेठबिगार यासारख्या प्रमुख दुष्ट रूढींचे निर्मूलन करण्यासाठी कलम २३ प्रयत्न करते. कोणत्याही व्यक्तीवर, नागरिकांवर किंवा अ-नागरिकांवर विनावेतन काम करण्याची सक्ती करता येणार नाही. तो त्यांचा मूलभूत हक्क आहे. कलम २४ सांगते की, १४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकाला कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत किंवा कोणत्याही इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवता येणार नाही.

आपली राज्यघटना धर्मनिरपेक्ष राज्याच्या निर्मितीचे आश्वासन देते. धर्मनिरपेक्ष राज्य सर्व धर्मांबद्दल तटस्थतेची आणि नि:पक्षपातीपणाची वृत्ती बाळगत असते.

कलम २५ प्रत्येक व्यक्तीला दोन प्रकारची धार्मिक स्वातंत्र्ये प्रदान करते. लोकशाही पद्धतीच्या शासनात स्वातंत्र्याचा हक्क असलाच पाहिजे. कलम २६ धार्मिक बाबींच्या व्यवस्थापनाचा हक्क प्रदान करते तर कलम २७ कोणत्याही विशिष्ट धर्माच्या वाढीसाठी कर आकारणीविरुद्ध स्वातंत्र्याची हमी देते. कलम २८ एखाद्या धार्मिक संस्थेतील धार्मिक प्रवचनास हजर राहण्याच्या हक्काविषयी सांगते. धर्माच्या स्वातंत्र्याशी संबंधित सर्व तरतुदींवर सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य या कारणांसाठी निर्बंध आहेत. कलम २९ व ३० हे सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांच्या संरक्षणाची तरतूद नमूद करतात. राज्यघटनाकारांनी भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्क समाविष्ट केले आहेत आणि या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी कलम ३२ मध्ये परिणामकारक उपायही नमूद केले आहेत.

राज्यघटनेने प्रदान केलेल्या कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले तर तशी तक्रार करणाऱ्या व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेने प्रदान केलेले आहे. मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाला हुकूम करण्याचे, मार्गदर्शन किंवा आदेश बजावण्याचे अधिकार आहेत. आदेशामध्ये (रिट) बंदी प्रत्यक्षीकरण (हेबियस कार्पस), परमादेश (मॅंडॅमस), प्रतिबंध (प्रोहिबिशन), अधिकार पृच्छा (को वारंटो)

आणि उत्प्रेषण (सर्शिओराराय) यापैकी जो योग्य असेल त्या आदेशाचा (रिटचा) समावेश होतो. असेच अधिकार उच्च न्यायालयांनादेखील दिले आहेत.

राज्यघटनेत जतन केलेल्या पूर्ण मूलभूत हक्कांच्या समूहाला उपायांचा हक्क, जीवनदान आणि रक्तदान देतो.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**नैसर्गिक न्याय :** मानवजातीच्या सहज नैसर्गिक, नैतिक भावनांवर आधारित न्याय.

**अधिकार क्षेत्र :** न्यायालयाला न्यायविषयक कामकाज चालवण्याचा आणि त्यावर निर्णयाचा अधिकार किंवा क्षमता

**वॉरंट :** 'वॉरंट' शब्दाला खास प्रकारच्या अधिकाराचा संदर्भ असतो. न्यायाधीश किंवा न्यायदंडाधिकारी अशा सक्षम अधिकाऱ्यांनी बजावलेला आदेश, व्यक्तिगत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या बेकायदेशीर कृतीबाबतची आज्ञा आणि रिटची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तीला अशी बेकायदेशीर कृती जर केली गेली तर त्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण देणारी आज्ञा.

**प्रतिबंध - मनाई करण्याची कृती (प्रतिबंध करणे) :** औपचारिकपणे कायद्याने किंवा नियमाने मनाई

**उत्प्रेषण (सर्शिओराराय) :** ''निश्चित ठरवणे, खात्रीचा बनवणे'' या अर्थाच्या सरशिओरेम फॅसीरे (certiorem facere) चा संक्षेप.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१*

(अ) (१) वस्तू
(२) १४
(३) आदेश (रिट)
(४) धर्मनिरपेक्ष

(आ) (अ) २
(ब) ३
(क) ४
(ड) १

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

(१) **बंदी प्रत्यक्षीकरण रिट (हेबिटस कॉर्पस) :** इतर व्यक्तीला बेकायदेशीरपणे स्वतःच्या ताब्यात ठेवणाऱ्याने त्या डांबलेल्या व्यक्तींना न्यायालयासमोर हजर करावे अशी स्वतःच्या ताब्यात ठेवणाऱ्या व्यक्तीला उद्देशून केलेली आज्ञा.

(२) **परमादेश (मँडॅमस) :** सक्षम न्यायालयाने राज्याच्या नावे किंवा अधिकारी, महामंडळ किंवा व्यक्तीने विशिष्ट सार्वजनिक कर्तव्ये पार पाडावे यासाठी केलेली आज्ञा.

(३) **प्रतिबंध (प्रोहिबिशन) :** सर्वोच्च न्यायालयांनी किंवा उच्च न्यायालयांनी कनिष्ठ न्यायालयाला त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन किंवा त्याच्याकडे कायद्याने नेमून न दिलेल्या अधिकारक्षेत्रातील कामकाज पुढे चालू ठेवण्यास मनाई करणारा आदेश.

(४) **उत्प्रेषण (सर्शिओराराय) :** वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला त्यांच्यापुढील खटल्याचे किंवा प्रलंबित प्रकरणाच्या कामकाजाची कागदपत्रे विचारार्थ वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवण्याबाबत केलेला आदेश

(५) **अधिकारपृच्छा (को वारंटो) :** या रिटचे उद्दिष्ट ज्या व्यक्तीने अन्याय पद्धतीने पद बळकावले आहे त्याला त्या पदावर राहण्यापासून प्रतिबंध करणे हे आहे. ही रिट म्हणजे तो कोणत्या अधिकाराने त्या पदावर आहे हे त्याने न्यायालयाला दाखवून द्यावे

यासाठी त्या पदाधिकाऱ्याला न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबतचा आवेश.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची उत्तरे १० ते १५ ओळींत लिहा.**

(१) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये कोण अर्ज करू शकतो ?

(२) कलम ३२ ला राज्यघटनेचा प्राण आणि आत्मा असे का म्हटले आहे ?

(३) कलम २३ व २४ च्या तरतुदी स्पष्ट करा. मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या संदर्भातून त्यांचे महत्त्व सांगा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) पांडे जे. एन., कॉन्स्टिट्युशनल लॉ ऑफ इंडिया

(२) सेन संकर, ह्युमन राईटस् इन डेव्हलपिंग सोसायटी

# घटक ५ : राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि मानवी हक्क

*अनुक्रमणिका*


५.० उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ विषय-विवेचन
  ५.२.१ मार्गदर्शक तत्त्वे आणि मानवी हक्क यांच्यातील अंतर्गत नातेसंबंध
  ५.२.२ मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकार
    ५.२.२.१ समाजवादाचा पुरस्कार करणारी तत्त्वे
    ५.२.२.२ पाश्चात्त्य उदारमतवादी तत्त्वे
    ५.२.२.३ गांधीवादी तत्त्वे
    ५.२.२.४ स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेली मूल्ये
  ५.२.३ मूलभूत कर्तव्ये
५.३ सारांश
५.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
५.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

★ राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि मानवी हक्क यांच्यातील संबंधावर चर्चा करता येईल.

★ राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकारांचे वर्णन करता येईल.

★ आपल्या राज्यघटनेत सांगितलेल्या मूलभूत हक्कांची समर्पकता मानवी हक्कांचा संदर्भ देऊन सांगता येईल.

## ५.१ प्रास्ताविक

भारताच्या राज्यघटनाकारांनी मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यातील नागरी आणि राजकीय अधिकार (ICCPR) आणि सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यांमध्ये (ICESCR) नमूद केलेले बहुतेक सर्वच अधिकार राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेले आहेत. ते दोन भागांत विभागलेले आहेत - मूलभूत हक्कांवरील प्रकरणात आणि राज्यविषयक धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरणात. पहिला संच राज्याच्या जुलमी किंवा मनमानी कृत्याविरुद्ध व्यक्तीचे हक्क आणि स्वातंत्र्याची हमी देतो, तर दुसरा संच सर्वसामान्य माणसाच्या मूलभूत गरजांच्या पूर्तीसाठी काही आर्थिक आणि सामाजिक ध्येये घालून देतो. अशा रीतीने भारतीय राज्यघटनेच्या रचनेमध्ये मानवी हक्कांना यथोचित उच्च दर्जा दिला आहे. त्यात केवळ नागरी आणि राजकीयच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक हक्कांचादेखील समावेश आहे.

## ५.२ विषय-विवेचन

### ५.२.१ मार्गदर्शक तत्त्वे आणि मानवी हक्क यांच्यातील अंतर्गत नातेसंबंध

राज्यघटनेचा भाग चौथा राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे नमूद करतो. ती आयरिश राज्यघटनेकडून घेण्यात आली आहेत. भारतापुढे लोकशाही, समाजवादी राज्याचा आदर्श घालून देण्यात आला आहे. त्यामुळे राज्याचे नियमन करण्याबरोबर विकासाचे लक्ष्य गाठण्यासाठी राज्यावर काही कामे नेमून देण्याची गरज आहे. भारत नव्याने स्वतंत्र झालेला विकसनशील देश होता. कामाच्या हक्कासारखे इतर अनेक हक्क होते ज्यांना मूलभूत हक्कांमध्ये स्थान नव्हते, म्हणून राज्याला द्यावयाच्या निश्चित सूचनांच्या स्वरूपात मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली. राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येत नाही. म्हणून जर मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाले किंवा त्यांची पूर्तता झाली नाही, तर त्यासाठी तशी तक्रार असलेली व्यक्ती या तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाकडे दाद मागू शकत नाही. तथापि, या राज्याने योजना आखताना आणि राबवताना लक्षात ठेवावयाचे सकारात्मक/निश्चित असे ते मार्गदर्शन आहे. राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आदर्श आचरणाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. अशा रीतीने ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व नागरिकांसाठी मानवी हक्कांचे आश्वासन देताना सरकारला मार्गदर्शन करतात. राज्याच्या अधिकाऱ्यांसाठी नैतिक उपदेश म्हणून मार्गदर्शक तत्त्वांची योजना केली आहे. भारतीय राज्यकारभाराचे ध्येय आर्थिक क्षेत्रात समाजवादाची ओळख करून देण्याचे आहे, याची आठवण ही तत्त्वे अधिकाऱ्यांना करून देतात. या अर्थाने यास बोधप्रद मूल्य आहे. ती राज्याची सकारात्मक कर्तव्ये आहेत. भारत हे 'कल्याणकारी राज्य' आहे आणि राहील याचे ते सततचे स्मरण आहे.

सर्व भारतीयांना मानवी हक्कांची हमी देण्यासाठी मूलभूत हक्कांबरोबरच मार्गदर्शक तत्त्वे तितकीच महत्त्वाची आहेत. ही तत्त्वे न्यायालयाद्वारे अंमलबजावणी करता येण्याजोगी नाहीत, परंतु राज्यांसाठी मूलभूत हक्कांच्या उपभोगासाठी परिस्थिती निर्माण करण्यासाठी ही तत्त्वे महत्त्वाचे मार्गदर्शन करतात. दुसऱ्या शब्दांत, जरी मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे स्वरूपात आणि आशयाने भिन्न असली तरी ती एकमेकांना पूरक आहेत. कारण व्यक्तीमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समानतेशिवाय व्यक्तिगत हक्क पूर्णत्वाकडे जाऊ शकत नाहीत.

### ५.२.२ मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकार

आपल्या लक्षात आले आहे की, मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे स्वतंत्र झाल्या क्षणीच व्यक्तींना जे हक्क प्रदान करता आले नाही ते हक्क. राज्याने मूलभूत हक्कांना अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी वापरलेली ती सामाजिक आणि आर्थिक बदलासाठीची साधने आहेत. या तत्त्वांना खालील चार भागांमधून समजून घेता येईल.

#### ५.२.२.१ समाजवादाचा पुरस्कार करणारी तत्त्वे

सामाजिक व आर्थिक समानतेची हमी देऊन, साधनांच्या न्याय्य वितरणासाठी उत्पादनाच्या साधनांची राज्याची मालकी आणि कामाच्या हक्कासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करून समाजवादी ध्येये मिळवण्याशी ही तत्त्वे संबंधित आहेत.

(१) कलम ३८ सांगते की, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय हे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांचे लक्ष्य असेल अशी सामाजिक सुव्यवस्थेची शक्य तितक्या परिणामकारकपणे हमी देऊन आणि अशा व्यवस्थेला संरक्षण देऊन लोकांच्या कल्याणासाठी राज्य सामाजिक व्यवस्था संपादन करेल.

(२) कलम ३९(अ) सांगते की, उपजीविकेच्या पुरेशा साधनांचा पुरुष आणि स्त्रिया यांना समान हक्क असेल.

(३) कलम ३९ (ब) सामाईक हित साधेल अशा पद्धतीने देशाच्या साधनांच्या वितरणावर भर देते.

(४) कलम ३९ (क) सांगते की, आर्थिक व्यवस्थेचा परिणाम संपत्तीचे केंद्रीकरण आणि उत्पादनांच्या साधनाने सामाईक हानी होण्यामध्ये होऊ नये.

(५) कलम ३९ (ड) सांगते की, पुरुष आणि स्त्रिया या दोहोंना समान कामासाठी समान मोबदला मिळेल.

(६) राज्याने कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि बेरोजगार, वृद्धत्व, आजारपण, इत्यादी असेल तर सार्वजनिक मदत मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतुदी कराव्यात असे मार्गदर्शन कलम ४१ करते.

(७) कलम ४२ न्यायाची, कामाच्या ठिकाणी माणसास आवश्यक अशी परिस्थिती देण्याची आणि प्रसूतीविषयक सवलती देण्याची हमी देण्याबाबत मार्गदर्शन करते.

(८) कलम ४३ कामगारांसाठी जगणे शक्य होईल असे वेतन देण्याबाबत राज्याला निर्देश करते. कलम ४३ (अ) उद्योगधंद्यांमधील व्यवस्थापनात कामगारांना सहभागाची हमी योग्य तो कायदा करून किंवा इतर मार्गाने देण्याबाबत पावले उचलावीत असे राज्याला निर्देश देते.

ही सर्व तत्त्वे स्पष्टपणाने नागरिकांच्या सामाजिक आणि आर्थिक हक्कांवर भर असल्याचे दर्शवतात. पण हे सर्व लोकशाही पद्धतीने मिळवले गेले पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुरुवातीच्या काळात ही तत्त्वे व्यवहारात उतरविण्याबाबत सातत्याने, परंतु धिम्या गतीने प्रगती झाली. सध्याच्या काळात भारतीय आर्थिक व्यवस्था या आदर्शांपासून दूर जात आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय केवळ राजकीय आराखडे आणि हक्क हे निरर्थक ठरतील.

### ५.२.२.२ पाश्चात्त्य उदारमतवादी तत्त्वे

आधुनिक राजकीय व्यवस्थेची कोनशिला म्हणून पाश्चात्त्य उदारमतवादी तत्त्वांपासून लोकशाही संस्थेचा आणि राजकीय हक्कांचा उदय झाला. मतदानाच्या हक्काव्यतिरिक्त इतरही काही तरतुदींनी राजनैतिक हक्कांना पूर्णत्व प्राप्त करून दिले. त्यांना आर्थिक आणि सामाजिक दबावांमुळे मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट करता आले नाही तरी ते मार्गदर्शक तत्त्वांचा भाग बनले आहेत.

लोकशाही व्यवस्थेमध्ये समान संधीच्या आधारावर न्याय देणाऱ्या परिणामकारक न्याय व्यवस्थेचे मोठे महत्त्व आहे. म्हणून कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण या मूलभूत हक्कांशिवाय राज्याने समान न्याय आणि मोफत कायदेविषयक साहाय्य हे मूलभूत हक्क म्हणून पुरवावे असे कलम ३९ (अ) सांगते. भारतीय समाजामध्ये जिथे मोठ्या प्रमाणात अशिक्षितपणा आणि दारिद्र्य आहे, तिथे कायदेविषयक साहाय्य हे न्यायदानासाठी महत्त्वाचे साधन ठरते. राजकीय हक्कांची समानतेची हमी देताना समाजाच्या सर्व विभागांसाठी समान नागरी संहितेची आणखी एक महत्त्वाची तरतूद पाश्चात्त्य उदारमतवादी तत्त्वांमध्ये आहे. हे मार्गदर्शक तत्त्व कलम ४४ मध्ये आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेमुळे समान नागरी कायदा हा नेहमी वादाचा मुद्दा बनला आहे. बहुसंख्याकांच्या प्रथा समान नागरी संहितेद्वारे लादल्या जातील आणि आपली ओळख धोक्यात येईल असे अनेक अल्पसंख्याक जनसमूहांना वाटते. तथापि, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून समान नागरी संहिता हा एक असा आदर्श असला पाहिजे की, जिथे विवाह आणि संपत्तीच्या वारशांसारख्या नागरी मुद्यांसाठी समाजाच्या सर्व विभागांना सारखे नियम लागू असतील. न्यायव्यवस्था कार्यकारी व्यवस्थेपासून स्वतंत्र असणे ही आणखी एक तरतूद आहे. तो लोकशाहीचा पाया आहे. हे तत्त्व राज्यघटनेच्या कलम ५० मध्ये आहे. जरी न्यायव्यवस्था कार्यकारी व्यवस्थेपासून परिपूर्ण रितीने स्वतंत्र नसली तरी परिणामकारक लोकशाहीसाठी न्यायालयीन नेमणुका आणि निर्णय प्रक्रियेत किमान हस्तक्षेप आवश्यक आहे. या दिशेने न्यायाधीशांच्या निवडीसाठी स्वतंत्र न्यायिक आयोग यासारख्या अनेक योजना आधीच राबवलेल्या आहेत.

या तरतुदी आधुनिक लोकशाहीच्या महत्त्वाचा घटक मानल्या गेल्या आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांना भारतीय कायदेमंडळाने खरा अर्थ प्राप्त करून द्यायचा आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१*

**(अ) खालील विधाने बरोबर की चूक ते सांगा.**

(१) राज्यघटनेचा तिसरा भाग राज्यविषयक धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित आहे (   )

(२) राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी न्यायालयामार्फत होत नसली तरी मूलभूत हक्कांच्या उपभोगासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी ते राज्याला महत्त्वाचे मार्गदर्शन करते. (   )

(३) कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण या मूलभूत हक्कांशिवाय राज्याने समान न्याय आणि मोफत कायदेविषयक साहाय्य हे मूलभूत हक्क म्हणून पुरवावे असे कलम ४१ (अ) सांगते. (   )

(४) कलम ३९(ड) सांगते की, पुरुष आणि स्त्रिया या दोहोंना समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल. (   )

**(आ) योग्य पर्याय निवडून मोकळ्या जागा भरा.**

(१) राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वाचे .......... वे कलम सांगते की, 'आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता' हे भारतीय राज्याचे ध्येय आहे. (५१ / ५० / ४२)

(२) लोकसत्ताक व्यवस्थेमध्ये समान संधीच्या आधारावर न्याय देणाऱ्या परिणामकारक व्यवस्थेचे मोठे महत्त्व आहे. (आर्थिक / राजकीय / न्याय)

(३) धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेमुळे .......... हा नेहमी वादाचा मुद्दा बनला आहे. (समान नागरी संहिता / समान बँकिंग व्यवस्था / समान मतदान व्यवस्था)

### ५.२.२.३ गांधीवादी तत्त्वे

भारताच्या स्वातंत्र्यासाठी चळवळीचे नेतृत्व करताना महात्मा गांधीजींनी काही मूल्य आणि हक्क यावर भर दिला. कलम ४७ आणि ४८ मध्ये अनुक्रमे दारूबंदी आणि गोहत्या बंदी यासारख्या तरतुदी आहेत. तथापि, या दोन्ही प्रत्यक्षात येणे दूरच राहिलेले आहे. ज्या राज्यांमध्ये दारूबंदी झाली तिथे भ्रष्टाचार आणि बेकायदेशीर व्यापार वाढला आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे, जर दारूबंदी केली तर जकातीच्या रूपाने प्रचंड प्रमाणात मिळणाऱ्या पैशांना राज्य मुकते. अनेक समाजांमध्ये गोमांस अन्न म्हणून भक्षण केले जात असल्यामुळे पशुहत्या बंदी हा आणखी एक संवेदनशील मुद्दा आहे.

पंचायती राज आणि समाजाच्या पददलितांच्या कल्याणासाठीच्या तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या आहेत. ही आणखी दोन गांधीवादी तत्त्वे भारताच्या राज्यकारभारासाठी महत्त्वाची आहेत. कलम ४० राज्याला ग्रामपंचायती स्थापन करण्यास आणि त्यांचेकडे स्वयंशासित घटक म्हणून काम करण्यासाठी आवश्यक अधिकार द्यावेत असे निर्देश देते. खरा भारत हा खेड्यांत वसलेला आहे. त्यामुळे जोपर्यंत राज्यकारभाराच्या संस्था तळागाळातून मजबूत होत नाहीत तोपर्यंत खरे लोकशाही हक्क अस्तित्वात येऊ शकत नाहीत. या दिशेने ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने निश्चित पावले उचलण्यात आली. परिणामी १२ च्या यादीमध्ये एकोणीस विषयांचा समावेश करण्यात आला. हे विषय पंचायत स्तरावर सोपवण्यात येतील. दुर्दैवाने, राज्य त्यांच्या जबाबदाऱ्यांचा वाटा स्थानिक मंडळाला द्यायला तयार नाही. जर मानवी हक्क आणि विकास तळागळापर्यंत झिरपायला हवा असेल तर या तरतुदींची शब्दश: आणि त्यांच्या मूळ हेतूसह अंमलबजावणी झालीच पाहिजे.

### ५.२.२.४ स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेली मूल्ये

भारताचा स्वातंत्र्य लढा काही मूल्ये, शांततामय

साहचर्य, आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि विकास यासारख्या तत्त्वांवर आधारलेला होता. या मूल्यांचा सन्मान राखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही तत्त्वे समाविष्ट केली आहेत. कलम ४८ (अ) राज्याला पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन तसेच देशाच्या वन्य आणि जंगली जीवनाचे संरक्षण करण्याचे निर्देश देते. संपूर्ण जगामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास हा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. भारताने पर्यावरण रक्षणासाठी कायदेशीर उपाययोजना केल्या आहेत. भारताने चिरंतन विकास घडून यावा यासाठी कायदे करून मानवी हक्कांची हमी दिली आहे. परंतु या तरतुदींची पूर्ण अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. विकास प्रक्रियेत पर्यावरण संरक्षणाला महत्त्व मिळणे गरजेचे आहे.

राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत, प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा लाभ मिळवून देण्यासाठी भारताचा स्वातंत्र्य लढा आणि आपला गौरवपूर्ण इतिहास प्रेरणा देतो. संसदेने काही स्थळे, स्मारके आणि वस्तूंना राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून जाहीर केले आहेत. लुटण्यापासून, विरूपतेपासून, विनाशापासून, विस्थापनापासून, विल्हेवाटीपासून आणि बेकायदेशीरपणे निर्यातीपासून त्यांचे संरक्षण झाले पाहिजे. कलम ४९ सांगते की, प्रत्येक स्मारक किंवा स्थळ किंवा कलात्मक किंवा ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वस्तूंचे संरक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया असलेली महत्त्वाची तरतूद म्हणजे कलम ५१. ते सांगते की, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे हे भारताचे ध्येय आहे.

कलम ५१ चे नव्हे तर अनेक कलमांमध्ये नमूद मूलभूत दिशादर्शक तत्त्वे भारताचे परराष्ट्र धोरण ठरवतात. कलम ५१ नुसार राज्याने खालीलप्रमाणे प्रयत्न केलेले पाहिजेत.

- आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता वृद्धिंगत करणे.
- राष्ट्राराष्ट्रांत न्याय्य आणि सन्माननीय संबंध राखणे.
- आंतरराष्ट्रीय कायदा आणि तहनाम्यांचा आदर करणे, संघटित लोकांनी एकमेकांशी केलेले आदानप्रदान बंधनकारक मानणे.
- आंतरराष्ट्रीय वाद लवादामार्फत सोडवण्यासाठी प्रोत्साहन देणे. मानवी हक्कांना जागतिक मूल्य आहे आणि त्यांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता मोलाची आहे, यावर भारताचा विश्वास आहे. भारताच्या विकासात आणि प्रत्येकाला सामाजिक व आर्थिक हक्काच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आंतरराष्ट्रीय जनसमूहाच्या सदस्यांशी शांततापूर्ण संबंध गरजेचे आहेत.

जी.एन. जोशींच्या शब्दांत सांगायचे तर, ''आधुनिक लोकशाही राज्यासाठी मार्गदर्शक तत्त्व अतिशय बहुसमावेशक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रम नेमून देते.''

ऑस्टीनच्या दृष्टीने, ''भारतीय राज्यघटना ही पहिली आणि अग्रेसर सामाजिक दस्तऐवज आहे.'' यातील बहुसंख्य तरतुदी एकतर सामाजिक क्रांतीच्या मार्गदर्शक तत्त्वांना मदतीचे थेट लक्ष्य बनवतात किंवा ते प्राप्त करण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करून या क्रांतीचे पालन करण्याचा प्रयत्न करतात. तो राज्यघटनेचा सारासारविवेक आहे.''

हे लक्षात घेतलेच पाहिजे की, राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनी घालून दिलेले आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी काही प्रयत्न केले गेले आहेत, परंतु अजूनही खूप काही करण्याची गरज आहे. देशात आजही सामाजिक विषमता अस्तित्वात आहे. लोकांच्या जीवनमानाचा दर्जा अजूनही पुरेशा प्रमाणात वाढवायचा आहे. लोकांना वाढीसाठी आणि उद्योगांसाठी आणखी प्रवेशमार्ग उपलब्ध करून द्यायचे आहेत. या सर्वांसाठी सरकारच्या पातळीवरून राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांना घट्टपणे चिकटून राहण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न आवश्यक आहेत.

## ५.२.३ मूलभूत कर्तव्ये

महात्मा गांधी नेहमी सांगत असत की, हक्क हे कर्तव्याशिवाय पूर्ण होत नसतात. हक्क आणि जबाबदाऱ्या

या एकमेकांना पूरक असतात. राज्यघटनेच्या ४-अ या भागात कलम ५१ (अ) मध्ये स्वदेशाभिमानी नागरिकत्व जोपासण्याच्या दृष्टीने १० मूलभूत कर्तव्ये सांगितली आहेत. ती १९७६ मधील ४२ व्या दुरुस्ती कायद्याने समाविष्ट करण्यात आली. प्रत्येक भारतीय नागरिकाने पाळली पाहिजेत अशी मूलभूत कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत -

(१) राज्यघटनेचे पालन करणे. त्याचे आदर्श आणि संस्था, राष्ट्रीय ध्वज आणि राष्ट्रीय गीत यांचा आदर करणे.

(२) आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीच्या लढ्याला प्रेरणादायक ठरलेल्या उदात्त आदर्शांवर प्रेम करणे आणि त्यांचे अनुकरण करणे.

(३) भारताचे सार्वभौमत्व, ऐक्य आणि अखंडता मान्य करणे आणि त्यांचे संरक्षण करणे.

(४) देशाचे रक्षण करणे आणि प्रसंगी राष्ट्राला सेवा अर्पण करणे.

(५) धार्मिक, भाषिक आणि प्रांतिक किंवा विभागीय विविधता यांच्या पलीकडे जाऊन भारताच्या समस्त लोकांमध्ये सामाईक बंधुभावाची वृत्ती आणि सुसंवाद वाढीस लावणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणण्याच्या प्रथा सोडून देणे.

(६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल ओळखणे आणि ती जतन करणे.

(७) वने, तळी, नद्या व वन्य जीव यासह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि संवर्धन करणे. जीवित प्राण्यांविषयी दया बाळगणे.

(८) शास्त्रीय वृत्ती, मानवतावाद व चौकस वृत्ती आणि सुधारणावादाचे संवर्धन करणे.

(९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि हिंसेचा त्याग करणे.

(१०) व्यक्तिगत आणि सामूहिक उपक्रमांच्या सर्व क्षेत्रांत सर्वोत्तम व्हावे यासाठी धडपडणे. त्यामुळे राष्ट्र प्रयत्न आणि उद्दिष्टांच्या साध्याच्या कमाल मर्यादेकडे सतत वाटचाल करेल.

ही कर्तव्ये राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांबरोबरीने समाविष्ट केलेली असल्याने न्यायालयामार्फत त्यांची अंमलबजावणी होत नाही हे स्पष्ट आहे. या कर्तव्यांच्या थेट अंमलबजावणीसाठी राज्यघटनेत तरतूद नाही. मूलभूत हक्क राज्यघटनेत समाविष्ट होण्याच्या काळामुळे त्या बाबतीत संशय येतो. १९७५ मध्ये जेव्हा देशात अंतर्गत आणीबाणी लागू होती तेव्हा ते समाविष्ट करण्यात आले आणि मूलभूत हक्कांचा गर्भित हेतू हुकूमशाही सत्तेचे अंधपणे पालन असा मानला गेला, तथापि कोणत्याही कायद्याचे घटनात्मक मूल्य निश्चित करताना जर न्यायालयाला आढळले की, हा कायदा कोणत्याही मूलभूत हक्कांना अंमलबजावणीत आणत आहे तर न्यायालय असा कायदा योग्य आहे असे मानतो आणि असा कायदा घटनाबाह्य ठरवला जात नाही. राज्यघटना जाळणे, सार्वजनिक संपत्तीचा नाश करणे आणि अशा इतर असामाजिक कृत्यांविरुद्ध बेपर्वा नागरिकांना इशारा देण्याचे काम मूलभूत कर्तव्ये करतात. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ज्या अर्थी नागरिकांसाठी मूलभूत कर्तव्ये बंधनकारक आहेत त्या अर्थी राज्यानेसुद्धा तेच ध्येय साधण्यासाठी जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी काही कर्तव्य पार पाडणे ही आवश्यक अट आहे.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**एका वाक्यात उत्तरे द्या.**

(१) 'कर्तव्याशिवाय हक्काचे अस्तित्व शक्य नाही' असे मत कोणत्या भारतीय नेत्याचे होते ?

(२) राज्यविषयक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वाचे कोणते कलम दारूबंदी करते ?

(३) भारतात ग्रामपंचायतीचे महत्त्व का आहे ?

(४) प्रत्येक भारतीय नागरिकाची कोणतीही दोन मूलभूत कर्तव्ये सांगा.

## ५.३ सारांश

या घटकामध्ये आपण भारताच्या राज्यघटनेच्या चौथ्या भागामध्ये दिलेली राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे अभ्यासली. या तरतुदी सरकारला लोकांच्या भल्यासाठी अंमलबजावणी करताना मार्गदर्शन करतात. ही तत्त्वे राज्याला धोरण ठरवताना निश्चित सूचनांचे काम करतात. भारत हे कल्याणकारी राज्य आहे आणि ते राहील याचे ते संस्मरण आहे. ही तत्त्वे मूलभूत हक्कांना पूरक आहेत. भारतीय राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वे चार ठळक प्रकारांमध्ये विभागता येतील. ते म्हणजे - समाजवादी तत्त्वे, गांधीवादी तत्त्वे, पाश्चात्य उदारमतवादी तत्त्वे आणि स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेली तत्त्वे.

समाजवादी तत्त्वांचा संबंध पुरुष आणि स्त्रियांच्या उपजीविकेसाठी आवश्यक असलेल्या पुरेशा साधनांच्या हक्कांशी येतो. त्यात समान काम, समान वेतन या तत्त्वाचा समावेश होतो. आधुनिक राजनैतिक व्यवस्थेची कोनशिला म्हणून पाश्चात्त्य उदारमतवादी तत्त्वांपासून लोकशाही संस्थाचा आणि राजकीय हक्कांचा उदय झाला. राज्यघटनेच्या कलम ५० मध्ये न्यायव्यवस्था कार्यकारी व्यवस्थेपासून विभक्त असल्याचे तत्त्व आहे. पंचायती राज आणि समाजाच्या भरडल्या गेलेल्या लोकांच्या कल्याणासाठीच्या तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट केलेल्या आहेत. ही आणखी दोन गांधीवादी तत्त्वे भारताच्या राज्यकारभारासाठी महत्त्वाची आहेत. स्वातंत्र्य लढ्यापासून निर्माण झालेली तत्त्वे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यावर, संवर्धनाच्या महत्त्वावर आणि राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्याय्य आणि सन्माननीय संबंध राखण्यावर आणि आंतरराष्ट्रीय कायद्याबद्दल आदर बाळगण्यावर आणि करारांना बंधनकारक मानण्यावर भर देतात.

राज्यघटनेची संपूर्ण रचना मानवी हक्कांच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. मानवी हक्कांच्या सुरक्षिततेसाठी आणि अंमलबजावणीसाठी विविध तरतुदी केलेल्या आहेत.

## ५.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**समाजवाद :** या राजकीय विचारधारेचे सर्वसाधारणपणे पुढील दोन अर्थ होतात-
(१) राज्याच्या थेट नियंत्रणाद्वारे उत्पादनाचे स्रोत समाजाच्या मालकीचे असतात. (२) उत्पादनावरचे नियंत्रण समाजात समान वितरणाची हमी देण्यासाठी वापरले जाते.

**उदारमतवादी तत्त्वे :** युरोपमधील जागरणोत्तर काळात उदयाला आलेल्या तत्त्वांचा समूह म्हणजे उदारमतवादी तत्त्वे. ही तत्त्वे व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि राजकीय न्यायविषयक समानतेशी निगडित असतात. व्यावहारिक भाषेत भांडवलशाहीच्या विचारधारेप्रमाणे मानली जातात.

**कल्याणकारी राज्य :** असे राज्य जिथे सरकार लोकांसाठी विमा, वृद्धांसाठी निवृत्तिवेतन, भविष्य निर्वाह निधी योजना, इत्यादी असे विविध कल्याणकारी कार्यक्रम राबवते.

**मनमानी :** इच्छेवर किंवा आनंदावर अवलंबून असणे, केवळ मतावर किंवा प्राथमिकतेवर आधारित असणे.

## ५.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १***

**(अ)** (१) चूक
(२) बरोबर
(३) चूक
(४) बरोबर

**(ब)** (१) कलम ५१
(२) न्याय
(३) समान नागरी संहिता

*स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

(१) 'कर्तव्याशिवाय हक्कांचे अस्तित्व शक्य नाही' हे मत महात्मा गांधींनी व्यक्त केले होते.

(२) राज्यविषयक धोरणाचे मार्गदर्शक तत्त्वाचे कलम ४७ दारूबंदी करते.

(३) भारतात ग्रामपंचायती महत्त्वाच्या आहेत, कारण बहुसंख्य भारत खेड्यांमधून वसलेला आहे. राज्यकारभाराच्या संस्था जोपर्यंत तळागाळात मजबूत होत नाहीत तोपर्यंत लोकशाही हक्क प्रत्यक्षात येणे शक्य नाही.

(४) प्रत्येक भारतीय नागरिकाची दोन महत्त्वाची मूलभूत कर्तव्ये खालीलप्रमाणे - (१) देशाचे संरक्षण करणे आणि वेळप्रसंगी राष्ट्राला सेवा अर्पण करणे. (२) वने, तळी, नद्या आणि वन्यजीव अशा नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे. जीवित प्राण्यांसाठी दया बाळगणे.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची उत्तरे १० ते १५ ओळींत लिहा.**

(१) मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्य यांच्यातील फरक स्पष्ट करा.

(२) 'न्याय' आणि 'सार्वभौम' संकल्पना स्पष्ट करा.

(३) राज्यविषयक धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि मानवी हक्क याच्यातील परस्परसंबंध काय आहे ?

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) लक्ष्मीनाथ ए, बेसिक स्ट्रक्चर आणि कॉन्स्टिट्युशनल अमेन्डमेंटस्

(२) महाजन व्ही. डी, कॉन्स्टिट्युशनल लॉ ऑफ इंडिया

# घटक ६ : मानवी हक्कांची संरक्षक : न्यायपालिका

*अनुक्रमणिका*


६.० उद्दिष्टे
६.१ प्रास्ताविक
६.२ विषय-विवेचन
    ६.२.१ न्यायपालिकेचे स्वातंत्र्य
        ६.२.१.१ भारतीय न्याय व्यवस्था आणि मानवी हक्क
        ६.२.१.२ न्यायविषयक पुनर्विचार आणि न्यायविषयक चळवळ
    ६.२.२ जनहित याचिका
        ६.२.२.१ जनहित याचिकेचा उद्गम
        ६.२.२.२ भारतातील जनहित याचिका
        ६.२.२.३ जनहित याचिका विशद करणारे खटले
६.३ सारांश
६.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
६.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ६.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

★ भारतातील न्यायपालिकेचे स्वरूप व मानवी हक्क यांवर चर्चा करता येईल.

★ मानवी हक्कांची संरक्षक या नात्याने न्यायपालिकेच्या बदलत्या भूमिकेचे विश्लेषण करता येईल.

★ मानवी हक्कांच्या संरक्षणावर न्यायविषयक चळवळ आणि जनहित याचिका (पी.आय.एल.) यांचा परिणाम स्पष्ट करता येईल आणि त्याचे मूल्यांकन करता येईल.

## ६.१ प्रास्ताविक

लोकशाहीवादाच्या आदर्शासह स्वतंत्र न्यायपालिका ही आधुनिक समाजात लोकशाहीची महत्त्वाची खूण आहे. लिखित राज्यघटना स्वीकारल्यापासून स्वतंत्र न्यायपालिका तीन महत्त्वाची कार्ये करते आहे.

(१) भारताच्या राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील मूलभूत हकांचे संरक्षण करणे, त्यांची हमी देणे. हे हक्क मूलतः मानवी हक्क आहेत.

(२) भारतीय संघराज्य व्यवस्थेत केंद्र आणि राज्ये व राज्याराज्यांतील वाद मिटवण्यासाठी एकमेव अध्यक्ष म्हणून ती काम करते.

(३) भारताच्या राज्यघटनेची ती रक्षक आहे. भारतीय राज्यघटनेचा अंतिम अन्वयार्थ न्यायपालिका लावते. संसदेने केलेले कायदे आणि कार्यकारी मंडळाने केलेले नियम घटनात्मक तरतुदींशी सुसंगत आहेत याची खातरजमा करते.

भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांची हमी देणे हे या सर्व कार्यांमध्ये सर्वांत महत्त्वाचे असे कार्य न्यायपालिका करते. यावरून भारतीय प्रदेशातील नागरिक आणि इतर व्यक्तींच्या मानवी हक्कांच्या रक्षणामध्ये भारतातील न्यायविषयक व्यवस्थेचे महत्त्व समजून येते. मानवी हक्कांची रक्षक या नात्याने न्यायपालिकेच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यापूर्वी न्यायविषयक व्यवस्थेचे स्वरूप समजून घेणे गरजेचे आहे. ते समजून घेतल्यानंतर आपण स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंतच्या काळातील न्यायपालिकेच्या बदलत्या भूमिकेचे विश्लेषण करू. शेवटच्या भागात आपण जनहित याचिकेच्या (पी.आय.एल) विशेष संदर्भातून न्यायविषयक चळवळीच्या नवीन स्वरूपाचे मूल्यांकन करू.

## ६.२ विषय-विवेचन

### ६.२.१ न्यायपालिकेचे स्वातंत्र्य

सर्वांना न्याय मिळावा म्हणून न्यायविषयक घटक अंगांचे कार्य न्यायदानामध्ये भयमुक्त आणि सर्व प्रकारच्या दबावांपासून आणि पक्षपातापासून मुक्त असल्याची हमी देणे गरजेचे आहे. भारताच्या राज्यघटनेने जास्तीत जास्त न्यायविषयक स्वातंत्र्य प्रदान करून राज्याच्या घटक अंगांचे एकमेकांवर नियंत्रण ठेवले आहे आणि त्यांच्यात संतुलन राखले आहे. राज्यघटनेने खालीलप्रमाणे न्यायविषयक स्वातंत्र्याची हमी दिली आहे.

(अ) कार्यकाळाची सुरक्षितता आणि केवळ गैरवर्तन किंवा क्षमता नसल्याच्या कारणासाठी विशेष चौकशी प्रक्रियेद्वारे कामावरून काढून टाकणे.

(आ) उच्च न्यायपालिकेतील न्यायाधीशांची वेतने राज्यघटना ठरवते. कायदेमंडळाच्या मतांनुसार ती ठरवली जात नाहीत.

(इ) कलम १३८ नुसार संसद सर्वोच्च न्यायालयाची अधिकारकक्षा व अधिकार वाढवू शकते, पण त्यांचा संक्षेप करू शकत नाही.

(ई) कायदेमंडळाच्या दोन्ही भवनांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या, त्याने त्याचे नेमून दिलेले कर्तव्य पार पडत असताना केलेल्या, वर्तनाच्या बाबतीत कोणतीही चर्चा करण्यास प्रतिबंध केलेला आहे.

(उ) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांना त्यांच्या स्वतःच्या अवमानासाठी शिक्षा करण्याचा अधिकार आहे.

(ऊ) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीस राष्ट्रपती हे सरकारच्या नव्हे तर मुख्य न्यायाधीश आणि त्यांचे वरिष्ठ सहकारी यांच्या सल्ल्याने मान्यता देतात.

(ए) कोणत्याही न्यायालयात किंवा भारताच्या प्रदेशाच्या अखत्यारीतील अधिकाऱ्यासमोर हजर होण्यास आणि काम चालवण्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाला प्रतिबंध केलेला आहे.

#### ६.२.१.१ भारतीय न्याय व्यवस्था आणि मानवी हक्क

न्यायपालिकेने मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी केलेले जनहित याचिकेसारखे विशेष प्रयत्न समजून घेण्यापूर्वी, मूलभूत हक्कांची संरक्षक आणि त्यांची हमी देणारी व्यवस्था या नात्याने न्यायपालिकेकडे सोपविलेली कामे समजून घेणे गरजेचे आहे.

(१) राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कोणत्याही हक्काच्या अंमलबजावणीसाठी कलम ३२ सर्वोच्च न्यायालयाला योग्य कार्य पद्धतीतून काही अधिकार प्रदान करते. त्यांत मार्गदर्शन किंवा हुकूम किंवा रिट बजावण्याच्या अधिकाराचा समावेश होतो. रिटमध्ये बंदी प्रत्यक्षीकरण (हेबियस कॉर्पस), परमादेश

(मँडॅमस), प्रतिबंध (प्रोहिबिशन), अधिकार पृच्छा (को वारंटो) आणि उत्प्रेषण (सर्शिओराराय) यापैकी कुठल्याही योग्य रिटचा समावेश होतो.

(२) जिथे तरतुदीच्या भाषेवरून किंवा हक्काच्या स्वरूपावरून असा अर्थ निघतो की, ती तरतूद किंवा तो हक्क फक्त व्यक्तींनाच लागू होतो. अशा तरतुदी किंवा हक्क वगळता इतर सर्व मूलभूत हक्कांच्या बाबतीत उल्लंघनाची तक्रार असल्यास कोणत्याही व्यक्तीस, त्यात महामंडळाचाही समावेश होतो. मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचे स्वतंत्र्य आहे. जेव्हा कंपनीच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन होते तेव्हा तिच्या भागधारकाने नव्हे तर त्या कंपनीने स्वत:च्या हक्काचे समर्थन करण्यासाठी पुढे यायचे असते.

(३) संसद, कायदा करून कोणत्याही इतर न्यायालयाला त्याच्या स्थानिक अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत सर्वोच्च न्यायालयाला असणारे अधिकार वापरण्याची मुभा देऊ शकते अशीही एक तरतूद आहे.

(४) सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या तरतुदीने प्रदान केलेले हक्क राज्यघटनेने सांगितले असल्याशिवाय तहकूब करता येत नाहीत. त्याचप्रमाणे राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कोणत्याही हक्काच्या अंमलबजावणीसाठी कलम २२६ ने प्रत्येक उच्च न्यायालयाला त्याच्या अधिकार क्षेत्राच्या संबंधात हुकूम किंवा रिट बजावण्याचा अधिकार दिलेला आहे. अशा रीतीने राज्यघटनेत दिलेले मूलभूत हक्क उचलून धरण्यासाठी मुख्य संस्था म्हणून भारतात न्यायपालिका उदय पावली आहे.

### ६.२.१.२ न्यायविषयक पुनर्विचार आणि न्यायविषयक चळवळ

न्यायविषयक पुनर्विचार (ज्युडीशिअल रिव्ह्यू)आणि न्यायविषयक चळवळ (ज्युडीशिअल ॲक्टिव्हिझम) हे दोन शब्द भारताच्या राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची संरक्षक म्हणून न्यायपालिकेची भूमिका समजून घेताना फार महत्त्वाचे आहेत. ढोबळपणे सांगायचे तर, न्यायविषयक पुनर्विचार म्हणजे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळाच्या कृत्यांची घटनात्मक वैधता ठरवण्याचा न्यायालयांचा अधिकार. अमेरिकन राज्यघटनेत लोकशाहीवादी सरकारच्या तत्त्वानुसार न्यायविषयक पुनर्विचाराला महत्त्वाचे स्थान आहे. जरी भारतीय राज्यघटनेत या शब्दाला स्थान नसले, तरी कलम १३ सुचवते की, मूलभूत हक्कांच्या मर्यादा न्यायपालिका ठरवू शकते. अशा रीतीने मूलभूत हक्कांच्या विरोधात जाणाऱ्या कोणत्याही कायद्याला न्यायपालिका अवैध (बेकायदेशीर) ठरवू शकते. राज्यघटनेचा अंतिम अन्वयार्थ न्यायपालिकाच लावू शकते. या वस्तुस्थितीतूनही हा अधिकार ओघानेच प्राप्त होतो. वास्तविक पाहता, कलम ३२ द्वारे घटनात्मक उपाययोजनांची तरतूद उपलब्ध करून देणाऱ्या हक्काला विशेष महत्त्व आहे, कारण हे कलम मूलभूत हक्कांना एक संरक्षक कवच देते. तसेच ते कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाद्वारे मूलभूत हक्कांवर अतिक्रमण होणार नाही याचीही दक्षता घेते म्हणूनच या हक्काला खरा अर्थ प्राप्त होतो.

न्यायविषयक पुनर्विचाराच्या अधिकाराचा परिणाम एका बाजूला कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळ आणि दुसऱ्या बाजूला न्यायपालिका यांच्यातील झगड्यात झाला आहे. शासनाच्या या घटकअंगांमधील झगडा हाच मूलभूत हक्कांच्या संरक्षणात निर्णायक ठरतो. १९८० नंतर लोकशाही मूल्यांचा स्वाहाकार आणि माजलेला भ्रष्टाचार यामुळे भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर न्यायपालिकेने न्यायविषयक पुनर्विचाराची व्याप्ती वाढवली आणि कार्यकारी मंडळाचा विशेषाधिकार मानल्या गेलेल्या धोरणात्मक बाबींना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. वास्तविक, अनेक खटल्यांमध्ये न्यायपालिकेने मूलभूत हक्क आणि घटनात्मक मूल्ये उचलून धरण्यासाठी कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळे यांना धोरणविषयक दिशा दिली आहे. या प्रवाहाला न्यायविषयक चळवळ (Judicial activism) असे ओळखले जाते.

हा प्रवाह मुखत्यारीच्या अधिकारावर न्यायाच्या नियंत्रणाच्या वाढीतून दिसून येतो. हे वळण सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठीच्या न्यायपालिकेच्या शोधामध्ये अन्वयार्थ लावताना आदर्श नियम लागू करण्यामधून प्रतिबिंबित होते. न्यायविषयक चळवळीचे विविध परिणाम झाले. त्याचा थेट कल उच्चस्थानातील भ्रष्टाचार उघडकीस आणणे, मोठे राजकीय नेते आणि सार्वजनिक सेवक यांच्याविरुद्ध कडक कारवाई सुरू करणे आणि पर्यावरणीय कायद्यासारख्या जीविताच्या हक्काशी संबंधित कायद्यांची अंमलबजावणी करणे, यासारख्या मानवी हक्कांच्या संरक्षणाकडे आहे. अशा रीतीने न्यायविषयक चळवळीद्वारे न्यायपालिकेने कार्यकारी मंडळाच्या आणि कायदेमंडळाच्या घरावर धाडी टाकल्या आहेत आणि मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची हमी दिली आहे.

न्यायपालिका ही केवळ घटनेचा अन्वयार्थ लावणारी किंवा घटनेची वाचक बनून राहिलेली नाही तर घटनात्मक मूल्यांच्या परिपूर्तीसाठी सकारात्मक निश्चित कृती करण्यासाठी ती साधनदेखील बनली आहे. 'न्यायविषयक चळवळीचे महत्त्व गेल्या दोन दशकांत मोठ्या संख्येने दाखल झालेल्या जनहित याचिकामधून (पीआयएल) दिसून आले आहेत.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मानवी हक्कांच्या संबधात न्यायपालिकेचे महत्त्वाचे कार्य कोणते आहे ?

(२) न्यायविषयक पुनर्विचार म्हणजे काय ?

(३) न्यायविषयक चळवळ म्हणजे काय ?

## ६.२.२ जनहित याचिका (पी.आय.एल)

**(Public Interest Litigation)**

जनहित म्हणजे सर्वसामान्य जनांचे हित. न्यायालयीन निवाडे हे काही व्यक्तींच्या नव्हे तर सर्व जनतेच्या सेवेसाठी असतात. दुसऱ्या शब्दांत, संपूर्ण समाजाच्या सदस्यांच्या सेवेसाठी निकाल देणारा खटला म्हणजे जनहित याचिका. समाजातील ज्या नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालयांमध्ये जाता येत नाही अशा खचलेल्या आणि दीनदुबळ्या नागरिकांच्या वतीने त्यांची पर्वा करणाऱ्या नागरिकांनी दाखल केलेल्या खटल्याची / याचिकेची न्यायालयाने दखल घेण्याची प्रक्रिया म्हणजे जनहित याचिका (पी.आय.एल.). आणीबाणीनंतरच्या काळात म्हणून १९८० पासून सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांचा सकारात्मक अन्वयार्थ लावला आहे. तेव्हापासून न्यायालयाने वेठबिगारांच्या, बालकामगारांच्या, पर्यावरण संरक्षणाच्या, कोठडीतील मृत्यूविषयीच्या, मनमानी अटकेच्या, कायद्यांच्या गैरवापराच्या हक्काशी संबंधित खटल्यांमध्ये सक्रिय भूमिका बजावली.

जे.सी. बत्रांच्या मते, ''सामाजिक, आर्थिक समस्या सोडविण्यासाठीचा हा संघर्ष कधीही न संपणारा असा आहे. समाजाला भेडसावणारे प्रश्न सोडवू शकेल अशी कोणती एक संस्था किंवा यंत्रणा नसते. भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि काही उच्च न्यायालय यांनी कायद्यांचा निर्माता, कायदा सुधारक आणि त्याचबरोबर न्यायाचे व्यवस्थापक अशा भूमिका धारण केल्या आहेत. आज मानवी हक्कांच्या वेगवेगळ्या बाजूंच्या अंमलबजावणीसाठी जनहित याचिकांना अशा रीतीने प्रचंड महत्त्व आलेले आहे.'

### ६.२.२.१ जनहित याचिकेचा उद्गम

जनहित याचिकेच्या संकल्पनेचे मूळ अमेरिकेमध्ये आहे आणि वर्षानुवर्षे त्या देशात या संकल्पनेचे परिवर्तन झाले आहे. न्यायमूर्ती ब्रेन्नान यांच्या मते ''प्रश्न असा आहे की, जिच्या योग्यतेला आव्हान दिले गेले आहे अशी व्यक्ती विशिष्ट मुद्यांच्या निवाड्यावर विनंतीला योग्य पक्षकार असते की नसते, वादीच्या ज्या हिताच्या गोष्टीचे प्रतिवादीच्या कृतीमुळे उल्लंघन झाले आहे त्या हिताला कायद्याचे संरक्षण आहे की नाही.''

ग्रेट ब्रिटनच्या बाबतीत सांगायचे तर, लॉर्ड डेनिंग यांच्या प्रयत्नांमुळे जनहित याचिकांच्या क्षेत्रात विलक्षण

विकास झालेला आहे. कायदेशीर किंवा सार्वजनिक अधिकारीणी (authority) विरुद्ध सार्वजनिक कर्तव्याच्या पालनासाठी त्यात पुरेसा हितसंबंध असलेला नागरिक कारवाई करू शकतो. ॲटर्नी जनरल वि. इंनडिपेन्डन्ट ब्रॉड कास्टिंग ॲथोरिटी या प्रकरणी लॉर्ड डेनिंग म्हणतात, ''आपण अशा काळात जगतो आहोत की जेव्हा संसदेने जनतेच्या लाभासाठी सरकारी खाती आणि सार्वजनिक अधिकारीणी यांच्यावर कायदेशीर कर्तव्ये सोपवली. परंतु त्यांचे उल्लंघन झाल्यास त्यासाठी कोणत्याही उपायांची तरतूद केली नाही. जर सरकारी खात्याने किंवा सार्वजनिक अधिकारीणीने संसदेने केलेला कायदा बदलला किंवा तशी धमकी दिली तर जनतेचा सदस्य न्यायालयाकडे जाऊन ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊ शकतो का ? माझे मत असे आहे की, शेवटचा पर्याय म्हणून जर अटॉर्नी जनरलने (महाअधिवक्ता) योग्य बाबतीत किंवा अयोग्य रीतीने रजा देण्याचे नाकारले किंवा अनुचित पद्धतीने रजा देण्यास विलंब केला किंवा त्याची यंत्रणा खूप धिम्या गतीने काम करते तेव्हा त्याबाबत पुरेसा हितसंबंध असणारा जनतेचा सदस्य स्वत: न्यायालयाकडे अर्ज करू शकतो.''

### ६.२.२.२ भारतातील जनहित याचिका

भारतातील जनहित याचिकेबाबत, सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, जिथे एखाद्या व्यक्तीला किंवा लोकांच्या विशिष्ट वर्गाला कोणत्याही घटनात्मक किंवा कायदेशीर हक्कांच्या उल्लंघनाच्या कारणावरून कायद्याची चूक किंवा कायदेविषयक हानी भोगावी लागते, अशी व्यक्ती किंवा लोकांचा विशिष्ट वर्ग हा सर्वोच्च न्यायालयाकडे दारिद्र्य, असहायता किंवा अपात्रता किंवा सामाजिकदृष्ट्या किंवा आर्थिकदृष्ट्या मागास असल्याच्या कारणांमुळे मदतीसाठी दाद मागू शकत नसेल तर कोणीही व्यक्ती उच्च न्यायालयाकडे कलम २२६ अन्वये किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे कलम ३२ अन्वये अन्याय निवारणासाठी योग्य सूचना, हुकूम किंवा आदेश (रिट) बजावण्यात यावेत यासाठी अर्ज करू शकते.

असेही घडू शकते की, राज्याच्या किंवा कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याच्या कृतीमुळे किंवा कर्तव्यच्युतीमुळे एखाद्या व्यक्तीची किंवा विशिष्ट वर्गाची किंवा व्यक्तिसमूहाची काहीही विशिष्ट अशी कायदेविषयक हानी झालेली नाही आणि केवळ जनहिताची हानी झालेली आहे, अशा परिस्थितीत त्याविरुद्ध कार्यवाही कोण करू शकतो हा प्रश्न निर्माण होतो. म्हणून असे मानले आहे की, जेव्हा जेव्हा राज्याच्या किंवा सार्वजनिक अधिकारीणीच्या घटनेशी किंवा कायद्याशी विसंगत असणाऱ्या कृत्यामुळे किंवा कर्तव्यच्युतीमुळे सार्वजनिक अन्याय किंवा जनतेची हानी होते, तेव्हा अशा सार्वजनिक अन्यायाविरुद्ध किंवा जनतेच्या हानीच्या निवारणासाठी विश्वासार्ह आणि पुरेसा हितसंबंध असलेली कुणीही व्यक्ती कार्यवाही करू शकते.

अन्याय निवारणासाठी केवळ ज्या व्यक्तीची विशिष्ट कायदेशीर हानी झाली आहे ती व्यक्तीच कार्यवाही करू शकते किंवा दाद मागू शकते, हा कडक नियम शिथील करण्यात आला आहे आणि प्रकरणाच्या कार्यवाहीत पुरेसा हितसंबंध असलेल्या कुणाही व्यक्तीला सुनावणी करता येईल असा नियम अस्तित्वात आला. कोणत्याही नागरिकाकडून राज्य किंवा सार्वजनिक अधिकारीणी विरोधात कायदेशीर कार्यवाहीची जोखीम राज्य किंवा सार्वजनिक अधिकारीणीला अधिक जबाबदारीने आणि काळजीपूर्वक काम करायला प्रवृत्त करेल. पी.आय.एल. च्या कल्पनेला न्यायालयांनी पूर्ण मान्यता दिली आहे. खालील दोन प्रकारच्या केसेस स्वीकारल्या जातात.

(१) जरी प्रत्यक्षपणे कोणत्याही विशिष्ट व्यक्तीच्या हितावर परिणाम होत नसेल, तरी जर मोठ्या संख्येतील लोकांच्या हितावर परिणाम होत असेल तर

(२) ज्या लोकांचे हित किंवा हक्क धोक्यात असतील, त्यांच्याकडे न्यायालयाकडे दाद मागण्यासाठी जाण्यासाठी साधने नसतील तर

उपेंद्र बक्षी वि. उत्तर प्रदेश सरकार (१९८३) २ एससीसी ३०८ या खटल्यामध्ये आग्रा येथील सुरक्षागृहामध्ये राहणाऱ्यांना अमानुष परिस्थितीत ठेवण्यात आले होते.

त्यांच्यापैकी बहुतेक जण मतिमंदपणा किंवा मानसिक आजाराने पछाडलेले होते आणि त्यांना गंभीर संसर्गजन्य रोग झालेले होते असे त्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालावरून दिसत होते. प्रा. उपेन्द्र बक्षी यांनी याबाबत सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा अशी दाद मागितली आणि सर्वोच्च न्यायालयाने उपाय करण्याबाबत आदेश जारी केला.

शीला बारसे वि. महाराष्ट्र राज्य (१९८३) ३ एससीसी ९६ या प्रकरणात एका महिला पत्रकाराने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला उद्देशून लिहिलेल्या पत्रातून पोलीस कोठडीत संशयित स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वाईट वागणुकीबाबत आणि तेथे त्यांच्या केल्या जाणाऱ्या छळाबाबत आरोप केलेले होते. या पत्राला रिट अर्ज मानण्यात आले. न्यायालयाने छळ आणि वाईट वागणूक थांबवण्याबाबत आवश्यक दिशानिर्देश दिले.

पिपल्स युनियन फॉर डेमॉक्रेटिक राईटस् (पीयुडीआर) (एआयआर १९८२ स. न्या. १४७३) ने सर्वोच्च न्यायालयाला उद्देशून लिहिलेल्या पत्रात दारिद्र्य, अपंग किंवा सामाजिकदृष्ट्या किंवा आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या आणि त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू न शकणाऱ्या लोकांना भोगाव्या लागणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधले होते. हे गरीब लोक नवी दिल्लीतील आशियाई क्रीडा स्पर्धांशी संबंधित कामे करत होते. सर्वोच्च न्यायालयाने या युनियनला, कामगारांना काही लाभ देणाऱ्या विविध कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी, अर्ज दाखल करण्यांचा अधिकार असल्याचे म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, जनहित याचिका हे कायदेविषयक साहाय्याच्या चळवळीचे महत्त्वाचे शस्त्र आहे आणि क्वचितच मानवतावादाच्या दृष्टीस पडणाऱ्या दारिद्री, दुबळ्या बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. सर्वसाधारणपणे परंपरागत खटल्यांमध्ये एक दावा करणारा किंवा हक्क सांगणारा किंवा दुसऱ्याविरुद्ध दाद मागणारा आणि दुसरा दावा किंवा हक्काला विरोध करणारा किंवा दाद नाकारणारा अशा दोन पक्षकारांमध्ये भांडण असते. मात्र जनहित याचिका हे वेगळ्या प्रकारचे खटले असतात. अशा रीतीने जनहित याचिकेच्या संकल्पनेद्वारे सर्वोच्च न्यायालयाने कलम २१ मधील जीविताच्या हक्कांची व्याप्ती वाढवली आहे.

जनहित याचिका न्यायालयासमक्ष सर्वसाधारण खटल्यांमध्ये असते त्याप्रमाणे इतराविरुद्ध एखाद्या व्यक्तीच्या हक्काच्या अंमलबजावणीच्या हेतूसाठी नव्हे, तर जनहिताचे संवर्धन करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्याच्या हेतूने दाखल होतात. त्यामध्ये दीनदुबळ्या, उपेक्षित किंवा सामाजिकदृष्ट्या किंवा आर्थिकदृष्ट्या मागास अवस्थेतील बहुसंख्य लोकांकडे त्यांच्या घटनात्मक किंवा कायदेशीर हक्कांचे उल्लंघन होत असताना दुर्लक्ष होऊ नये आणि ते न्यायापासून वंचित राहू नये अशी अपेक्षा असते, नाही तर कायद्याचे राज्य उलथून पडेल.

लोकशाही पद्धतीचे सरकार असेल तर कायद्याचे राज्य हे जनहिताच्या दृष्टीने अति आवश्यक बाब असते. कायद्याचे संरक्षण उपलब्ध करून देणे नव्हे तर त्यांच्या नागरी आणि राजकीय हक्कांच्या अंमलबजावणीच्या रूपाने त्यांच्या आहे त्या स्थितीचे (जैसे थे) संरक्षण करणे होय.

अनेक विद्वान, कार्यकर्ते आणि न्यायविषयक तज्ज्ञ जनहित याचिकांवर टीका करतात. त्यांच्यामते न्यायपालिका कार्यकारी मंडळाच्या कार्यक्षेत्रात पाऊल टाकते आहे आणि आधीच प्रलंबित खटल्यांच्या ओझ्याखाली दबलेल्या न्यायपालिकेसाठी हा वेळेचा अपव्यय आहे. हे टीकाकार हे विसरतात की, स्वातंत्र्य आणि लोकशाहीसाठी असलेले अमूल्य आणि अनमोल नागरी आणि राजकीय हक्क भारतातील बहुजन समाजासाठी अस्तित्वात नसल्यासारखेच आहेत. बहुसंख्येने पुरुष, स्त्रिया आणि मुले जी भारताच्या लोकसंख्येचा मोठा भाग आहेत, आज ती अति दारिद्र्याच्या परिस्थितीत खितपत पडलेली आहेत. त्यामुळे त्यांची कंबरही खचलेली आहे आणि त्यांच्यातील नैतिकता नाश पावली आहे. त्यांची सध्याच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेवर श्रद्धा नाही. त्यांच्यासाठी नागरी आणि राजकीय हक्क अर्थपूर्ण बनवायचे असतील तर परिस्थिती पुन्हा नव्याने घडवणे आणि त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना करणे हाच

एकमेव मार्ग आहे. नागरी आणि राजकीय हक्क एका बाजूला आणि आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हक्क दुसऱ्या बाजूला यांच्यामध्ये निकटचे संबंध आहेत. जनहित याचिकेसह इतर बहुविध धोरणांद्वारे सामाजिक आणि आर्थिक मुक्तता कार्यक्रम परिणामकारक होऊ शकतील. जनहित याचिका ही अर्जदार, राज्य किंवा सार्वजनिक अधिकारीणी आणि न्यायालये यांच्या बाजूने समाजाच्या टीकेला पात्र ठरणाऱ्या विभागाला प्रदान केलेल्या घटनात्मक किंवा कायदेशीर हक्कांचे, लाभांचे आणि विशेषाधिकारांचे व्यवहारात पालन होण्याची हमी देण्यासाठी केलेला सहकारी किंवा सामूहिक प्रयत्न आहे आणि अशा रीतीने त्यांच्यापर्यंत सामाजिक न्याय पोहोचवण्याचा प्रयत्न होत आहे.

न्यायालयापुढे मोठ्या संख्येने प्रलंबित प्रकरणे असताना जनहित याचिका स्वीकारणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या अमूल्य वेळेचा अपव्यय आहे हे म्हणणे सर्वोच्च न्यायालयाने नाकारले आहे. जे जनहित याचिकेवर टीका करतात त्यांना हे कळलेले नाही की, न्यायालये ही केवळ श्रीमंत आणि सुस्थितीतील लोकांसाठी, जमीनदार आणि सुशिक्षितांसाठी, धनाढ्य व्यावसायिक आणि औद्योगिक महाराजे यांच्यासाठीच नाहीत तर न्यायालये दीनदुबळे आणि पददलित 'नाही रे' गटातले आणि अपंग आणि अर्धपोटी जगणाऱ्या लाखो देशवासीयांसाठीदेखील अस्तित्वात आहेत. आतापावेतो, केवळ धनाढ्य आणि संपन्न लोकांचे हक्क शाबीत करण्यासाठीच न्यायालयांचा वापर केला गेला आहे.

आता जनहित याचिकांनी समाजाच्या सर्व विभागांसाठी मूलभूत हक्कांचे आश्वासन देणारा नवा अध्याय सुरू केला आहे. केवळ पोस्टकार्ड किंवा अर्जाला रिट अर्ज/याचिका मानले जात असल्यामुळे संबंधित नागरिकांना खटला भरण्याचा सोपा पर्याय मिळाला आहे. न्यायालय अर्जाची विश्वासार्हता आणि तो दाखल करून घेण्याची पात्रता तपासते आणि नंतर तो अर्ज जनहित याचिका म्हणून स्वीकार करते. जलद गतीने आणि कमीत कमी खर्चात न्यायाद्वारे पददलितांच्या मूलभूत हक्कांची याचना करण्याच्या पद्धतीत जनहित याचिकेने नवजीवन दिले आहे.

### ६.२.२.३ जनहित याचिका विशद करणारे खटले

१९८१ मध्ये खत्री वि. बिहार राज्य (ए.आय.आर १९८१ स.न्या. १०६८) या खटल्याने पोलिसांचा अमानुषपणा उघड केला. वृत्तपत्रातील वृत्तावरून समजले की, बिहारमध्ये पोलिसांनी सुमारे ३३ संशयित गुन्हेगारांना त्यांच्या डोळ्यात ॲसिड टाकून अंध केले. सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन त्या अंध व्यक्तींना दिल्लीत वैद्यकीय उपचारासाठी आणण्याबाबत राज्य सरकारला निर्देश दिले. दोषी पोलिसांवर जलदगतीने खटला चालविण्याचे आदेश दिले. न्यायालयाने त्या वेळी अन्वयार्थ लावताना प्रत्येक आरोपीला मोफत कायदेविषयक साहाय्य मिळण्याचा हक्क हा त्याचा मूलभूत हक्क असल्याचा निर्वाळा दिला. अनिल यादव यांनी सामाजिक चळवळीच्या आणि शोधक खटलेबाजीच्या वाढीची भविष्यवाणी केली.

डी.सी. वाधवा वि. बिहार राज्य (एआयआर १९८७ स.न्या.५७९) या प्रकरणी अर्जदार हे एक राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांनी बरेच संशोधन केलेले होते. घटनात्मक तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत ते उत्सुक होते. त्यांनी बिहार राज्यातील कायदेमंडळाच्या संमतीशिवाय अनेक वटहुकुमांच्या पुनर्प्रसिद्धीला आव्हान दिले. तेव्हा अर्जदाराचा या प्रकरणी जनतेतील एक म्हणून पुरेसा हितसंबंध असल्याचे मानून त्यांना कलम ३२ प्रमाणे त्याविरुद्ध दाद मागता येईल असे सांगण्यात आले.

१९८७ मध्ये सरिता वि. दिल्ली प्रशासन आणि इतर या हुंडाबळीच्या खटल्यात एका स्त्रीने सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहिले. त्यात लग्नानंतर दोन महिन्यांतच तिच्या सासरच्या मंडळींनी तिच्याकडून पैसे मागण्यास सुरुवात केल्याचे म्हटले होते. तिच्या जीवाला धोका असून तिला वकील नेमणे परवडणारे नाही आणि दिल्ली पोलिसांनी तिला मदत देण्याचे नाकारल्याचे तिने पत्रात लिहिलेले होते. न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली आणि दिल्लीच्या पोलीस आयुक्तांना नोटीस बजावली. त्याद्वारे प्रकरणाची एक आठवड्यात चौकशी करून त्याचा अहवाल न्यायालयाला सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

अर्जदाराला सर्व आवश्यक आणि पुरेसे पोलिस संरक्षण [१९८७(१)] पुरवण्याच्या सूचना देण्यात आल्या. या मूळ आदेशाच्या तारखेपासून ७ दिवसांत दिल्ली पोलिसांनी आदेशाचे तंतोतंत पालन केल्याचे आणि योग्य कारवाई सुरू असल्याचे आढळून आले. सरिताने न्यायालयाकडे कायदेविषयक साहाय्य मागितले आणि दिल्ली जिल्हा कायदेविषयक साहाय्य आणि सल्ला मंडळाला ते देण्याविषयी सूचना देण्यात आल्या. [१९८७ (१)]

शीला बारसे वि. युनियन ऑफ इंडिया (१९८६, ३ एस.सी.सी.५९६) हे प्रकरण देशाच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये कारागृहात १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना डांबून ठेवण्याशी संबंधित होते. राज्यांनी त्यांनी केलेल्या चिल्ड्रेन्स् ॲक्टची अंमलबजावणी परिणामकारकरीतीने करावी असा निर्वाळा न्यायालयाने दिला. न्यायालयाने पुढे सांगितले की, या विषयावर संसदेने केंद्रीय कायदा संमत करणे अपेक्षित आहे. अर्जदार, समाजसेविकेला खर्च रुपये १०,०००/- द्यावा आणि आवश्यक ते सर्व सहकार्य पुरवावे तिला व्यक्तिश: राज्यातील सर्व वेगवेगळ्या कारागृहांना भेटी देण्यास परवानगी द्यावी अशा सूचना न्यायालयाने केंद्र सरकारला केल्या.

बंधुआ मुक्ती मोर्चा वि. युनियन ऑफ इंडिया (ए.आय.आर. १९८४, स.न्या. ८०२) वेठबिगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने हे प्रकरण दाखल केले. या प्रकरणाची वस्तुस्थिती अशी- हरियाणा राज्यात दगडांच्या खाणीमध्ये मोठ्या संख्येने मजूर कामगार अमानुष आणि करुणाजनक स्थितीत काम करत होते. त्यांना वैद्यकीय मदत दिली जात नव्हती. सुरक्षिततेचे उपाय अवलंबले जात नव्हते आणि ते छप्पर नसलेल्या झोपड्यांमधून राहत होते. तिथे राज्यांची अधिकारीणी संबंधित कायद्याची योग्य अंमलबजावणी करत नव्हती. न्यायालयाने याची गंभीरपणे नोंद घेतली. या वेठबिगारीवरील मजुरांच्या सुटकेचे आदेश दिले. मुक्त झालेल्या मजुरांच्या योग्य आणि अधिक अर्थपूर्ण पद्धतीने पुनर्वसनासाठी योजना किंवा कार्यक्रम आखायचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

मुरली एस. देवरा वि. युनियन ऑफ इंडिया या प्रकरणात न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी केली.

दिल्ली डोमेस्टिक वर्किंग वुमेन्स फोरम वि. युनियन ऑफ इंडिया [१९९५, १ एससीसी १४] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने बलात्कारित कामगार महिलेच्या पुनर्वसनासाठी आणि नुकसान भरपाईसाठी मार्गदर्शक सूचना सांगितल्या.

आर.एल. ॲण्ड इ. केंद्र वि. उत्तर प्रदेश राज्य (एआयआर १९८५ स.न्या. ६५२) या प्रकरणात हिमालयाच्या पायथ्याशी चालू असलेल्या पर्यावरणाचे संतुलन बिघडवणाऱ्या चुनखडीच्या खाणी बंद करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

गौरव जैन. वि. युनियन ऑफ इंडिया (एआरआर १९९७ स.न्या. ३०१९) या प्रकरणात वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांच्या पुनर्वसनाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यासाठी न्यायालयाने योग्य सूचना जारी केल्या.

एम.सी. मेहता वि. तमिळनाडू राज्य (एआयआर १९९१ स.न्या. ४१७) प्रकरणात आगपेटीच्या उद्योगात लहान मुलांना नोकरीवर ठेवण्यास आव्हान देण्यात आले. न्यायालयाने सांगितले की, १४ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या मुलांना कोणत्याही धोकादायक उद्योगांमध्ये किंवा खाणीत किंवा इतर कामावर नोकरीस ठेवता येणार नाही. जरी न्यायालयाने आगपेट्यांच्या बांधणीच्या कामात मुलांना काम देण्यास परवानगी दिली, तरी आगकाड्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणापासून बांधणीचे (पॅकिंगचे) ठिकाण दूर असावे अशी अट होती. त्यांना शिक्षण, वैद्यकीय मदत, किमान वेतन, स्वत: मालकाने हप्ते भरून सक्तीचा विमा उतरवणे अशा सुविधा पुरविण्याची हमी देण्याबाबत उद्योगाच्या मालकांना सूचना जारी करण्यात आल्या.

विशाखा वि. राजस्थान राज्य (१९९७ स.न्या.) राजस्थानातील एका गावात एका समाजसेविकेवर अमानुष सामूहिक बलात्कार झाल्यानंतर अनेक सामाजिक कार्यकर्ते

आणि स्वयंसेवी संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाकडे जनहित याचिकेच्या स्वरूपात विशाखा खटला दाखल केला. सामूहिक बलात्काराबाबतची तक्रार फौजदारी न्यायालयाकडे सोपवण्यात आली. तथापि, राज्यघटनेच्या कलम १४, १५, २१ मधील 'लिंगावर आधारित समानता' आणि 'जीविताचा व स्वातंत्र्याचा हक्क' या मूलभूत हक्कांचे उल्लंघन कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झाल्यास होते, असे तेव्हाचे मुख्य न्यायाधीश वर्मा यांनी त्यांच्या निकालात म्हटले आहे. यापुढे जाऊन त्यांना असेही आढळले की, जेव्हा लैंगिक छळ घडतो तेव्हा कोणताही पेशा आचरण्याचे किंवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या कलम १९(१) (ग) चेदेखील उल्लंघन होते. अशा रीतीने, या निकालानुसार कलम १९ प्रदान करत असलेला मूलभूत हक्क हा कामाच्या ठिकाणी 'सुरक्षित' वातावरण असण्यावर अवलंबून आहे. न्यायालयाने पुढे म्हटले आहे की, 'योग्य कायदे करून आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा निर्माण करून त्याद्वारे अशा सुरक्षिततेची आणि सभ्यतेची हमी देण्याची प्रारंभिक जबाबदारी कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाची आहे.'

जेव्हा लैंगिक छळाच्या घटनांमुळे राज्यघटनेने महिला कामगारांना प्रदान केलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होते आणि अशा घटना, कलम ३२ अन्वये अन्याय निवारणासाठी न्यायालयासमोर दाखल केल्या जातात तेव्हा या हक्कांच्या संरक्षणासाठी काही मार्गदर्शक सूचना देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे कर्तव्य ठरते.

न्यायालयाने दिलेल्या काही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे -

(१) लैंगिक छळास प्रतिबंध करणे किंवा परावृत्त करणे आणि आवश्यक ते सर्व उपाय करून लैंगिक छळाच्या घटना घडल्यास त्याचे निवारण, तडजोड किंवा त्यावर कार्यवाही करण्यासाठी कार्यपद्धती तयार करण्याचे मालक किंवा कामाच्या ठिकाणची जबाबदार माणसे किंवा इतर संस्था यांचे कर्तव्य आहे.

(२) 'लैंगिक छळास प्रतिबंध आहे' असे मालकाने प्रकाशन, वितरणाद्वारे त्यांच्या कामगारांना/कर्मचाऱ्यांना सांगितले पाहिजे.

(३) काम, विश्रांती, आरोग्य आणि स्वच्छता याबाबत योग्य वातावरण पुरवून कामाच्या ठिकाणी महिलांच्या विरोधात कलुषित वातावरण नाही याची हमी दिली पाहिजे.

याशिवाय फौजदारी न्यायालयीन कामकाजासाठी, शिस्तभंग कारवाईसाठी कार्यपद्धती सांगितली असून त्याचबरोबर 'यंत्रणा' आणि 'तक्रार समिती'साठी तरतूद दिलेली आहे.

मेधा कोतवाल लेले आणि इतर वि. युनियन ऑफ इंडिया आणि इतर [डब्ल्यू पी. (क्री.) नं. १७३-१७७/१९९९] या प्रकरणी निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, विशाखा निकालात नमूद केलेली तक्रार समिती ही केंद्रीय नागरी सेवा (वर्तन) नियम १९६४ च्या हेतूसाठी चौकशी अधिकारीणी मानण्यात येईल आणि तक्रार समितीच्या अहवालाला या नियमान्वये चौकशी अहवाल मानण्यात येईल. दुसऱ्या शब्दांत, तक्रार समितीची चौकशी आणि अहवाल हा लैंगिक छळाच्या प्रकरणी अंतिम शब्द मानला जाईल. कोणतीही इतर इन हाऊस 'चौकशी समिती'द्वारा पुन्हा तीच प्रक्रिया अवलंबली जाणार नाही.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) जनहित याचिका म्हणजे काय ?

(२) जनहित याचिकेचे महत्त्व काय ?

(३) न्यायालयाने उपाय सुचवले आहेत असे जनहित याचिकेचे दोन खटले सांगा.

## ६.३ सारांश

या घटकामध्ये आपण 'मानवी हक्कांची रक्षक' या न्यायपालिकेच्या भूमिकेचा अभ्यास केला. न्यायपालिकेचे काम परिणामकारक असावे, यासाठी ती स्वतंत्र आणि सर्व प्रकारचे दबाव आणि पक्षपातीपणा यापासून मुक्त असली पाहिजे. न्यायविषयक कमाल स्वातंत्र्याची हमी देऊन भारताच्या राज्यघटनेने राज्याच्या घटक अंगांचे एकमेकांवर नियंत्रण आणि त्यांचे आपापसात संतुलन राखले आहे.

न्यायविषयक पुनर्विचाराचा अधिकार अंतर्भूत केल्याने राज्यघटनेने जतन केलेल्या मूलभूत हक्कांचा संरक्षक ही भूमिका न्यायपालिका उत्तम रितीने पार पाडू शकते. न्यायविषयक पुनर्विचार म्हणजे कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळाच्या अधिकारीणीच्या कृत्यांच्या घटनात्मक वैधतेविषयी निवाडा करण्याचा न्यायालयाचा अधिकार. अनेक खटल्यांमध्ये मूलभूत हक्क आणि घटनात्मक मूल्य कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळाला जोपासता यावेत यासाठी न्यायपालिकेने धोरणात्मक निर्देश दिले आहेत. या वळणाला न्यायविषयक चळवळ म्हटले जाते.

भारतात जनहित याचिकेचे तत्त्व हे दबावाला बळी पडणाऱ्या लोकांच्या गटांच्या मानवी हक्कांची (मूलभूत हक्कांची) अंमलबजावणी करणारे साधन म्हणून उत्क्रांत झाले आहे. म्हणून असे मानले आहे की, जेव्हा जेव्हा राज्याच्या किंवा सार्वजनिक अधिकारीणीच्या, राज्यघटनेशी किंवा कायद्याशी विसंगत असणाऱ्या कृत्यामुळे किंवा कर्तव्यच्युतीमुळे सार्वजनिक अन्याय किंवा जनतेची हानी होते तेव्हा तेव्हा अशा सार्वजनिक अन्यायाविरुद्ध किंवा जनतेच्या हानीच्या निवारणासाठी विश्वासार्ह आणि पुरेसा हितसंबंध असलेली कुणीही व्यक्ती कार्यवाही करू शकते.

हीन, दीन आणि गरीब असे लक्षावधी लोक त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांच्यासाठी प्रारंभिक मानवी हक्क अर्थपूर्ण बनवण्यासाठी न्यायालयाकडे आशेने पाहत आहेत. बहुजन समाजाची ही अपेक्षा आता जनहित याचिकेद्वारे पूर्ण होत आहे.

तुरुंगातील न्यायालयीन चौकशीची वाट पाहणाऱ्यांचे दुःख, तुरुंगातील छळ आणि अमानुष परिस्थिती, अन्याय्य अटक आणि तुरुंगवास, वायू आणि जलप्रदूषणासारखे पर्यावरणीय विषय, शिक्षण, इत्यादी मुद्यांचा न्यायालयाने विविध जनहित याचिकांमधून विचार केला आहे.

## ६.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ :** लैंगिक छळ याचा अर्थ शाब्दिक, लिखित, चित्राद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्या वापराने केलेले लैंगिक इशारे, मागण्या किंवा लिंगाधारित लाभासाठी विनंत्या, विनयभंग, लैंगिक अर्थ सुचवणारे हावभाव, बोलणे, शेरेबाजी किंवा विनोद यांच्यासह परंतु इतक्यापुरतेच मर्यादित न राहता केलेले शारीरिक, शाब्दिक किंवा अशाब्दिक असे कोणतेही स्वागतार्ह नसलेले लिंगाधारित वर्तन.

**लोकस स्टँडी :** न्यायालयासमक्ष हजर होण्यासाठीचे कारण / आधार.

## ६.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

***स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १***

(१) भारताच्या राज्यघटनेने तिसऱ्या भागात जतन केलेल्या मूलतः मानवी हक्क असलेल्या मूलभूत हक्कांची संरक्षक आणि आश्वासक म्हणून न्यायपालिका कार्य करते.

(२) न्यायविषयक पुनर्विचार म्हणजे कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळाच्या अधिकारीणींच्या कृत्यांच्या

घटनात्मक वैधतेविषयी निवाडा करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

(३) जेव्हा न्यायपालिका कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळाला मूलभूत हक्क आणि घटनात्मक मूल्यांचे पालन करण्याबाबत निर्देश देऊन धोरणात्मक निर्णयांमध्ये हस्तक्षेप करते तेव्हा त्याला न्यायविषयक चळवळ संबोधले जाते.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२*

(१) संपूर्ण समाजाच्या सदस्यांच्या सेवेसाठी असणारा खटल्याचा निकाल म्हणजे जनहित याचिका.

(२) भारतात जनहित याचिकेने दीनदुबळ्यांसाठी, सामाजिक संस्थांसाठी, कार्यकर्त्यांसाठी न्यायाचे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले तर सर्वोच्च न्यायालयाकडून हस्तक्षेपाचा उपाय करता येतो.

(३) (अ) एम.सी.मेहता वि. युनियन ऑफ इंड़िया (१९८८)१ एसीसी ४७१, (ब) शीला बारसे वि. महाराष्ट्र राज्य१९८३) २, एसीसी ९६

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) जनहित याचिका कोण दाखल करू शकतो ?

(२) जनहित याचिका आणि सर्वसामान्य न्यायालयांसमोरील खटला यात फरक काय ?

(३) जनहित याचिकांचे कामकाज चालवून सर्वोच्च न्यायालय त्यांचा अमूल्य वेळ वाया घालवत आहे काय ?

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) शर्माजी, ह्युमन राईटस् अँड लीगल रेमेडीज्

# परिशिष्ट १ : भारतीय राज्यघटना भाग ३, ४ व ४ अ

## भाग ३ : मूलभूत हक्क

### सर्वसाधारण

व्याख्या

(१२) या भागात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, ''राज्य'' या शब्दात भारताचे सरकार व संसद आणि राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन व विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील अथवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे

*(१३)(१) या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदीशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत् असतील.

(२) राज्य, या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणार नाही किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करून केलेला कोणताही कायदा त्या उल्लंघनाच्या व्याप्तीपुरता शून्यवत असेल.

(३) या अनुच्छेदात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर -

(क) ''कायदा'' यात, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याइतकाच प्रभावी असलेला कोणताही अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, विनियम, अधिसूचना, रूढी किंवा परिपाठ यांचा समावेश आहे.

(ख) ''प्रवर्तनात असलेले कायदे'' यात, भारताच्या राज्यक्षेत्रातील विधानमंडळाने किंवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याने या संविधानाच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या किंवा न केलेल्या व पूर्वी निरसित न झालेल्या कायद्याचा समावेश आहे - मग असा कोणताही कायदा किंवा त्याचा कोणताही भाग त्यावेळी मुळीच किंवा विशिष्ट क्षेत्रांमध्ये अमलात नसला तरी हरकत नाही.

[१][(४)अनुच्छेद ३६८ खाली संविधानात केलेल्या कोणत्याही सुधारणेला या अनुच्छेदातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.]

---

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामध्ये या संविधानाच्या प्रारंभासंबंधीच्या निर्देशाचा अर्थ, ''संविधान (जम्मू व काश्मीरला लागू करणे) आदेश, १९५४'' यांच्या प्रारंभासंबंधीचे म्हणजे १४ मे, १९५४ या दिनांकासंबंधीचे निर्देश म्हणून लावण्यात येईल.

१. ''संविधान (चोविसावी सुधारणा) अधिनियम, १९७१'' कलम २ द्वारे घातले.

## समानतेचा हक्क

कायद्यापुढे समानता

(१४) राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही.

धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई

(१५) (१) राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक-

(क) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यात प्रवेश किंवा

(ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरताच खास नेमून दिलेल्या अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर

याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

[१][(४) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेदन २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे, नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती* यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.]

[२][(५) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद १९ च्या खंड (१) मधील उपक्रम (छ) मधील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरता, तरतूद करण्यास अनुच्छेद ३० च्या खंड १ मधील संदर्भित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांच्या व्यतिरिक्त खाजगी शैक्षणिक संस्थासहित इतर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तरतूद करण्यासाठी राज्यास अशी तरतूद करण्यापासून प्रतिबंध होणार नाही.]

---

१. "संविधान (पहिली सुधारणा) अधिनियम १९५१" -- कलम २ द्वारे घातले.

२. "संविधान (त्र्याण्णवावी सुधारणा) अधिनियम २००५" -- कलम २ द्वारे घातले. (२० जानेवारी, २००६ रोजी व तेव्हापासून)

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना या अनुच्छेदाचा खंड (४) यातील अनुसूचित जनजातींचा निर्देश गाळला जाईल.

सार्वजनिक सेवायोजनाच्या बार्बीमध्ये समान संधी

(१६) (१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बार्बीमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या किंवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही, अथवा त्यांच्या बाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

**(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे [३](एखादे राज्य किंवा संघराज्य क्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एखाद्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या, पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यांच्यासंबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्या पूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा) कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

[४][(क) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील क्षेत्रांमध्ये ज्या अनुसूचित जातींना किंवा अनुसूचित जनजातींना त्या राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व देण्यात आलेले नसेल त्यांना, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवासंबंधीतील [५](कोणत्याही वर्गामध्ये किंवा वर्गांमध्ये परिणामस्वरूप

---

३. ''संविधान (सातवी सुधारणा) अधिनियम, १९५६'' -- कलम २९ व अनुसूची यांद्वारे ''पहिल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही राज्याच्या किंवा त्याच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एखाद्या प्रकारचे किंवा अनेक प्रकारचे सेवायोजन किंवा पदनियुक्ती याच्या संबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्यापूर्वी त्या राज्यातील निवासाविषयी कोणताही आवश्यकता विहित करणारा याच्याऐवजी हा मजकूर घातला.

४. ''संविधान (सत्याहत्तरावी सुधारणा) अधिनियम १९९५'' -- कलम २ द्वारे हा खंड (४क) घातला.

५. ''संविधान (पंच्यांऐंशीवी सुधारणा) अधिनियम २००१'' -- कलम २ द्वारे घातले (१७ जून, १९९५ रोजी व तेव्हापासून अमलात आल्याचे समजण्यात येईल.)

** या अनुच्छेदाचा खंड (३) यामध्ये ''राज्य'' याच्या निर्देशात जम्मू व काश्मीर राज्याच्या निर्देशाचा समावेश नाही, असा त्याचा अर्थ लावला जाईल.

ज्येष्ठतेसह पदोन्नती देण्यासंबंधात) आरक्षण करण्यासाठी राज्याला कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही.]

[६][(ख) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे राज्याला, खंड (४) किंवा खंड (४क) अन्वये आरक्षणासाठी केलेल्या कोणत्याही तरतुदींनुसार भरण्यासाठी म्हणून एखाद्या वर्षात राखून ठेवलेल्या परंतु त्या वर्षात रिक्त राहिलेल्या जागांच्या बाबतीत राज्याला, पुढील कोणत्याही वर्षात किंवा वर्षांमध्ये भरावयाच्या रिक्त जागांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचारात घेण्यास प्रतिबंध होणार नाही आणि अशा वर्गातील रिक्त जागा, ज्या वर्षामध्ये त्या भरण्यात येतील त्या वर्षातील रिक्त जागांच्या पन्नास टक्के इतकी आरक्षणाची मर्यादा ठरविण्याकरिता, त्या वर्षातील इतर रिक्त जागांबरोबर जमेस धरल्या जाणार नाहीत.]

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्माची अनुयायी असणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे, अशी तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

अस्पृश्यता नष्ट करणे.

(१७) ''अस्पृश्यता'' नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. ''अस्पृश्यतेतून'' उद्‌भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

किताब नष्ट करणे.

(१८) (१) सेवाविषयक किंवा विद्याविषयक मानविशेष नसलेला असा कोणताही किताब राज्याकडून प्रदान केला जाणार नाही.

(२) भारताचा कोणताही नागरिक कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.

(३) भारताची नागरिक नसलेली कोणतीही व्यक्ती, ती राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करत असताना राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय कोणत्याही परकीय देशाकडून कोणताही किताब स्वीकारणार नाही.

(४) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्रकारची कोणतीही भेट, वित्तलब्धी किंवा पद स्वीकारणार नाही.

---

६. ''संविधान (एक्याऐंशीवी सुधारणा) अधिनियम २०००'' -- कलम २ द्वारे हा खंड (४ख) समाविष्ट केला.

भाषण स्वातंत्र्य, इत्यादीसंबंधीच्या विवक्षित हक्कांचे संरक्षण

## स्वातंत्र्याचा हक्क

* (१९) (१) सर्व नागरिकांस -

(क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा;

(ख) शांततेने व विनाशास्त्र एकत्र जमण्याचा;

(ग) अधिसंघ वा संघ बनविण्याचा;

(घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा;

(ड) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा; [१](**आणि)

*** [२](च) * * * * *

(छ) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याचा हक्क असेल.

[३][(२) खंड (१) चा उपखंड (क) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे, [४](भारताची सार्वभौमता व एकात्मता), राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता आणि नीतिमत्ता यांच्या हितासाठी अथवा न्यायालयाचा अवमान, अब्रुनुकसानी किंवा अपराधास चिथावणी यांच्या संबंधात जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.]

(३) उक्त खंडाचा उपखंड (ख) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे, [४](भारताची सार्वभौमता व एकात्मता) किंवा सार्वजनिक सुव्यवस्था यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) उक्त खंडाचा उपखंड (ग) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे[१] (भारताची सार्वभौमता व एकात्मता

---

१. "संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८" -- कलम २ द्वारे घातले (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे खंड (च) गाळला (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

३. "संविधान (पहिली सुधारणा) अधिनियम, १९५१" -- कलम ३ द्वारे मूळ खंड (२) ऐवजी घातला (भूतलक्ष्यी प्रभावासह)

४. "संविधान (सोळावी सुधारणा) अधिनियम, १९६३" -- कलम २ द्वारे घातले.

किंवा) सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता यांच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) उक्त खंडामधील [२]*[उपखंड (घ) व (ड)] यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडानी प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे, सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(६) उक्त खंडाचा उपखंड (छ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त उपखंडाने प्रदान केलेल्या हक्काच्या वापरावर ज्या कायद्याद्वारे सर्वसाधारण जनतेच्या हितासाठी जेथवर वाजवी निर्बंध घातले असतील तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला

---

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, १४ मे, १९५४ पासून वीस वर्षांच्या कालावधीपर्यंत हा अनुच्छेद पुढील फेरबदलांच्या अधीन असेल -

(एक) खंड (३) व (४)मध्ये ''ज्या कायद्याद्वारे'' या शब्दांच्या नंतर ''राज्याची सुरक्षितता किंवा'' हे शब्द घातले जातील;

(दोन) खंड (५)मध्ये ''किंवा कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी'' या शब्दांच्या ऐवजी ''किंवा राज्याच्या सुरक्षिततेच्या हितासाठी'' हे शब्द घातले जातील;

आणि

(तीन) पुढील नवीन खंडाची भर घातली जाईल, तो खंड असा --

''(७) खंड (२), (३), (४) व (५) यामध्ये येणाऱ्या ''वाजवी निर्बंध'' ह्या शब्दांचा अर्थ समुचित विधानमंडळाला वाजवी वाटतील असे निर्बंध, असा लावला जाईल.

** जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, उपखंड (ड)च्या अखेरीस असलेला ''आणि'' गाळला जाईल.

*** जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, उपखंड (ड) नंतर पुढील उपखंड घातला जाईल.

(च) मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा आणि निकालात काढण्याचा ''आणि''

१ ''संविधान (सोळावी सुधारणा) अधिनियम, १९६३''- कलम ३ द्वारे घातले.

२. ''संविधान (चव्वेचाळीसावी सुधारणा) अधिनियम, १९७८''- कलम २ द्वारे ''उपखंड (घ) (ड) व (च)'' या मजकुराऐवजी घातले (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

३. ''संविधान (पहिली सुधारणा) अधिनियम, १९५१''- कलम ३ द्वारे विवक्षित मूळ शब्दांऐवजी घातले.

प्रतिबंध होणार नाही आणि विशेषत: (उक्त उपखंडातील कोणत्याही गोष्टीमुळे जो कायदा -

(एक) कोणताही पेशा आचरण्याकरता अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालवण्याकरता आवश्यक असलेल्या पेशाविषयक किंवा तंत्रविषयक अर्हता, किंवा

(दोन) नागरिकांना पूर्णत: किंवा अंशत: वगळून अथवा अन्यथा राज्याने अथवा राज्याचे स्वामित्व किंवा नियंत्रण असलेल्या महामंडळाने कोणताही व्यापार, धंदा, उद्योग किंवा सेवा चालवणे.

यांच्याशी जेथवर संबंध असेल तेथवर, अशा कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास प्रतिबंध होणार नाही.

**अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण**

(२०) (१) जे कृत्य अपराध असल्यास दोषारोप करण्यात आला असेल ते कृत्य एखाद्या व्यक्तीने करण्याच्या वेळी अमलात असलेल्या कायद्याचा त्यामुळे भंग झाल्याखेरीज अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती व्यक्ती दोषी ठरवली जाणार नाही, तसेच तो अपराध करण्याच्या वेळी अमलात असलेल्या कायद्याखाली जी शिक्षा करता आली असती त्यापेक्षा अधिक शिक्षेस ती पात्र ठरवली जाणार नाही.

(२) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा कोणत्याही व्यक्तीवर खटला चालवला जाणार नाही आणि तिला शिक्षा दिली जाणार नाही.

(३) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

**जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण**

(२१) कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

**शिक्षणाचा हक्क**

[४]२१ क : राज्य हे, सहा वर्षांपासून ते चौदा वर्षांपर्यंतच्या मुलांना; कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देईल.

**विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण**

[५](२२)(१) अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा अटकेची कारणे शक्य तितक्या लवकर तिला कळवल्याशिवाय, हवालातीत स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा आपल्या पसंतीच्या विधिव्यवसायाचा विचार घेण्याचा व त्याच्याकरवी बचाव करण्याचा हक्क तिला नाकारला जाणार नाही.

(२) जिला अटक केली आहे व हवालातील स्थानबद्ध केले आहे अशा प्रत्येक व्यक्तीला,

---

४. ''संविधान (शहांशीवी दुरुस्ती) अधिनियम २००२'' -- कलम २ द्वारे समाविष्ट केले.

५. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९८७'' -- कलम ३ अमलात आल्यावर या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे अनुच्छेद २२ मध्ये याप्रमाणे सुधारणा होईल.

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना उपखंड (घ) (ड) व (च) हा मजकूर घातला जाईल.

अटकेच्या ठिकाणापासून सर्वांत जवळच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासास आवश्यक असलेला अवधी वगळून अशा अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत त्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल आणि अशा कोणत्याही व्यक्तीला उक्त कालावधीनंतर अधिक काळ दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय हवालातीत स्थानबद्ध करण्यात येणार नाही.

(३) (क) जी व्यक्ती त्या वेळी शत्रूदेशीय असेल अशा कोणत्याही व्यक्तीला; किंवा

(ख) ज्या व्यक्तीला प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली अटक केली आहे किंवा स्थानबद्ध केले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला.

खंड (१) व (२) यातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

[१][*(४) प्रतिबधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याद्वारे, दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचा प्राधिकार, समुचित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या शिफारशीनुसार घटित केलेल्या सल्लागार मंडळाने उक्त दोन महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, आपल्या मते अशा स्थानबद्धतेला पुरेसे कारण आहे असा अभिप्राय दिलेला नसेल तर, दिला जाणार नाही.

परंतु, सल्लागार मंडळ हे, अध्यक्ष व किमान दोन अन्य सदस्य मिळून बनलेले असेल व अध्यक्ष हा समुचित उच्च न्यायालयाच्या सेवेमध्ये असणारा न्यायाधीश असेल आणि अन्य सदस्य हे, कोणत्याही उच्च न्यायालयाच्या सेवेमध्ये असलेले किंवा त्याचे सेवानिवृत्त न्यायाधीश असतील.

परंतु, आणखी असे की, खंड ७ चा उपखंड (क) याखाली संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे विहित केलेल्या कमाल कालावधीच्या पलीकडे कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यास या खंडातील कोणत्याही गोष्टीमुळे प्राधिकृती मिळणार नाही.

स्पष्टीकरण : या खंडामध्ये ''समुचित उच्च न्यायालय'' याचा अर्थ -

(एक) भारत सरकारने अथवा त्या सरकारला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा

---

१. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९८७'' कलम ३ अमलात आल्यावर त्याद्वारे मूळ खंड (४) ऐवजी हा खंड दाखल केला जाईल. (मूळ खंड इंग्रजी परिशिष्ट ३ मध्ये पाहा.)

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या खंड (४)मध्ये ''संसद'' याऐवजी ''राज्याचे विधानमंडळ'' हा शब्दोल्लेख घातला जाईल.

प्राधिकाऱ्याने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या बाबतीत, दिल्ली या संघ राज्यक्षेत्राचे उच्च न्यायालय असा आहे.

(दोन) (संघराज्य सोडून अन्य) कोणत्याही राज्याच्या शासनाने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या बाबतीत त्या राज्याचे उच्च न्यायालंय असा आहे आणि

(तीन) एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाने अथवा अशा प्रशासकाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या स्थानबद्धतेच्या आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या बाबतीत, संसदेने त्यासंबंधात केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात येईल असें उच्च न्यायालय, असा आहे.]

(५) प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्यांखाली दिलेल्या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात आले असेल तेव्हा आदेश देणारा,प्राधिकारी, ज्या कारणावरून तो आदेश दिला गेला आहे ती कारणे, शक्य तितक्या लवकर, अशा व्यक्तीला कळवील आणि त्या आदेशाविरुद्ध आपले अभिवेदन करण्याची तिला लवकरात लवकर संधी देईल.

(६) खंड (५) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, त्या खंडात निर्दिष्ट केलेला असा कोणताही आदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्यास, जी तथ्ये प्रकट करणे सार्वजनिक हिताच्या विरोधी वाटेल ती तथ्ये प्रकट करणे अशा प्राधिकाऱ्यास आवश्यक असणार नाही.

*(७) [१]* * * *

[१][(क) प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही एका वा अनेक वर्गातील प्रकरणी कोणत्याही व्यक्तीस जितका काळ स्थानबद्ध करता येईल तो कमाल कालावधी;] आणि

[१][(ख) [२][(खंड ४)] या खालील चौकशीत सल्लागार मंडळाने अनुसरावयाची कार्यपद्धती संसदेस कायद्याद्वारे विहित करता येईल.]

---

१. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९८७'' कलम ३ अमलात आल्यावर त्याद्वारे उपखंड (क) गाळण्यात येईल आणि उपखंड (ख) व (ग) यांना अनुक्रमे (क) व (ख) असे नवीन क्रमांक दिले जातील. (पाहा. इंग्रजी परिशिष्ट - तीन)

२. वरील अधिनियमाचे कलम ३ अमलात आल्यावर त्याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात येईल.

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना या अनुच्छेदाचा खंड (७) यामध्ये ''संसद'' याऐवजी ''राज्यविधानमंडळ'' हा शब्दोल्लेख घातला जाईल.

## शोषणाविरुद्ध हक्क

माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई

(२३) (१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनाकरता सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होणार नाही व अशी सेवा करावयास लावताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य, कोणताही भेदभाव करणार नाही.

कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई.

(२४) चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात वा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही.

## धर्मस्वातंत्र्याचा हक्क

सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार

(२५) (१) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य तरतुदींच्या अधीनतेने, सदसद्विवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.

(२) या अनुच्छेद्रातील कोणत्याही बाबीमुळे -.

(क) धर्माचरणाशी निगडित असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकेतर कार्यांचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या;

(ख) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था, हिंदूंचे सर्व वर्ग व पोट-भेद यांना खुल्या करण्याबाबत तरतूद करणाऱ्या,

कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

स्पष्टीकरण एक : कृपाणे धारण करणे व स्वत:बरोबर बाळगणे हे शीख धर्माच्या प्रकटीकरणात समाविष्ट असल्याचे मानले जाईल.

स्पष्टीकरण दोन : खंड (२) च्या उपखंड (ख) मध्ये ''हिंदू'' या शब्दोल्लेखात शीख, जैन वा बौद्ध धर्म प्रकट करणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख समाविष्ट आहे असा त्याचा अर्थ लावला जाईल, आणि हिंदू धार्मिक संस्थांच्या उल्लेखांचा अर्थही तद्नुसार लावला जाईल.

धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य

(२६) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या अधीनतेने प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास -

(क) धार्मिक व धर्मादायी प्रयोजनांकरता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविण्याचा;

(ख) धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा;

(ग) जंगम व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा; आणि

(घ) कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धना-करिता कर देण्या बाबत स्वातंत्र्य

(२७) ज्यांचे उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माचे अथवा धार्मिक संप्रदायाचे संवर्धन करण्यासाठी किंवा तो चालू ठेवण्यासाठी विनिर्दिष्टपणे विनियोजित केलेले आहे, असे कोणतेही कर देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

विवक्षित शैक्षणिक संस्थांत धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य

(२८) (१) पूर्णत: राज्याच्या पैशातून चालवल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

(२) जी शैक्षणिक संस्था राज्याकडून प्रशासली जात असेल परंतु धार्मिक शिक्षण देणे आवश्यक करणारा कोणताही दाननिधी किंवा न्यास याखाली ती स्थापन झालेली असेल तिला खंड (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(३) राज्याने मान्यता दिलेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत जे काही धार्मिक शिक्षण दिले जाईल, त्यात भाग घेण्यास अथवा अशा संस्थेत किंवा तिच्यांशी संलग्न असलेल्या कोणत्याही जागेत, जी काही धार्मिक उपासना चालविली जाईल, तिला उपस्थित राहण्यास, अशा संस्थेत जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा अशी व्यक्ती अज्ञान असल्यास तिच्या पालकाने, आपली संमती दिली असल्याखेरीज अशा व्यक्तीस तसे करणे आवश्यक केले जाणार नाही.

## सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क

अल्पसंख्याक वर्गांच्या हितसंबंधाचे संरक्षण

(२९) (१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची वेगळी भाषा, लिपी व संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असेल.

(२) राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

अल्पसंख्याक वर्गांचा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क

(३०) (१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

[१][(१ क) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्याक वर्गाने स्थापन केलेल्या व प्रशासलेल्या शैक्षणिक संस्थेची कोणतीही मालमत्ता सक्तीने संपादन करण्याची तरतूद करणारा कोणताही कायदा करताना राज्य, अशा मालमत्तेच्या संपादनाबद्दल अशा कायद्याने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रकमेमुळे, त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही, अशा प्रकारची ती रक्कम आहे, याबद्दल खात्री करून घेईल.]

(२) शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही, धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे. या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही.[२*]

*(३१) [३][मालमत्तेचे सक्तीने संपादन]

[१*] **(विवक्षित कायद्यांची व्यावृत्ती)**

[१](संपदांचे संपादन, इत्यादीकरता तरतूद करणाऱ्या कायद्यांची व्यावृत्ती)

(३१क) [३][(१) अनुच्छेद १३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -

(क) कोणत्याही संपदेचे किंवा तिच्यातील कोणत्याही हक्काचे राज्याने संपादन करणे अथवा असे कोणतेही हक्क नष्ट करणे अथवा त्यांच्यात फेरबदल करणे, किंवा

---

१. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८)'' -- कलम ४ द्वारे खंड (१ क) घातला (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे ''मालमत्तेचा हक्क'' हे उपशीर्षक गाळले. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे अनुच्छेद ३१ निरसित केला. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

३१.१ ''संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६ -- कलम ३ द्वारे घातले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

२. ''संविधान (पहिली सुधारणा) अधिनियम, १९५१'' -- कलम ४ द्वारे घातला. (भूतलक्ष्यी प्रभावासह)

३. ''संविधान (चौथी सुधारणा) अधिनियम, १९५५'' -- कलम ३ द्वारे मूळ खंड (१) ऐवजी घातला (भूतलक्ष्यी प्रभावासह)

(ख) कोणत्याही मालमत्तेचे व्यवस्थापन राज्याने सार्वजनिक हितासाठी किंवा त्या मालमत्तेचे योग्य प्रकारे व्यवस्थापन व्हावे यासाठी मर्यादित कालावधीपुरते आपल्या हाती घेणे किंवा

(ग) दोन वा अधिक महामंडळांचे सार्वजनिक हितासाठी किंवा त्यापैकी कोणत्याही महामंडळाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन व्हावे यासाठी एकत्रीकरण करणे, किंवा

(घ) महामंडळाचे व्यवस्थापन एजंट, सचिव व कोषाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक, संचालक वा व्यवस्थापक यांचे कोणतेही हक्क अथवा महामंडळाच्या भागधारकाचे कोणतेही मतदानाचे हक्क नष्ट करणे किंवा त्यात फेरबदल करणे किंवा

(ङ) कोणतेही खनिज किंवा खनिज तेल शोधण्याच्या किंवा ते काढण्याच्या प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही कराराच्या, भाडेपट्टयाच्या किंवा लायसनच्या आधारे मिळणारे कोणतेही हक्क नष्ट करणे किंवा त्यांच्यात फेरबदल करणे अथवा असा कोणताही करार, भाडेपट्टा किंवा लायसन मुदतीपूर्वी समाप्त करणे किंवा रद्द करणे

याकरता तरतूद करणारा कोणताही कायदा हा, [४][(अनुच्छेद १४ किंवा अनुच्छेद १९**)] यांनी प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्काशी विसंगत आहे अथवा त्या कायद्यामुळे असा हक्क हिरावला जातो किंवा त्या हक्कांचा संकोच होतो या कारणावरून तो शून्यवत असल्याचे मानले जाणार नाही.

*** परंतु, असा कायदा हा एखाद्या राज्याच्या विधानमंडळाने केलेला कायदा असेल त्या बाबतीत, असा कायदा राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवला जाऊन त्यास त्याची अनुमती मिळाल्याशिवाय, या अनुच्छेदाच्या तरतुदी त्या कायद्यास लागू होणार नाहीत.]

[५][परंतु आणखी असे की, जर एखाद्या कायद्यामध्ये कोणत्याही संपदेचे राज्याने संपादन

---

४. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम १९७८'' -- कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

५. ''संविधान (सतरावी सुधारणा) अधिनियम, १९६४'' -- कलम २ द्वारे घातले.

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना ''विवक्षित कायद्यांची व्यावृत्ती'' हे उपशीर्षक गाळले जाईल.

** जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना ''अनुच्छेद १४ किंवा अनुच्छेद १९'' याऐवजी ''अनुच्छेद १४, अनुच्छेद १९ किंवा अनुच्छेद ३१'' हा मजकूर घातला जाईल.

*** जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना हे परंतुक गाळले जाईल आणि तदनंतरच्या परंतुकातील ''आणखी असे की'' हा मजकूर वगळण्यात येईल.

करण्याबाबतची तरतूद करण्यात आली असेल आणि तीमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही जमीन एखाद्या व्यक्तीने जातीने कसण्यासाठी धारण केली असेल तर, अशी जमीन अथवा तिच्यावर उभी असलेली किंवा तिला लागून असलेली कोणतीही इमारत किंवा बांधकाम यांच्या संपादनाशी संबंधित असलेल्या कायद्यामध्ये त्यांच्या बाजारमूल्याहून कमी असणार नाही अशा दराने भरपाई देण्याबाबत तरतूद करण्यात आली नसेल तर, त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार त्या व्यक्तीला लागू असलेल्या कमालमर्यादेच्या आत असलेल्या अशा जमिनीचा कोणताही भाग अथवा अशी इमारत किंवा बांधकाम यांचे राज्याने संपादन करणे कायदेशीर ठरणार नाही.]

(२) या अनुच्छेदात -

[१][ * (क) कोणत्याही स्थानिक क्षेत्रामध्ये अमलात असलेल्या जमीनधारणा पद्धतीशी

---

१. ''संविधान (सतरावी सुधारणा) अधिनियम, १९६४'' -- कलम २ द्वारे उपखंड (क) ऐवजी घातला (भूतलक्ष्यी प्रभावासह)

* जम्मू काश्मीर राज्याला लागू करताना ३१ क या अनुच्छेदाचा खंड (२) याचा उपखंड (क) याऐवजी पुढील उपखंड घातला जाईल तो असा -

''क'' ''संपदा'' याचा अर्थ, कृषि-प्रयोजनाकरता अथवा कृषीला साधनभूत असलेल्या प्रयोजनांकरता अथवा गुरे चारण्याकरता कब्ज़ा ठेवलेली अथवा पट्ट्याने दिली गेलेली अशी जमीन असा असेल आणि त्यात --

(एक) इमारतींच्या जागा आणि अशा जमिनीवरील अन्य बांधकामे;

(दोन) अशा जमिनीवर उभी असलेली झाडे;

(तीन) रानजमीन व झाडे असलेली पडीत जमीन;

(चार) जलाच्छादित क्षेत्र अथवा पाण्यावरील तरती शेते;

(पाच) जंडेर व घरात यांच्या जागा;

(सहा) कोणतीही जहागीर, इनाम, मुआफी अथवा मुकर्ररी किंवा यासारखी अन्य देणगी यांचा समावेश आहे. पण त्यात पुढील गोष्टींचा समावेश नाही-

(एक) कोणतेही नगर, अथवा नगरक्षेत्र अथवा ग्राम आबादी यामधील कोणत्याही इमारतीची जागा अथवा अशा कोणत्याही इमारतीस अथवा जागेस लागून असलेली कोणतीही इमारत;

(दोन) नगर अथवा ग्राम यांची जागा म्हणून कब्जात ठेवली गेलेली कोणतीही जमीन; किंवा

(तीन) नगरपालिका अथवा अधिसूचित क्षेत्र अथवा कटक अथवा नगरक्षेत्र अथवा ज्याकरता नगरनियोजन योजना मंजूर झाली आहे असे कोणतेही क्षेत्र यातील बांधकामाच्या प्रयोजनाकरता राखून ठेवलेली कोणतीही जमीन.''

संबंधित अशा विद्यमान कायद्यात ''संपदा'' हा शब्दप्रयोग किंवा त्याचा स्थानिक समानार्थी शब्द याला जो अर्थ असेल तोच अर्थ, त्या क्षेत्राच्या संबंधात त्या शब्दप्रयोगास असेल आणि त्यामध्ये -

(एक) कोणत्याही जहागीर, इनाम अथवा मुआफी किंवा यासारखी अन्य देणगी आणि [२][तामिळनाडू] व केरळ या राज्यांमध्ये कोणताही जन्म हक्क

(दोन) रयतवारी जमाबंदीखली धारण केलेली कोणतीही जमीन;

(तीन) पडीत जमीन, रानजमीन, गायरान अथवा जमिनीचे लागवडदार, शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या ताब्यातील इमारती व अन्य बांधकामे यांच्या जागा धरून शेतीच्या कामांसाठी किंवा शेतीला साहाय्यभूत अशा कामांसाठी धारण केलेली किंवा भाडेपट्ट्याने दिलेली कोणतीही जमीन,

यांचाही समावेश असेल;]

(ख) संपदेच्या संबंधातील ''हक्क'' या शब्दप्रयोगात, स्वामी, उपस्वामी, अवरस्वामी, भूधृतिधारक, [३][रयत, अवरयत] किंवा अन्य मध्यस्थ यांच्याकडे निहित असलेले कोणतेही हक्क आणि जमीन महसुलाच्या या बाबतीतील कोणतेही हक्क किंवा विशेषाधिकार यांचा समावेश असेल.]

[४][विवक्षित अधिनियम व विनिमय विधिग्राह्य करणे.]

(३१ख) अनुच्छेद ३१ क मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या व्यापकतेला बाधा न येता नवव्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणताही अधिनियम आणि विनियम अथवा त्यांच्या तरतुदींपैकी कोणतीही तरतूद ही या भागाच्या कोणत्याही तरतुदींनी प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्काशी विसंगत आहे अथवा त्याच्यामुळे तो हक्क हिरावला जातो किंवा त्या हक्काचा संकोच होतो या कारणावरून असा अधिनियम, विनियम किंवा तरतूद शून्यवत आहे अथवा कधी काळी शून्यवत होती, असे मानले जाणार नाही, आणि कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश विरुद्ध असला तरी कोणत्यांही सक्षम विधानमंडळास उक्त अधिनियमांपैकी आणि विनियमांपैकी प्रत्येक अधिनियम आणि विनियम निरसित करण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा जो अधिकार असेल, त्याच्या अधीनतेने त्या प्रत्येकाला अमल चालू राहील.]

---

२. मद्रास राज्य (नामांतर) अधिनियम, १९६८ (१९६८ चा ५३) -- कलम ४ द्वारे ''मद्रास'' याऐवजी घातले (१४ जानेवारी १९६९ रोजी व तेव्हापासून)

३. ''संविधान (चौथी सुधारणा) अधिनियम, १९५५'' -- कलम ३ द्वारे घातले. (भूतलक्ष्यी प्रभावासह)

४. ''संविधान (पहिली सुधारणा), १९५१'' -- कलम ५ द्वारे घातला.

[1]*[विवक्षित निदेशक तत्त्वे अमलात आणणाऱ्या कायद्यांची व्यावृत्ती]

(३१ग) अनुच्छेद १३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी [2][चौथ्या भागामध्ये घालून दिलेली सर्व किंवा त्यापैकी कोणतीही तत्त्वे] सुनिश्चित करण्याचे राज्याचे धोरण अमलात आणणारा कोणताही कायदा हा, [3][अनुच्छेद १४ किंवा अनुच्छेद १९] यांनी प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्काशी विसंगत आहे अथवा त्या कायद्यामुळे तो हक्क हिरावला जातो किंवा त्या हक्काचा संकोच होतो या कारणावरून तो शून्यवत असल्याचे मानले जाणार नाही; ** [आणि एखादा कायदा असे धोरण अमलात आणण्यासाठी योजलेला आहे, अशी घोषणा त्या कायद्यात अंतर्भूत असेल तर, असा कोणताही कायदा, तो असे धोरण अमलात आणत नाही या कारणावरून कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद केला जाणार नाही.]

परंतु, असा कायदा राज्य विधानमंडळाने केलेला असेल त्या बाबतीत, असा कायदा, राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवला जाऊन त्याला त्यांची अनुमती मिळाल्याशिवाय, या अनुच्छेदाच्या तरतुदी त्याला लागू होणार नाहीत.)

[4][३१घ] [राष्ट्रविरोधी कारवायांच्या बाबतीतील कायद्यांची व्यावृत्ती.]

## सांविधानिक उपाय योजण्याचा हक्क

या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरता उपाय

(३२) (१) या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरता समुचित कार्यवाहीद्वारे सर्वोच्च न्यायालयास अर्ज विनंती करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे.

---

१. ''संविधान (पंचविसावी सुधारणा) अधिनियम, १९७१'' -- कलम ३ द्वारे घातला. (२० एप्रिल, १९७२ रोजी व तेव्हापासून)

२. ''संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६'' -- कलम ४ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी घातले. (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

३. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८'' -- कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

४. ''संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६'' -- कलम ५ द्वारे घातलेला अनुच्छेद ३१ घ हा ''संविधान (त्रेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७७'' कलम २ द्वारे निरसित करण्यात आला. (१३ एप्रिल, १९७८ रोजी व तेव्हापासून)

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू नाही.

मिनर्व्हा मिल्स लि. आणि अन्य विरुद्ध भारत संघ आणि अन्य (१९८०) २ एस.सी.सी. ५९१, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाद्वारे कलम ४ विधिअग्राह्य घोषित करण्यात आले.

** केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, (१९७३) एस.सी.आर.१, या प्रकरणात ही तरतूद विधिअग्राह्य असल्याचा निर्णय दिला होता.

(२) या भागाने प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणताही हक्क बजावण्याकरता समुचित असतील ते ते निदेश अथवा आदेश अथवा हेबियस कॉर्पस (देहोपस्थिति), मँडॅमस (महादेश), प्रोहिबिशन (प्रतिषेध), को वारंटो (काधिकार) व सर्शिओराराय (प्राकर्षण) या स्वरूपाच्या प्राधिलेखांसह प्राधिलेख काढण्याचा सर्वोच्च न्यायालयास अधिकार असेल.

***(३) खंड (१) व (२) द्वारे सर्वोच्च न्यायालयास प्रदान केलेल्या अधिकारांना बाध न येता, खंड (२) खाली सर्वोच्च न्यायालयाला वापरता येतील असे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार अन्य कोणत्याही न्यायालयाला आपल्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत वापरण्यास संसद कायद्याद्वारे अधिकार प्रदान करू शकेल.

(४) या संविधानाने अन्यथा तरतूद केलेली असेल तेवढी वगळता, या अनुच्छेदाने हमी दिलेला हक्क निलंबित केला जाणार नाही.

[१][३२ क. राज्य कायद्यांची सांविधानिक विधिग्राह्यता अनुच्छेद ३२ खालील कार्यवाहींमध्ये विचारात न घेणे.]

[२][या भागाने प्रदान केलेले हक्क हे सेना, इत्यादींना लागू करताना, त्यामध्ये फेरबदल करण्याचा संसदेस अधिकार.

(३३) या भागाने प्रदान केलेले हक्क -

(क) सशस्त्र सेवादलांचे सदस्य; किंवा

(ख) ज्यांच्यावर सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे अशा दलांचे सदस्य; किंवा

(ग) राज्याने, गुप्तवार्ता किंवा प्रतिगुप्तवार्ता यांच्या प्रयोजनार्थ, स्थापन केलेला ब्युरो किंवा इतर संस्था यामध्ये नेमलेल्या व्यक्ती; किंवा

---

*** जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदाचा खंड (३) गाळला जाईल आणि खंड (२) नंतर पुढील नवीन खंड घातला जाईल, तो असा --

"(२क) खंड (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारास बाध न येता, या भागाने प्रदान केलेल्या अधिकारांपैकी कोणतीही अधिकाराच्या बजावणीकरता उच्च न्या[illegible] ज्याच्या संबंधात ते अधिकारितेचा वापर करीत आहे त्या राज्यक्षेत्रात सर्वत्र, त्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीला वा समुचित बाबीत कोणतेही शासन धरून कोणत्याही प्राधिकरणाला निदेश अथवा आदेश अथवा हेबियस कॉर्पस, मँडॅमस, प्रोहिबिशन, को वॉरंटो व सर्शिओराराय या स्वरूपाचे प्राधिलेख अथवा यापैकी कोणत्याही प्राधिलेखासह प्राधिलेख काढण्याचा अधिकार

१. "संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६" -- कलम ६ द्वारे घातलेला अनुच्छेद ३२ क हा "संविधान (त्रेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७७" कलम ३ द्वारे निरसित केला.

२. "संविधान (पन्नासावी सुधारणा) अधिनियम, १९८४" -- कलम २ द्वारे मूळ अनुच्छेद ३३ ऐवजी घातला. ((११ सप्टेंबर, १९८४ रोजी व तेव्हापासून)

(घ) खंड (क) ते (ग) यामध्ये निर्देशित केलेले कोणतेही दल, ब्युरो किंवा संघटना यांच्या कामासाठी उभारलेल्या दूरसंचार यंत्रणेमध्ये किंवा त्यासंबंधात नेमलेल्या व्यक्ती.

यांना लागू करताना निश्चितपणे त्यांच्या कर्तव्यांचे योग्य प्रकारे पालन व्हावे व त्यांच्यामध्ये शिस्त राखली जावी यासाठी ते हक्क कोणत्या व्याप्तीपर्यंत निर्बंधित किंवा निराकृत करण्यात यावेत, हे संसदेला कायद्याद्वारे निर्धारित करता येईल.]

एखाद्या क्षेत्रात लष्करी कायदा अंमलात असताना या भागाने प्रदान केलेल्या हक्कांवर निर्बंध.

(३४) या भागाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही असले तरी, भारताच्या राज्यक्षेत्रामध्ये जेथे लष्करी कायदा अमलात होता अशा कोणत्याही क्षेत्रात सुव्यवस्था राखणे किंवा ती पूर्ववत प्रस्थापित करणे यासंबंधात संघराज्याच्या किंवा राज्याच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल संसद कायद्याद्वारे तिचे हानिरक्षण करू शकेल अथवा अशा क्षेत्रातील लष्करी कायद्याखाली दिलेला शिक्षादेश, केलेली शिक्षा, आदेशित समपहरण किंवा केलेली अन्य कृती विधिग्राह्य करू शकेल.

या भागाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरता विधिविधान

*(३५) या संविधानात काहीही असले तरी -

(क) (एक) अनुच्छेद १६ चा खंड (३), अनुच्छेद ३२ चा खंड (३), अनुच्छेद ३३ व अनुच्छेद ३४ याखाली संसदेने केलेल्या कायद्याद्वारे ज्या बाबींसाठी तरतूद करता येईल, त्यापैकी कोणत्याही बाबतीत; आणि

(दोन) या भागाखाली जी कृत्ये अपराध म्हणून घोषित केलेली आहेत, त्याबद्दल शिक्षा विहित करण्याकरता,

कायदे करण्याचा अधिकार संसदेस असेल, राज्याच्या विधानमंडळास असणार

---

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदामध्ये -

(एक) या संविधानाच्या प्रारंभासंबंधीच्या निर्देशांचा अर्थ ''संविधान (जम्मू व काश्मीरला लागू करणे) आदेश १९५४'' याच्या प्रारंभासंबंधीचे १४ मे, १९५४ चे निर्देश म्हणून लावला जाईल;

(दोन) खंड (क) (एक) मधील ''अनुच्छेद १६ चा खंड (३), अनुच्छेद ३२ चा खंड (३)'' मजकूर गाळला जाईल; आणि

(तीन) खंड (ख) नंतर पुढील खंडाची भर घातली जाईल, तो खंड असा -

''(ग) जम्मू व काश्मीर राज्याच्या विधानमंडळाने प्रतिबंधक स्थानबद्धतेबाबत केलेला कोणताही कायदा -- मग तो ''संविधान (जम्मू व काश्मीरला लागू करणे) आदेश, १९५४'' याच्या प्रारंभापूर्वीचा असो वा नंतरचा असो -- तो या भागातील तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींशी विसंगत आहे या कारणावरून शून्यवत असणार नाही पण असा कोणताही कायदा अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरता उक्त आदेशाच्या प्रारंभापासून पंचवीस वर्षांच्या समाप्तीनंतर, त्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी केलेल्या वा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टीखेरीज इतर बाबतीत प्रभावी राहणार नाही.''

नाही आणि संसद, या संविधानाच्या प्रारंभानंतर होईल तितक्या लवकर उपखंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या कृत्यांबद्दल शिक्षा विहित करण्यासाठी कायदा करील;

(ख) खंड (क) चा उपखंड (एक) यामध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अमलात असलेला अथवा त्या खंडाच्या उपखंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही कृत्यांबद्दल शिक्षेची तरतूद करणारा कोणताही कायदा, त्यातील अटींच्या आणि अनुच्छेद ३७२ खाली त्यात जी अनुकूलने व फेरबदल केले जातील त्यांना अधीन राहून संसदेकडून त्या कायद्यात फेरफार केला जाईपर्यंत किंवा तो निरसित केला जाईपर्यंत वा त्यात सुधारणा केली जाईपर्यंत, तसाच अमलात राहील.

**स्पष्टीकरण**

या अनुच्छेदात ''अमलात असलेला कायदा'' या शब्दप्रयोगात अनुच्छेद ३७२ मध्ये असलेलाच अर्थ आहे.*

---

* जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना, या अनुच्छेदानंतर पुढील नवीन अनुच्छेदाची भर घातली जाईल. तो अनुच्छेद असा -

(३५ क) कायम निवासी व त्यांचे हक्क यांच्या बाबतीतील कायद्याची व्यावृत्ती - या संविधानात काहीही अंतर्भूत असले तरी -

(क) जम्मू व काश्मीर राज्याचे कोण कायम निवासी आहेत वा होतील त्या व्यक्तींच्या वर्गाची व्याख्या करणारा किंवा

(ख) अशा कायम निवासी व्यक्तींना -

(एक) राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील नोकरी,

(दोन) राज्यात स्थावर मालमत्तेचे संपादन,

(तीन) राज्यातील स्थायित्व, किंवा

(चार) शिष्यवृत्त्या आणि राज्य सरकार तरतूद करील अशा इतर स्वरूपात साहाय्य मिळण्याचा अधिकार

यांच्याबाबत कोणतेही खास अधिकार व विशेषाधिकार प्रदान करणारा अथवा इतर व्यक्तींवर कोणतेही निर्बंध घालणारा.

जम्मू व काश्मीर राज्यात अमलात असलेला कोणताही विद्यमान कायदा आणि त्या राज्याच्या विधानमंडळाकडून यापुढे अधिनियमित केला जाणारा कोणताही कायदा या भागातील कोणत्याही तरतुदींनी भारताच्या इतर नागरिकांना प्रदान केलेल्या कोणत्याही हक्कांशी विसंगत आहे अथवा ते हिरावून घेतो वा त्यांचा संकोच करतो, या कारणावरून तो शून्यवत असणार नाही.''

## भाग चार*

## राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे

व्याख्या

(३६) या भागात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, ''राज्य'' या शब्दाला भाग तीन मध्ये असलेलाच अर्थ आहे.

या भागात अंतर्भूत असलेली तत्त्वे लागू करणे.

(३७) या भागात अंतर्भूत असलेल्या तरतुदी कोणत्याही न्यायालयाकरवी अंमलबजावणीयोग्य असणार नाहीत, पण तरीसुद्धा त्यात घालून दिलेली तत्त्वे देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत आणि कायदे करताना ही तत्त्वे लागू करणे, हे राज्याचे कर्तव्य असेल.

राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे.

(३८) [१][१] राज्य, त्यास शक्य होईल तितक्या परिणामकारक रीतीने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाद्वारे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व घटकांमध्ये प्रेरणा निर्माण करील अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करून व तिचे जतन करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

[२][२ राज्य, हे विशेषत: केवळ व्यक्ती-व्यक्तींमध्येच नव्हे तर निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळ्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसमूहांमध्येदेखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करील, आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील.]

राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्त्वे

(३९) राज्य हे, विशेषत: पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील.

(क) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा;

(ख) सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीचे स्वामित्त्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी;

(ग) आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचा व उत्पादन साधनांचा संबंध सामूहिक हितास बाधक होईल अशा प्रकारे एकाच ठिकाणी होऊ नये;

(घ) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे;

(ड) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

---

१. ''संविधान (चव्वेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७८'' -- कलम ९ द्वारे अनुच्छेद ३८ याला ''३८(१)'' असा नवीन क्रमांक दिला. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे ''खंड (२)'' घातला. (२० जून, १९७९ रोजी व तेव्हापासून)

* जम्मू व काश्मीर राज्यास लागू नाही.

[3][(च) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.]

[4][समान न्याय व कायदेविषयक मोफत साहाय्य.

३९ क. राज्य हे, कायद्याची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृद्धी होईल याची निश्चिती करील, आणि विशेषत: आर्थिक किंवा अन्य नि:समर्थतामुळे कोणत्याही नागरिकाला न्याय मिळवण्याची संधी नाकारली जाणार नाही, याची शाश्वती देण्यासाठी अनुरूप विधिविधानाद्वारे किंवा योजनांद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कायदेविषयक साहाय्य मोफत उपलब्ध करून देईल.]

ग्रामपंचायतींचे संघटन

(४०) राज्य हे, ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूल घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार बहाल करील.

कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसाहाय्याचा हक्क.

(४१) राज्य हे, आपली आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसाहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि प्रसूतीविषयक साहाय्य यांची तरतूद

(४२) राज्य हे, कामाबाबत न्याय्य व मानवी परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसूतीविषयक साहाय्यासाठी तरतूद करील.

कामगारांना निर्वाह वेतन, इत्यादी

(४३) राज्य, यथायोग्य विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग यांची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि विशेषत: ग्रामीण क्षेत्रांमध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

---

३. "संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६" - - कलम ७ द्वारे मूळ खंड (च) ऐवजी घातला (दिनांक ३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे घातला (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

[1](उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग)

४३ क राज्य, कोणत्याही उद्योगधंद्यात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनांमध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी, यथायोग्य विधिविधानाद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाययोजना करील.)

नागरिकांकरता एकरूप नागरी संहिता

४४ नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

सहावर्षांखालील मुलांचे संगोपन व शिक्षणाची तरतूद

[2]४५ राज्य हे, बालकांचे वय सहा वर्षांचे होईपर्यंत, त्यांचे संगोपन करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी तरतूद करील.

अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन

४६ राज्य, जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील.

पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य.

४७ आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानील आणि विशेषत: मादक पेये व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावणे.

४८ आधुनिक व शास्त्रीयरीतीने कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि विशेषत: गाई व वासरे आणि इतर दुभती व जुंपणीची गुरे यांच्या जातीचे जतन करणे व त्या सुधारणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरता उपाययोजना करील.

[3][पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करणे.

४८ क राज्य हे, देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील राहील.]

---

१. ''संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६'' - - कलम ९ द्वारे घातला. (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

२. ''संविधान (शहांशीवी सुधारणा) अधिनियम, २००२'' - - कलम ३ द्वारे, अनुच्छेद ४५ च्या ऐवजी हे घातले.

३. ''संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६'' - - कलम १० द्वारे घातला (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांचे संरक्षण | ४९ | [१][संसेदेने केलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून घोषित झालेले] कलादृष्ट्या किंवा ऐतिहासिकदृष्ट्या कुतूहलविषय असलेले प्रत्येक स्मारक किंवा स्थान किंवा वस्तू यांचे यथास्थिती लूट, विद्रूपण, नाश, स्थलांतरण, विल्हेवाट किंवा निर्यात यांपासून संरक्षण करणे, ही राज्याची जबाबदारी असेल. |
| न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवणे. | (५०) | राज्याच्या लोकसेवांमध्ये न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरता राज्य उपाययोजना करील. |
| आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा याचे संवर्धन | (५१) | राज्य हे,<br>(क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी;<br>(ख) राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी;<br>(ग) संघटित जनसमाजांच्या आपसातील व्यवहारांमध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व तहांची आबंधने यांबद्दल आदरभावना जोपासण्यासाठी; आणि<br>(घ) आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, प्रयत्नशील राहील. |

---

१. "संविधान (सातवी सुधारणा) अधिनियम, १९५६" - कलम २७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

## ✻ [1] भाग चार - क

## मूलभूत कर्तव्ये

मूलभूत कर्तव्ये

(५१ क) (क) संविधानाचे शपथपूर्वक पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे;

(घ) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे;

(ङ) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे;

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(छ) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे, आणि प्राणिमात्रांबद्दल दया-बुद्धी बाळगणे;

(ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ञ) राष्ट्र सतत, उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

(ही प्रत्येक भारतीय नागरिकांची कर्तव्ये असतील.)

[2](ट) जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास, त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षांपासून ते चौदाव्या वर्षांपर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

---

१. "संविधान (बेचाळीसावी सुधारणा) अधिनियम, १९७६" - कलम ११ द्वारे घातला. (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

* हा भाग जम्मू व काश्मीर राज्यास लागू असणार नाही.

२. "संविधान (शहांशीवी सुधारणा) अधिनियम, २००२" -- कलम ४ द्वारे घातले.

# परिशिष्ट २ : मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा आणि भारतीय राज्यघटना व कायद्यातील तरतुदी

भारताची राज्यघटना लिहिण्यास सुरुवात झाल्यानंतर दोन वर्षांनी मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा स्वीकारण्यात आला. तथापि, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या घटना समितीने जागतिक जाहीरनामा स्वीकारला. त्यातील प्रत्येक कलमाचे प्रतिबिंब भारताच्या राज्यघटनेत आणि कायद्यात दिसते. खालील तुलनात्मक तक्ता मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील वेगवेगळी कलमे आणि भारतीय राज्यघटना व कायद्यातील तरतुदींमधील साम्यस्थळे दाखवतो.

### मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील वेगवेगळी कलमे आणि भारतीय राज्यघटनेतील आणि कायद्यातील तरतुदींचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| (१) | सर्व माणसे जन्मत: मुक्त आणि प्रतिष्ठा आणि त्यांच्या हक्कांच्या बाबतीत समान असतात. | १४ | राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारणार नाही. |
| (२) | वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, जन्म या कारणावरून भेदभाव नाही. | १५ | केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणांसाठी राज्य कोणत्याही नागरिकांमध्ये भेद करणार नाही. |
| (३) | जीविताचा हक्क | २१ | कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही. |
| (४) | गुलामगिरीला नकार | २३ | माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| (५) | छळ, क्रौर्य, अमानुष किंवा मानहानीकारक वागणुकीला नकार | २१ | £ महाराष्ट्र राज्य वि. रविकांत एस. पाटील (१९९१)२ एससीसी ३७३<br>£ खटल्याची सुनावणी चालू असलेल्या कैद्याला बेड्या घालणे आणि तसे फिरवणे हे कलम २१ ने दिलेल्या हक्काचे उल्लंघन मानले.<br>£ बंधुआ मुक्ती मोर्चा वि. युनियन ऑफ इंडिया (१९८४) ३ पाहा १६१ आणि (१९९१) ४ पाहा १७७. मानवी प्रतिष्ठेसह जगण्याचा हक्क कलम २१मध्ये जतन केलेला आहे.<br>£ मेनका गांधी वि. युनियन ऑफ इंडिया (१९७८) १ पाहा २४८. कलम २१ मधील वैयक्तिक स्वातंत्र्य हा शब्दप्रयोग व्यापक अर्थाने वापरला आहे आणि त्यात त्याच्या सुरक्षिततेच्या हक्कासह अनेकविध हक्कांचा समावेश केलेला आहे. |
| (६) | सर्वत्र कायद्यासमोर व्यक्ती म्हणून वागवण्याचा हक्क | १४ व २१ | |
| (७) | कायद्यापुढे समानता | १४ | |
| (८) | परिणामकारक उपायांचा हक्क | ३२ | (१) राज्यघटनेने भाग ३ मध्ये प्रदान केलेल्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी योग्य पद्धतीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा हक्क दिलेला आहे.<br>(२) या भागात प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही हक्कांच्या अंमलबजावणीसाठी योग्य वाटतील असे निर्देश किंवा आदेश किंवा हेबियस कॉर्पस, मँडामस, प्रोहिबिशन, को वारंटो आणि सर्शिओराराय यापैकी कोणतेही (रिट) आदेश सर्वोच्च न्यायालय बजावेल.<br>(३) या राज्यघटनेने नमूद केले असेल तर त्याचा अपवाद वगळता या कलमाने ज्या हक्कांची हमी दिली आहे ते हक्क तहकूब करता येणार नाहीत. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | २२६ | प्रत्येक उच्च न्यायालयाला त्याच्या कार्यक्षेत्राशी संबंधित संपूर्ण प्रदेशात कोणाही व्यक्ती किंवा अधिकारीणीला, योग्य ठिकाणी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सरकारला निर्देश किंवा आदेश किंवा हेबियस कॉर्पस, मँडामस, प्रोहिबिशन, को वारंटो आणि सर्शिओराराय किंवा यापैकी कोणतेही रिट हे भाग तीनने प्रदान केलेल्या कोणत्याही हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आणि इतर कोणत्याही हेतूसाठी बजावण्याचे अधिकार आहेत. |
| (९) | मनमानी अटक आणि कैद | २२ | (१) अटक केलेल्या कोणाही व्यक्तीला शक्य तितक्या ताबडतोब त्याच्या अटकेची कारणे सांगितल्याशिवाय कैदेत टाकता येणार नाही. त्याला त्याच्या निवडीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा आणि त्याच्या मार्फत स्वतःचा बचाव करण्याचा हक्क नाकारता येणार नाही.<br>(२) अटक केलेल्या आणि कैदेत टाकलेल्या प्रत्येक व्यक्तीला अशी अटक केल्यापासून, व्यक्तीला अटक करण्यात आली ती जागा ते सर्वांत जवळच्या न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय अशा प्रवासासाठी आवश्यक असणारा वेळ वगळून, २४ तासांच्या आत जवळच्या न्यायदंडाधिकाऱ्यापुढे हजर केले पाहिजे. आणि अशा कुणाही व्यक्तीला या मुदतीपेक्षा अधिक काळासाठी न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशाशिवाय कैदेत ठेवता येणार नाही. |
| (१०) | सार्वजनिक सुनावणी आणि न्याय्य चौकशी | ३९ अ | समान संधीच्या आधारे न्यायाचे संवर्धन होईल अशा प्रकारे न्यायव्यवस्थेच्या कामकाजाची हमी राज्याने दिली पाहिजे आणि आर्थिक किंवा इतर अपात्रतेच्या कारणासाठी कोणाही नागरिकाला न्यायाची संधी नाकारली जात नाही याची खातरजमा करण्यासाठी योग्य कायदे करून किंवा योजना राबवून किंवा इतर मार्गाने विसेषकरून मोफत कायदेविषयक साहाय्य राज्य पुरवेल. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | ३०४* (सीसीपी) | जिथे न्यायालयासमक्ष चालणाऱ्या चौकशीत आरोपीने वकील नेमलेला नसेल आणि जिथे न्यायालयाला असे वाटेल की वकील नेमण्यासाठी आरोपीकडे पुरेशी साधनसंपत्ती नाही तेव्हा न्यायालय त्याच्या बचावासाठी राज्याच्या खर्चाने वकिलाची नेमणूक करेल. |
| | | ३०३* (सीसीपी) | फौजदारी न्यायालयात एखाद्या गुन्ह्याच्या आरोपी व्यक्तीला किंवा या संहितेनुसार ज्या व्यक्तीविरुद्ध फिर्याद दाखल झाली आहे अशा व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या निवडीच्या वकिलामार्फत बचावाचा हक्क आहे. |
| | | ३२७ (सीसीपी) | कोणतेही फौजदारी न्यायालय कोणत्याही गुन्ह्याची चौकशी किंवा सुनावणी ज्या जागेत करते, ती जागा खुले न्यायालय आहे असे मानण्यात येईल, तिथे सर्वसाधारणपणे जनतेला प्रवेश असेल, त्यांना तिथे सोयीस्करपणे थांबता येईल. |
| (११) | सार्वजनिक चौकशीत गुन्हा सिद्ध होईपर्यंत निरपराध समजणे, गुन्ह्याचे पूर्वलक्ष्यी जाहीर करणे किंवा पूर्वलक्ष्यी दुरुस्ती करून जास्तीत जास्त शिक्षेचे पूर्वलक्ष्यी उद्दिष्ट नसावे. | | कॉमन लॉचे तत्त्व, कायद्याच्या राज्याची शिकवण, आरोप सिद्ध होईपर्यंत निरपराध मानणे. |
| | | २० | (१) गुन्ह्यांचा आरोप असलेले कृत्य करते वेळी जर त्यामुळे अमलात असलेल्या कायद्याचे उल्लंघन होत असेल तर असे कृत्य वगळता इतर कोणत्याही गुन्ह्यासाठी व्यक्तीला दोषी ठरवले जाणार नाही तसेच त्याला तो गुन्हा करते वेळी अमलात असणाऱ्या कायद्याने जेवढी शिक्षा नमूद केलेली असेल त्यापेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही. |
| (१२) | खासगीपणा, कुटुंब, घर, पत्रव्यवहार, नावलौकिक यात हस्तक्षेप किंवा जबरदस्तीच्या विरुद्ध कायद्याचे संरक्षण | | संसदेने केलेल्या कायद्याने प्रत्येकाचा समावेश केला आहे आणि त्यांना संरक्षण दिले आहे. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| (१३) | (१) संचाराचे आणि राहण्या । स्वातंत्र्य | १९ ड | भारताच्या भूप्रदेशात सर्वत्र मुक्तपणे फिरणे. |
| | | इ | भारताच्या भूप्रदेशात कोणत्याही भागात राहणे आणि स्थायिक होणे. |
| | (२) जगण्याचा हक्क आणि देशात परतण्याचा हक्क | | पासपोर्ट कायद्याच्या तरतुदी |
| (१४) | धर्माचा हक्क | २५ | सर्व व्यक्तींना समानतेने सारासार विचाराचे आणि पेशा आचरण्याचे आणि धर्माच्या प्रसाराचे स्वातंत्र्य आहे. |
| (१५) | (१) राष्ट्रीयत्वाचा हक्क<br>(२) राष्ट्रीयत्वात बदल | ५ | या राज्यघटनेचा अंमल सुरू होत असते वेळी जो भारताच्या भूप्रदेशात राहतो आणि<br>(अ) भारताच्या भूप्रदेशात ज्यांचा जन्म झाला होता किंवा<br>(ब) भारताच्या भूप्रदेशात जन्मदात्यापैकी एकाचा जन्म झालेला होता किंवा<br>(क) राज्यघटनेचा अंमल सुरू होण्यापूर्वी सलग पाच वर्षे काळासाठी जो भारताच्या भूप्रदेशात राहत होता अशी प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक आहे. |
| | | ९ | जर एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने परदेशाचे नागरिकत्व संपादन केले असेल तर अशी व्यक्ती कलम ५ प्रमाणे भारताची नागरिक राहणार नाही किंवा कलम ६ किंवा ८ नुसार अशा व्यक्तीला भारताचे नागरिक मानले जाणार नाही. |
| | | १० | या भागाच्या मागील कोणत्याही तरतुदींनुसार अशी प्रत्येक व्यक्ती जिला भारताचे नागरिक मानले आहे किंवा अशी जी प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक असेल तर संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या आधीन राहून भारताच्या अशा व्यक्तीचे नागरिकत्व पुढे कायम राहील. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| (१६) | विवाह आणि कुटुंब | | वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांना लागू होणाऱ्या योग्य कायद्यांमध्ये याचा समावेश आहे. |
| (१७) | संपत्ती | ३०० | (अ) कायदेशीररीत्या संपादन केलेल्या संपत्तीपासून कोणाही व्यक्तीला वंचित करता येणार नाही. |
| (१८) | विचाराचे आणि सारासार विवेकाचे स्वातंत्र्य | २५ | (१) सर्व व्यक्तींना सारसारविवेकाने विचाराचे स्वातंत्र्य आणि मुक्तपणे धर्म, पेशाचे आचरण्याचे आणि प्रसाराचे हक्क समानतेने दिलेले आहे. |
| (१९) | माहितीचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य | १९ | (क) सर्व नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल. |
| (२०) | शांततापूर्ण सभा/बैठक आणि संघटन | १९ | (ख) सर्व नागरिकांना शांततेत आणि विनाशस्त्र एकत्र येण्याचा हक्क असेल. |
| (२१) | (१) लोकशाही | १९ | (ग) संघटना किंवा संघ बनवणे. |
| | | ३२५ | संसदेच्या कोणत्याही भवनासाठी किंवा राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकांसाठी प्रत्येक प्रादेशिक मतदारसंघाकरिता एक सर्वसाधारण मतदार यादी असेल. केवळ धर्म, वंश, जात, लिंग या किंवा यापैकी कोणत्याही कारणासाठी कोणाही व्यक्तीला अशा मतदार यादीत समावेश करताना अपात्र ठरवले जाणार नाही किंवा अशा कोणत्याही विशेष मतदारसंघामध्ये समावेशाचा दावा नाकारला जाणार नाही. |
| | | ३२६ | लोकसभा आणि प्रत्येक राज्याची विधानसभा यांच्या निवडणुका प्रौढांच्या संमतीवर आधारित असतील म्हणजेच भारताचा प्रत्येक नागरिक आणि योग्य कायदेमंडळाने केलेल्या कायद्याने त्यासाठी ठरवून दिलेल्या दिवसांपर्यंत |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | | ज्याचे वय १८ वर्षांचे आहे आणि ज्या व्यक्तीला अनिवासी असल्याच्या, वेडा असल्याच्या, गुन्हेगार किंवा भ्रष्ट किंवा बेकायदेशीर आचरण असल्याच्या कारणावरून या राज्यघटनेने किंवा योग्य कायदेमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्याने अपात्र ठरवलेले नसेल अशा प्रत्येक नागरिकाचे अशा कोणत्याही निवडणुकीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदवले जाईल. |
| | (२) सार्वजनिक सेवा | १६(१) | राज्याच्या अखत्यारीतील उद्योगाशी संबंधित विषयामध्ये किंवा नियुक्त्यांमध्ये सर्व नागरिकांसाठी समान संधी असेल. |
| | | १६(२) | राज्याच्या अखत्यारीतील कोणत्याही उद्योगाच्या किंवा कार्यालयाच्या बाबतीत कोणाही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थळ, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणांसाठी अपात्र ठरवले जाणार नाही किंवा या कारणांवरून भेदभाव केला जाणार नाही. |
| | (३) निवडणुका | ३२६ | निवडणुका |
| (२२) | सामाजिक सुरक्षितता | ३८(१) | न्याय, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य असणाऱ्या समाजव्यवस्थेची खात्री देऊन आणि त्यास संरक्षण देऊन परिणामकारकतेने लोकांच्या कल्याणाचे संवर्धन करण्याची धडपड राज्य करेल. राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना माहिती देईल. |
| (२३) | (१) कामाचा हक्क | ४१ | कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेरोजगारी, वृद्धत्व, आजारपण, अपंगत्व, पीडित अशा व्यक्तींच्या बाबतीत सार्वजनिक साहाय्यांच्या हक्काची हमी देण्यासाठी राज्य त्याच्या आर्थिक क्षमतेच्या आणि विकासाच्या मर्यादेत राहून परिणामकारक तरतुदी करेल. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | (२) समान मोबदल्याचा हक्क | ३९ (क) | नागरिक, स्त्री आणि पुरुषांकडे समानतेने, उपजीविकेची पुरेशी साधने असण्याच्या हक्काची हमी देण्यासाठी राज्य विशेषकरून त्याची धोरणे ठरवेल. |
| | (३) मानवी प्रतिष्ठेला साजेसा मोबदला | ४३ | योग्य कायदे करून किंवा आर्थिक संघटना किंवा इतर कोणत्याही मार्गाने सर्व शेतीशी, कारखान्यांशी किंवा इतर रोजावरील संबंधित कामगारांना चांगल्या जीवनमानाची हमी देणारी कामाची परिस्थिती आणि फुरसतीचा वेळ आणि सामाजिक व सांस्कृतिक संधी देऊ शकणारी, पूर्ण उद्योगधंदा यांची हमी देण्यासाठी राज्य प्रयत्न करेल. ग्रामीण भागात व्यक्तिगत किंवा सहकार तत्त्वावर गृहोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्न करेल. |
| | (४) संघ बनवण्याचा आणि त्यात सहभागी होण्याचा हक्क | १९(१) | (ग) |
| (२४) | विश्रांती, उचित कामाच्या तासांचा हक्क | ४३ | |
| (२५) | (१) आरोग्य आणि कल्याणासाठी पुरेसे जीवनमान | ४७ | आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या गोष्टी राज्य आपल्या प्राथमिक कर्तव्यांपैकी असल्याचे मानील आणि विशेषतः मादक पेये व आरोग्यास अपायकारक अशी अमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. |
| | (२) मातृत्व आणि बालपण | ३९(च) | बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात. बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे. |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | ४२ | राज्य हे, कामाबाबत न्याय्य व मानवी परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसूतीविषयक साहाय्यासाठी तरतूद करील. |
| (२६) | शिक्षणाचा हक्क | ४५ | या राज्यघटनेचा अंमल सुरू झाल्यापासून १० वर्षांच्या आत राज्य सर्व मुलांना वयाच्या १४ वर्षांपर्यंत मोफत सक्तीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करेल. |
| (२७) | (१) सांस्कृतिक जीवनात मुक्त सहभाग<br>(२) नैतिक आणि भौतिक हिताचे संरक्षण | ५१ (क) | (च) आपल्या वैविध्यपूर्ण संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मूल्य जाणणे आणि त्याचे जतन करणे. |
| (२८) | सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्था | ३८ | |
| | | ५१ | राज्य हे,<br>(क) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यांचे संवर्धन करण्याचा<br>(ख) राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्याय्य आणि सन्मानपूर्ण संबंध राखण्याचा<br>(ग) आंतरराष्ट्रीय कायदा आणि तहनामे यांच्याविषयी आदर बाळगण्याचा आणि संघटित लोकांच्या आपसातील देवघेवीस बंधनकारक मानण्याचा<br>(घ) लवादामार्फत आंतरराष्ट्रीय वाद मिटवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील राहील. |
| (२९) | कर्तव्ये | ५१ (क) | भारताच्या प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य असेल -<br>(क) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी;<br>(ख) राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी; |

| अ.क्र. | मानवी हक्कांचा जाहीरनामा | कलम अ.क्र. | भारतीय राज्यघटना आणि कायद्यातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | | (ग) संघटित जनसमाजांच्या आपसांतील व्यवहारांमध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व तहांची आबंधने याबद्दल आदरभावना जोपासण्यासाठी; आणि<br>(घ) आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील राहील. |

£ या भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांच्या संदर्भाच्या खुणा आहेत.

* या क्रिमिनल प्रोसिजर कोड १९७३ मधील तरतुदी आहेत.

# परिशिष्ट ३ : मानवी हक्कांशी संबंधित भारतीय कायदे

मानवी हक्कांच्या संरक्षण / संवर्धनावर नियंत्रण असणाऱ्या काही महत्त्वाच्या राष्ट्रीय कायद्यांची यादी खाली दिली आहे.

(१) भारताची राज्यघटना (सरनामा / भूमिका भाग III, IV, IV, A, कलम २२६, ३०० अ, ३२५, ३२६)

(२) मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३

हा कायदा मानवी हक्कांच्या चांगल्या संरक्षणासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालय यांची रचना करतो.

(३) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग -

'राज्यघटनेचे कलम ३३८ सांगते की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील लोकांच्या हक्कांचे चांगल्या रीतीने संरक्षण करण्यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग नेमला आहे.

(४) अल्पसंख्याकांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा, १९९२

'अल्पसंख्याकांच्या हक्कांचे चांगल्या रीतीने संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची तरतुद करणारा हा कायदा आहे.'

(५) महिलांसाठी राष्ट्रीय आयोग कायदा, १९९०

'महिलांच्या हक्कांचे चांगल्या रीतीने संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची तरतूद करणारा हा कायदा आहे.'

(६) नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५

'राज्यघटनेच्या कलम १७ नुसार अस्पृश्यता रद्द ठरवली आहे आणि कोणत्याही स्वरूपात अस्पृश्यतेच्या प्रथेला मनाई केली आहे. या कायद्याने, अस्पृश्यतेतून उद्‌भवणाऱ्या अपात्रतेस रूढ करण्याची कृती ही संबंधित तरतुदींनुसार शिक्षेस पात्र असा गुन्हा मानलेली आहे.'

(७) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचाराला प्रतिबंध) कायदा, १९८९

'अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सदस्यांवर अत्याचार होण्यास प्रतिबंध करणारा, अशा गुन्ह्यांच्या चौकशीसाठी विशेष न्यायालयांची रचना करण्यासाठी, आणि अत्याचाराला बळी पडलेल्यांना साहाय्य उपलब्ध करून देणारा आणि त्यांचे पुनर्वसन करणारा कायदा'

(८) हाताने भंगीकामाचा उद्योग आणि शुष्क शौचालयांचे बांधकाम (प्रतिबंध) कायदा, १९९३

'राज्यघटनेच्या सरनाम्यात / भूमिकेत व्यक्तीच्या प्रतिष्ठेची हमी देणारा बंधुभाव साधण्याचे एक उद्दिष्ट जाहीर केलेले आहे. कलम ४७ राज्याला लोकांचे आरोग्य सुधारण्याविषयी आणि जीवनमान उंचावण्याविषयी सांगते. हा कायदा ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केलेला आहे. हा कायदा हाताने करावयाच्या सर्व भंगीकामाला तसेच शुष्क शौचालयांचे बांधकाम किंवा त्यांचा वापर चालू ठेवण्यास प्रतिबंध करतो आणि वॉटरसील शौचालयांचे बांधकाम आणि देखरेख नियम घालून देतो.'

(९) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा, १९५६

राज्यघटनेचे कलम २३ मानवी देह व्यापारास प्रतिबंध करते. ९ मे १९५० रोजी भारताने स्त्रिया आणि मुलींच्या अनैतिक व्यापाराच्या दडपशाही संबंधीच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यास (Intenational Convention for Suppression of Immoral Traffic in Women and Girls) मंजुरी दिली. त्यास हा कायदा प्रत्यक्ष परिणाम देतो.

(१०) स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा, १९८६

'जाहिराती किंवा प्रकाशने, लेखन, चित्रे, आकृती यामध्ये किंवा इतर कोणत्याही प्रकारे स्त्रियांच्या अश्लिल प्रदर्शनास प्रतिबंध करणारा कायदा'

(११) हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

'हुंडा देण्याच्या आणि घेण्याच्या दुष्ट प्रथेला प्रतिबंध करणारा कायदा.'

(१२) सती जाणे (प्रतिबंध) कायदा, १९८७

'सती किंवा विधवा किंवा स्त्रियांना जिवंत जाळणे किंवा दफन करणे हि उद्वेगजनक कृत्य आहे आणि भारताच्या कोणत्याही धर्माने कुठेही हे आज्ञार्थक कर्तव्य आहे असे बजावलेले नाही. सती जाण्यास आणि त्याचे उदात्तीकरण करण्यास परिणामकारक पद्धतीने प्रतिबंध करणारा हा कायदा आहे.'

(१३) प्रसूतीविषयक लाभ कायदा, १९६१

प्रसूती संबंधित लाभ मिळवून देणारा आणि अपत्य जन्माच्या आधी आणि नंतरच्या काही काळासाठी काही आस्थापनांमधून महिलांचे सेवा नियमन करणारा हा कायदा आहे.

(१४) बालविवाह विरोध कायदा, १९२९

'बालविवाह म्हणजे विवाहबंधनात बद्ध होणाऱ्यांपैकी वर किंवा वधू हे विशिष्ट वयापेक्षा कमी वयाचे असतात, अशांचा विवाह रोखण्याच्या दृष्टीने हा कायदा करण्यात आला.

(१५) बालक (श्रमाची प्रतिता) कायदा, १९३३

मजुरीसाठी बालकांना गहाण ठेवण्यास प्रतिबंध करणारा आणि बालकांना मजुरीसाठी गहाण ठेवून घेणाऱ्या उद्योगांना प्रतिबंध करणारा कायदा

(१६) अनाथालयाचे आणि इतर धर्मदाय गृह (देखरेख आणि नियंत्रण) कायदा, १९६०

'अनाथालयांचे, दुर्लक्षित स्त्रिया किंवा बालकांचे निवारागृह आणि अशा इतर संस्थांवर देखरेख आणि नियंत्रण पुरवणारा आणि अशा संस्थांमधून गुन्हेगारी कृत्यांना शिक्षा करणारा हा कायदा आहे.'

(१७) बालक कायदा, १९६०

'बालकांच्या काळजीसाठी, संरक्षणासाठी, पालनपोषणासाठी, कल्याणासाठी, प्रशिक्षणासाठी, शिक्षणासाठी आणि पुनर्वसनासाठी आणि केंद्रशासित प्रदेशात अपराधी बालकांच्या चौकशीसाठी तरतूद करणारा कायदा'

(१८) बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा, १९८६

'ठरावीक व्यवसायांमध्ये आणि मनाई असलेल्या उद्योगधंद्यांच्या यादीत समाविष्ट असलेल्या प्रक्रिया उद्योगांमध्ये बालकांना कामावर नेमण्यास/नोकरीस ठेवण्यास हा कायदा मनाई करतो आणि जिथे बालकांना काम करण्यास प्रतिबंध केलेला नाही अशा कामाच्या ठिकाणच्या वातावरणाचे नियमन करतो.'

(१९) अल्पवयीनांसाठी न्यायदान कायदा, १९८६

दुर्लक्षित बालके आणि बाल गुन्हेगार यांना संरक्षण, उपचार, विकास आणि पुनर्वसन देणारा आणि बालगुन्हेगारांना न्याय व्यवस्थेसाठी खास दृष्टिकोन पुरवणारा कायदा.'

(२०) तरुण व्यक्ती (अपायकारक प्रकाशने) कायदा, १९५६

तरुणांची मने भ्रष्ट करणाऱ्या गुन्हा, हिंसा, क्रौर्य, असभ्यपणा यांच्या कथा किंवा किळसवाण्या किंवा भीतिदायक घटना यांना समावेश असलेली सचित्र किंवा इतर प्रकाशने आणि अशी कृत्य करण्यासाठी त्याला चेतवणारी किंवा प्रोत्साहन देणारी प्रकाशने. हा कायदा तरुण व्यक्तींसाठी अपायकारक प्रकाशनांच्या प्रसारास प्रतिबंध करतो.

(२१) जात अपात्रता निरसन कायदा, १९५०

जेव्हा दिवाणी दाव्यातील पक्षकार वेगवेगळ्या पक्षांचे असतील तर केवळ त्यांच्या धर्माच्या कायद्यांमुळे, त्यांना मिळणाऱ्या संपत्तीपासून अशा पक्षकारांना वंचित करण्याची त्यांच्या धर्माच्या कायद्यांना मुभा असणार नाही.

(२२) मानसिक आरोग्य कायदा, १९८७

मनोरुग्ण व्यक्तींचे वेडेपण, स्वीकार, काळजी आणि उपचार याबाबत हा कायदा नियम ठरतो.

(२३) वेठबिगारपद्धत निर्मूलन कायदा, १९७६

राज्यघटनेचे कलम २३ आणि इतर अशा पद्धतीच्या लादलेल्या मजुरीवर प्रतिबंध घालते आणि या प्रतिबंधाच्या विरुद्ध वागल्यास तो कायद्यानुसार शिक्षेस पात्र गुन्हा ठरतो. दुर्बल घटकातील लोकांच्या आर्थिक आणि शारीरिक शोषणास प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा वेठबिगार पद्धतीचे निर्मूलन करतो.

## इतर काही महत्त्वाचे कायदे

(१) जन्मपूर्व निदान तंत्रज्ञान (नियमन आणि गैरवापरास प्रतिबंध) कायदा, १९९४
(२) वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१
(३) मानवी अवयवाचे रोपण कायदा, १९९४
(४) अनाथालये आणि इतर धर्मादाय गृहे (देखरेख आणि नियंत्रण) कायदा, १९६०
(५) सार्क करारनामा (दहशतवादाचे दमन) कायदा, १९९३
(६) पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६
(७) बिडी आणि सिगार कामगार रोजगाराच्या अटी कायदा, १९६६
(८) बिडी कामगार कल्याण निधी कायदा, १९७६
(९) व्यापार संघ कायदा, १९२६
(१०) औद्योगिक कलह कायदा, १९४७
(११) कामगार नुकसानभरपाई कायदा, १९२३
(१२) औद्योगिक सेवायोजना (स्थायी आदेश) कायदा, १९४६
(१३) कारखाने कायदा, १९४८
(१४) कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८
(१५) किमान वेतन कायदा, १९४८
(१६) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण तरतुदींचा कायदा, १९५२
(१७) प्रशिक्षणार्थी कायदा, १९६१
(१८) समान वेतन कायदा, १९७६
(१९) वेतन देय कायदा, १९३६
(२०) साप्ताहिक सुट्ट्या कायदा, १९४२

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२
दूरध्वनी: (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७, २२३१४७५ फॅक्स : २२३१७१६
Website: http://www.ycmou.com E-mail: openuniversity@bom6.vsnl.net.in

## प्रत्याभरण

या पुस्तकाच्या खालील कोणत्याही भागातील तुमच्या अडचणींविषयी कृपया तुमचा प्रतिसाद इथे नोंदवा. उदाहरणार्थ, (अ) सर्वसाधारण रचना, (आ) काठिण्य पातळी, (इ) भाषा/ शैली, (ई) येथे जास्त / कमी विषय विवेचन/आशय असायला हवा असे तुम्हाला वाटते, (उ) प्रवेश पद्धती, (ऊ) समुपदेशन सत्रे, (ए) अंतर्गत मूल्यमापन, या उपक्रमांच्या उपयुक्ततेविषयी, (ऐ) तुमच्या संबंधित क्षेत्रात आणि कामाच्या ठिकाणी उपयोगी ठरेल असा दृष्टिकोन जर या अभ्यासक्रमाने दिला आहे किंवा (ओ) इतर अनेक मानवी हक्कांशी संबंधित प्रश्न, विषयांकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलला आहे वगैरे. हे पान वेगळे करा आणि ते विद्यापीठातील मानवी हक्क शिक्षणक्रम समन्वयक यांच्याकडे पाठवा.

हा उपक्रम अधिकाधिक परिणामकारक आणि विषयाशी निगडित असा होण्यासाठी अभ्यासक्रमाच्या विविध भागांवर नावीन्यपूर्ण आणि स्पष्टपणाने शिकवता येण्यासाठी आपल्या कल्पना विद्यापीठास सांगाव्यात अशी विनंती अभ्यासकेंद्र समन्वयक, समुपदेशक, अतिथी तज्ज्ञ किंवा कुणीही हितसंबंधित व्यक्ती यांना करण्यात येत आहे. हा प्रतिसाद/माहिती गोपनीय समजली जाईल आणि केवळ पुस्तक/अभ्यासक्रम / शिक्षणक्रम अद्ययावत करण्यासाठीच वापरली जाईल.

## तुमच्याविषयी

१. नाव : ________________________________

२. पत्ता : ________________________________

________________________________

३. दूरध्वनी (एसटीडी कोडसह) : भ्रमणध्वनी :

इ-मेल :

४. हुद्दा :

५. शिक्षण :

६. तुमचा प्रतिसाद/सूचना :